# माणूस

शनिवार । २४ एप्रिल १९८२ । दीड रुपया

## ‘मफतलालचे’ चार हजार कामगार वाऱ्यावर

## कोंडी कोण व कशी फोडणार?

पृष्ठ....७

---

### स. न. वि. वि.

◻ ‘संप पुरवणी’ म्हणून प्रसिद्ध केलेला १० एप्रिल १९८२ चा विशेषांक वाचला.

‘गेल्या पन्नास वर्षात महाराष्ट्र सरकार किंवा केंद्र सरकारने केले नाहीत एवढे आर्थिक बदल आम्ही केले आहेत.’ या मथळ्याखाली प्रसिद्ध झालेली ज्ञानदा नाईक यांनी घेतलेली डॉ. दत्ता सामंत यांची मुलाखत वाचली. या मुलाखतीमधील पान क्र. २७ वर डॉ सामंत ज्ञानदा नाईक यांच्या एका प्रश्नाला उत्तर देताना म्हणतात– ‘१९७९ साली केलेला करार जॉर्ज फर्नांडीस आणि शरद पवारांनी सुचवलाच नव्हता. त्यांनी फक्त तोडगा सांगितला. ४५ रु. वाढ तर लगेच द्यायची होती. उरला भाग दरसाल ६ रु. वाढ. पण संघ आणि गिरणीमालक ह्यांनी त्याचा सरळ करार करून टाकला की, दरसाल ६ रु. पगारवाढ ५ वर्षे [ १९८४ पर्यंत ] द्यावी. मला सांगा, असा कामगारांचा गळा कापणारा करार कुठलीही युनियन कुठल्याही कारखान्यात करेल का ? संघ प्रातिनिधिक युनियन असल्याने असा कामगारविरोधी करार त्यांनी केला.’

डॉ. सामंतांचे हे म्हणणे साफ खोटे तर आहेच. शिवाय राष्ट्रीय मिल मजदूर संघाची प्रतिमा मलीन करण्यासाठी त्यांनी ते हेतुपुरस्सर सांगितले आहे

श्री. शरद पवार हे मुख्यमंत्री असताना

→

त्याचे डेप्युटी लेबरकमिशनर श्री. आर. पी. पोवार यांनी सदर कराराच्या प्रती गिरणी-मालक संघ, नॅशनल टेक्स्टाइल कॉर्पोरेशन, महाराष्ट्र राज्य टेक्स्टाइल कॉर्पोरेशन आणि रा. मि. म. संघ यांना पाठविल्या होत्या. त्यात अंतर्भूत असलेल्या इंग्रजी माहितीचा मराठी तर्जुमा मी आपणास सादर करीत आहे. त्यात म्हटले आहे—

'केंद्रीय उद्योगमंत्री जॉर्ज फर्नांडिस, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री शरद पवार, मजूर-मंत्री सुशीलकुमार शिंदे, सार्वजनिक काम-काज खात्याचे मंत्री जगन्नाथ जाधव यानी कापडउद्योगातील कामगाराचे प्रतिनिधी, गिरणीमालक संघ आणि नॅशनल टेक्स्टाइल कॉर्पोरेशन याच्याबरोबर १२ व १३ एप्रिल १९७९ रोजी चर्चा केली. मुख्यत्वे कापड-उद्योगातील कामगारांच्या विविध माग-ण्यांच्या संदर्भात ही चर्चा करण्यात आली.'

वर उल्लेखिलेल्या सर्व संघटनांशी प्रदीर्घ चर्चा केल्यानतर हा निर्णय घेण्यात येत आहे.

कराराच्या प्रतीमध्ये अनुक्रमाक ४ मध्ये असेही स्पष्ट नमूद करण्यात आले आहे की—

'कामगारांना ६ रु. वार्षिक पगारवाढ पुढील पाच वर्षाकरिता देण्यात येत असून ती पगारवाढ १ जानेवारी १९८० पासून अमलात येईल.'

राष्ट्रीय मिल मजदूर संघाविषयी काम-गाराची मने दूषित करण्याच्या 'स्वार्थी' हेतूने डॉ. सामंत जी वक्तव्ये करीत असतात त्यापैकीच हे एक वक्तव्य आहे. तरी कृपया आपण आपल्या लोकप्रिय साप्ताहिकात वरील योग्य खुलासा प्रसिद्ध करून खरी माहिती कामगाराच्या निदर्शनास आणून द्यावी, ही विनंती.

१५ एप्रिल आमदार भाई भोसले
सरचिटणीस, रा. मि. म. संघ

□ १० एप्रिलच्या संपपुरवणीमधील ज्ञानदा नाईक याचा लेख आवडला. आम्ही स्वत: कामगारक्षेत्रात काम करणारे असल्यामुळे व किंचित पत्रकार; पण आहोत त्यामुळे सर्वत्र येणारे कामगार-विषयक लिखाण वाचणे आवश्यक असते. त्यामुळे तुमचा लेख, गिरणीकामगारप्रश्न संपूर्णपणे वाचकांच्या समोर ठेवतो.

महत्त्वाचे म्हणजे बहुतेक कामगार वृत्त लिहिणारे लेखक यांना कामगारांच्या जीव-नाची, प्रश्नांची बाजू माहीत नसते किंवा पोटतिडकीने ती अभ्यासून व तपासून बघण्याची कुवत नसते; परंतु ज्ञानदा नाईक यानी प्रत्यक्ष हिंडून–फिरून थोडक्यात पण सर्वांची बाजू व मनोवृत्ती दाखवण्याचा उत्तम प्रयत्न केला आहे यावद्दल त्यांचे अभिनंदन.

'माणूस'चा अंक मुंबईत मिळणे दुरापास्त आहे. काही दोष वाटपपद्धतीत असल्यास काढणे उत्तम.

१५ एप्रिल —जयवंत माईणकर, मुबई

## पुणे दिनांक १७ एप्रील

संघटित कामगारांच्या शक्तीचे साद-पडसाद दत्ता सामंतांच्या चळवळीने सध्या प्रक-र्षाने जाणवत आहेत. त्याची नेमकी विरुद्ध बाजू म्हणजे असंघटितांची असमर्थता. पुण्याच्या असंघटित कामगार संघटन समि-तीने एप्रिलच्या १७ तारखेला पुण्याच्या साहित्य परिषदेच्या सभागृहात नुकताच एक कार्यक्रम आयोजित केला होता. विषय होता – आदिवासी लढ्यातील कार्यकर्त्यांची नेमणूक. विषयाच्या अनुषंगाने असंघटिताच्या प्रश्नाबद्दल कॉ. अहिल्या रांगणेकर आणि अर्थतज्ज्ञ श्री. एच. के. परांजपे यांची मार्ग-दर्शनपर भाषणे झाली. ही मार्गदर्शक तत्त्व प्रत्यक्ष अमलात आणणारे दोन कार्यकर्ते – वहारू सोनावणे आणि बारामतीचे लोणकर यानी संघटनाबांधणीत येणारे प्रत्यक्ष अनु-भव श्रोत्याना सांगितले.

असंघटित कामगार आणि शेतमजूर यानी संघटनेतली शक्ती ओळखायला हवी, असं सागून अहिल्याबाई म्हणाल्या, "कामगाराची शक्ती कमी करण्यासाठी संघटित–असंघटित अशी फूट प्रस्थापिताकडून सतत केली जाते; पण आपल्याला जर एक नवीन आर्थिक, सामाजिक रचना उभारायची असेल तर सघटित–असघटित युती हाच एकमेव मार्ग आहे."

अहिल्याबाईंनी असंघटिताची संख्या, त्याना मिळणारं बेकायदा अपुरं वेतन आणि सरकारची त्याबद्दल असमर्थता याचे ठळक पुरावे सादर केले.

यानंतर बोलले वहारू सोनावणे. वहारू हा धुळे जिल्ह्यातील शहाद्यात काम करणारा आदिवासी तरुण कार्यकर्ता. वहारु सांगत होता, "प्रत्येक गावात तरुणमंडळ, बाया-मंडळ, बालमडळ आणि पंचायतसमिती आहे. आदिवासीवर झालेले अन्याय ते संघ-टनासमितीकडे नोंदवतात. समिती त्याचा पाठपुरावा करते. अंधश्रद्धाचा पगडा आदि-वासीमध्ये जास्त आहे. तो दूर करण्यासाठी गावात लोकविज्ञानचळवळ आली आहे.


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : सत्तेचाळिसावा

२४ एप्रिल १९८२

किंमत : दीड रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

आम्ही आदिवासींना शरीरशास्त्राची माहिती करून देतो. आमची कलापथकं आहेत. त्यातून आम्ही दारुबंदी, जुगार, अंधश्रद्धा यांना विरोध करतो. शिक्षणाचा प्रसार करतो,"

सोनावण्यानंतर बारामतीत शेतमजूर संघटनेचं पूर्ण वेळ काम करणारे रघुनाथ लोणकर बोलले. १९७८ पासून लोणकरांनीं कामाला सुरुवात केली. ते स्वतः शेजमजूर आहेत. त्यामुळे शेतमजुराच्या अडचणी ते जाणू शकतात, प्रभावीपणे मांडू शकतात. लोणकर म्हणाले, "शेतमजुरांना एकत्र करणं फार अवघड आहे. त्यांना संघटनासमितीचे लोक पूर्वी शत्रू वाटत होते. त्यांच्याशी बोलायला गेलं की उडवून लावायचे. सारखं बोलून बोलून आम्ही विश्वास निर्माण केला. किमान वेतन न देणाऱ्या बागाइतदारावर फौजदारी खटले भरून त्यांना कायदेशीर वेतन मिळवून दिलं. आता शेतमजूर एकत्र आले आहेत. मालकाच्या डोळ्याला डोळा देऊन शेतमजूर बोलतो पैसे का कमी दिले म्हणून विचारतो. नाही दिले तर तक्रार नोंदवतो. मोर्चे, सभा, संप इ. साधनात सक्रिय मदत करतो."

शेतमजुरामधे झालेला हा बदल लोकशाही आणि समाजवादाच्या दृष्टीने विशेष महत्त्वाचा आहे असं सांगून श्री. परांजपे म्हणाले, "संघटित कामगारांनी मिळणाऱ्या जास्त वेतनाचे पापक्षालन म्हणून असंघटितांचं काम करू नये. आपली संघटना नसती तर काय वेतन मिळालं असतं याचा विचार करून कामगारांनी आपल्या वेतनाचा १/४ भाग असंघटितांसाठी ठेवावा."

¤

मॅजेस्टिक प्रकाशनचं एक किंमती अपत्य १७ तारखेला संध्याकाळी ६.३० वाजता जन्माला आलं. जन्मसोहळा व्हावा तर असा! वि. स. वाळिंब्यासारखा सिद्धहस्त लेखक, केशवराव कोठावळ्यांसारखा मातब्बर प्रकाशक आणि प्रत्यक्ष प्रकाशनसमारंभासाठी आलेले माजी सरसेनापती बेऊर पाहिल्यावरच पुस्तकाचं मूल्य लक्षात आलं.

मॅजेस्टिकच्या गच्चीवर संध्याकाळच्या प्रसन्न वातावरणात वि. स. वाळिंब्यांच्या 'हिटलर' पुस्तकाचा प्रकाशनसोहळा सुरू झाला. आरंभी दिवंगत लेखक आणि कादंबरीकार कै. अच्युत बर्वे यांना द. मा. मिरासदार यांनी शब्दरुप श्रद्धांजली वाहिली. दोन मिनिटं स्तब्धता पाळून उपस्थितांनी मूक श्रद्धांजली अर्पण केल्यावर माननीय जनरलसाहेबांनी प्रकाशन जाहीर केलं.

या प्रकाशन समारंभाचं वैशिष्ट्य म्हणजे 'हिटलर'च्या निमित्ताने 'सकाळचे' संपादक श्री. ग. मुणगेकर, कथाकार आणि साहित्यिक श्री. मिरासदार, 'म. टा.'चे सहसंपादक दि. वि. गोखले, स्वतः लेखक श्री. वाळिंबे आणि प्रमुख पाहुणे श्री. बेऊर यांची भाषणं (किंवा स्वगत) झाली.

हिटलरचं चित्तथरारक आयुष्य, त्याच्या स्वभावातले मानवी तसच पाशवी कंगोरे, त्याच्या आवडी-निवडी, त्याच्या एकाच मनात असलेलं आत्यंतिक प्रेम आणि आत्यंतिक कठोरता वाळिंब्यांनी तटस्थपणे मांडली आहे. यावर तीनही वक्त्यांचं एकमत झालं. जर्मनीवर पहिल्या महायुद्धाच्या अखेरीस लादला गेलेला व्हर्सायचा मानहानीकारक व अन्यायकारक तह हे हिटलरच्या उदयाचे मूळ कारण सांगून श्री. ग. मुणगेकर यांनी हिटलरचा ज्यू द्वेष व साम्राज्यतृष्णा याचा धिःकारच केला पाहिजे असे सांगितले.

द. मा. मिरासदार म्हणाले, 'वैचारिक लेखन हा लेखकाचा हेतू नाही. त्यामुळे हिटलरच्या व्यक्तिमत्त्वाचं हे ललितरम्य पद्धतीनं केलेलं रंजक चित्रण असं याच स्वरूप उतरलं आहे. हिटलरच्या मनाचा शोध घेण्याचा प्रत्ययकारी प्रयत्न लेखकाने केला आहे. नाटक, चित्रकला, संगीत, नकला, विनोद यात रस घेणाऱ्या त्याच्या मनात कडवा राष्ट्रवाद आणि टोकाचा ज्यूविरोध कसा घुसला असेल याचं कोडं हे पुस्तक वाचताना सतत जाणवतं.'

दि. वि. गोखले म्हणाले, 'हिटलरसारख्यांची चरित्रं लिहिणं अवघड आहे. ते काम वाळिंब्यांनी करून दाखवलं. पुस्तकातली भाषा इतकी सुंदर आहे की, त्याबद्दल अभिमान वाटावा.'

'पुस्तकाचं बहिरंग छान आहे. अंतरंग कसं आहे ते तुम्हीच ठरवा!' असं म्हणून वाळिंब्यांनी कमल शेडग्यांचं कौतुक केलं. व ज्यांनी ज्यांनी या पुस्तकजीवनात त्यांना साहाय्य केलं त्या सर्वांचे त्यांनी आभार मानले.

जनरल बेऊरसाहेब म्हणाले, 'जागतिक घडामोडी ज्या एका माणसाने १२ ते १५ वर्षं नियंत्रित केल्या त्या हिटलरसारख्या जगविख्यात व्यक्तीवरच हे पुस्तक वाचनीय आहे.'

प्रकाशनसोहळा संपला. १०० रु. किंमतीचा आणि सुमारे पावणेसातशे पानांचा हा ग्रंथ कधी वाचायला मिळतो इतपत उत्सुकता या समारंभाने निर्माण केली. थोडी निराशा केली ती वक्त्यांनी. सर्वांनी हिटलरच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल सांगितले; पण हिटलर गाजला तो त्याच्या युद्धनीतीबद्दल! पुस्तकात याबद्दल काय म्हटलं आहे याची दखल वक्त्यांनी घ्यायला हवी होती.

¤

## दि. १८ एप्रिल। ग्रंथाली

ग्रंथालीची लेखक-वाचक चळवळ पुण्यामुंबईत आता नवीन नाही. ग्रंथालीची सध्या नऊ केंद्रे आहेत. ही चळवळ आता नागपूरपर्यंत पोचली आहे. 'उपरा' आणि 'बलुत'-सारख्या पुस्तकांनी ग्रंथालीला 'रेकग्निशन' मिळवून दिलं आहे.

या 'ग्रंथाली'च्या पुण्यातील केंद्राचा दुसरा वर्धापनदिन १८ तारखेला राज्य शिक्षण संस्थेत साजरा झाला. दुपारी २-३० ते ४-३०-'कादंबरी आणि पत्रकारिता' या विषयावर परिसंवाद, मग ग्रंथनारायणाची पूजा, मग पूजेचा प्रसाद आणि तीर्थसेवन (भेळ आणि चहा) आणि नंतर ज्येष्ठ प्रकाशक श्री. ह. वि. मोटे यांची प्रदीर्घ मुलाखत असा हा भरगच्च कार्यक्रम होता.

परिसंवादाच्या कार्यक्रमाचे अध्यक्ष होते 'माणूस'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर, 'कादंबरी व पत्रकारिता ही परस्परविरोधी दिशांनी जाते. कादंबरी अंतर्मुखतेकडे जाते, तर पत्रकार बहिर्मुखी असतो. माहिती, स्थलकाल यांच्याशी त्याचा अधिक संबंध असतो.' असा मुद्दा मांडून माजगावकरांनी परिसंवादाला सुरुवात करून दिली. परिसंवादात भाग घेणाऱ्या तीनपैकी दोन वक्त्यांनी म्हणजे श्री. ह. मो. मराठे आणि प्रा. अंजली सोमण यांनी हे मान्य केलं.-कडाडून विरोध केला तो प्रसिद्ध लेखक श्री. अरुण साधूंनी. ते म्हणाले, 'पहिल्या पानावरच्या बातम्या म्हणजे पत्रकारिता नाही. समाजातल्या विविध व्यक्ती-

पृष्ठ २१ वर

# विधानसभा निवडणुका

## बंगालमध्ये डाव्यांचा जोर कायम

वा. दा. रानडे

पश्चिम बंगाल, केरळ, हरियाना व हिमाचल-प्रदेश या चार राज्यांत विधानसभेच्या निवडणुका आणि त्याबरोबरच लोकसभा व विधानसभांच्या काही पोटनिवडणुका येत्या १९ मेस होत असून त्याच्या तयारीस राजकीय पक्ष लागले आहेत. एक प्रकारे ही छोटी सार्वत्रिक निवडणूकच आहे. देशात इंदिरा राजवटीचे दुसरे पर्व सुरू झाल्यापासून जवळजवळ अडीच वर्षांनी या निवडणुका होत असून इंदिरा राजवटीसंबंधी, तसेच विरोधी पक्षांनी या काळात केलेल्या कार्यासंबंधी आपला कौल दर्शवण्याची संधी मतदारांना मिळत आहे. ज्या चार राज्यांत निवडणुका व्हावयाच्या आहेत तेथे इंदिरा कांग्रेस विरोधकांचेच बळ जास्त असल्याने निकाल आपल्याविरुद्ध गेले तर देशात इंदिरा कांग्रेसविरोधी वातावरण निर्माण होऊ लागेल असे इंदिरा कांग्रेस नेत्यांना वाटत होते व तशी प्रतिमा निर्माण होऊ नये यासाठी कर्नाटक व आंध्र प्रदेश या आपले बालेकिल्ले असलेल्या राज्यांत याच वेळी निवडणुका घ्याव्यात असा इंदिरा गांधींचा विचार होता; पण स्थानिक नेत्यांचे विरोधामुळे त्यांनी तो रद्द केला असल्याचे दिसते.

ज्या चार राज्यांत निवडणुका होणार आहेत त्यांपैकी पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी पक्षाच्या नेतृत्वाखालील डाव्या आघाडीच्या हाती १९७८ मध्ये सत्ता आली व मुदत संपेपर्यंत पाच वर्षे या आघाडीकडेच सत्ता टिकून राहिली. या लेखात पश्चिम बंगालमधील राजकीय प्रवाहांचाच मी विचार करीत आहे. डाव्या आघाडीच्या हाती तेथे १९६७ च्या निवडणुकांत प्रथम सत्ता आली; पण तेथे मुदत संपेपर्यंत अधिकारावर राहिलेले डाव्यांचे हे पहिलेच सरकार आहे. केरळमध्ये आघाडी फुटल्याने सत्ता गेली, तसे पश्चिम बंगालमध्ये घडले नाही, याचे श्रेय आघाडीच्या घटकपक्षातील सहकार्यालाच द्यावे लागेल. इंदिरा गांधींच्या नेतृत्वाखालील एकाधिकारशाहीला तोंड देण्यासाठी अशा आघाड्या बनविणे व टिकविणे आवश्यक आहे; पण विरोधी पक्षांचे सर्वत्र एक धोरण दिसत नाही. जनता, कांग्रेस (एस) हे पक्ष हरियानामध्ये इंदिरा कांग्रेस विरोधाची भूमिका घेत आहेत, तर पश्चिम बंगालमध्ये डाव्या आघाडीस विरोध करण्यासाठी इंदिरा कांग्रेसशी ते समझोता करीत आहेत इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाही प्रवृत्तीचे बळ वाढण्यास त्यामुळे मदत होत आहे; पण त्याचबरोबर या पक्षांना मार्क्सवाद्यांपेक्षा इंदिरा कांग्रेस जवळची का वाटते याचाही विचार करायला हवा. पश्चिम बंगालमध्ये मार्क्सवादी व इतर डावे पक्ष यांचे बळ एवढे आहे की, त्याना जनता, कांग्रेस (एस) या पक्षाच्या सहकार्याची आवश्यकताच वाटत नाही. केवळ पश्चिम बंगालपुरता नव्हे तर अखिल भारतीय पातळीवर या प्रश्नाचा विचार करायला हवा. राज्याच्या निवडणुकांत राज्यांच्या प्रश्नांनाच प्राधान्य येते हे खरे; तरीही राजकीय पक्षानी आपली धोरणे ठरविताना अखिल भारतीय अनुसंधान सुटू देता कामा नये. कांग्रेस (आय) ला प्रभावी पर्याय बनण्याइतकी आज कोणत्याच विरोधी पक्षाची ताकद नाही ही वस्तुस्थिती मान्य करायला हवी. जनता पक्ष फुटल्यामुळेच इंदिरा गांधींना पुन्हा सत्तेवर येण्याची संधी मिळाली. आता पुनः विरोधी पक्षांचे ऐक्य घडवून आणण्याचे प्रयत्न सुरू झाले. व्यापक कार्यक्रमावर सर्वच विरोधी पक्षांची म्हणजे डाव्या व उजव्या गटांची संमिश्र आघाडी हाच सध्याच्या परिस्थितीत इंदिरा गांधींच्या एकाधिकारशाहीस प्रभावी पर्याय होऊ शकतो. जनता पक्षाचा प्रयोग एकदा फसला असताना पुनः त्याच पद्धतीने प्रयत्न न करता त्या चुका टाळून नव्या दिशेने प्रयत्न करायला हवेत; पण त्यासाठी हवा असलेला व्यापक दृष्टिकोन स्वीकारण्याची डाव्या व उजव्या दोन्ही बाजूंच्या पक्षांची तयारी दिसत नाही. पश्चिम बंगालमध्ये वास्तविक इंदिरा कांग्रेसला अलग पाडण्यासाठी मार्क्सवाद्यांनी जनता, कांग्रेस (एस) यांनाही आपल्या आघाडीत सामील करून घ्यायला हवे होते; पण त्या पक्षांनाही मार्क्सवाद्यांशी सहकार्य नको होते असे दिसते. राज्यांच्या निवडणुकांत अखिल भारतीय दृष्टिकोनापेक्षा अखेर त्या त्या राज्यातील विशिष्ट परिस्थितीनुसार स्वीकारावयाचे धोरणच प्रभावी ठरते असा अनुभव पश्चिम बंगालमध्ये आला.

पश्चिम बंगालमधील राजकीय चित्राची कल्पना येण्यासाठी १९६७ पासूनच्या विधानसभा– निवडणुकांचा आणि १९८० च्या लोकसभा–निवडणुकांचा एकत्र तुलनात्मक विचार करायला हवा. १९६७ च्या निवडणुकीत डाव्याच्या दोन आघाड्या होत्या. एक मार्क्सवाद्यांच्या नेतृत्वाखालची व दुसरी कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालची. कम्युनिस्ट नेतृत्वाखालील आघाडीस ६६ व मार्क्सवादी आघाडीस ६२ जागा मिळाल्या. मार्क्सवाद्यांनी ४३ व कम्युनिस्टांनी १६ जागा जिंकल्या. दोन्ही कम्युनिस्ट पक्षात मार्क्सवाद्यांचा प्रभाव जास्त असल्याचे तेव्हापासूनच दिसून आले. दोन्ही आघाड्या व बांगला कांग्रेस हा बंडखोर कांग्रेसजनांचा पक्ष यांनी एकत्र येऊन डाव्या आघाडीचे सरकार स्थापले पण फाटाफुटीने ते गडगडले. १९६९ च्या निवडणुकीत डाव्या आघाडीत चौदा पक्ष एकत्र आले होते. या आघाडीने २८० पैकी २१६ जागा जिंकून सर्वांत मोठे यश मिळविले. मार्क्सवाद्यांच्या जागा ८० पर्यंत व कम्युनिस्टांच्या ३० पर्यंत वाढल्या; पण ही आघाडीही फार काळ टिकली नाही. १९७१ च्या निवडणुकात कोणत्याच पक्षास निर्णायक बहुमत मिळाले नाही. मार्क्सवाद्यांच्या जागा मात्र १११ पर्यंत वाढल्या. एक वर्षानंतरच १९८२ मध्ये पश्चिम बंगालमध्ये विधानसभेच्या पुनः निवडणुका झाल्या. त्यात कांग्रेसने १९६९ च्या डाव्या आघाडीच्या यशाएवढेच मोठे यश मिळविले. मार्क्सवाद्यांच्या जागा या वेळी ५५ पर्यंत घटल्या. कम्युनिस्टांनी या वेळी कांग्रेसशी युती केली होती त्यांना ३५ जागा मिळाल्या. १९७७ च्या निवडणुकात पुनः चित्र पालटले व डाव्या आघाडीच्या हाती सत्ता आली.

या वेळीही आपण सत्ता टिकवू असा विश्वास डाव्या आघाडीच्या नेत्यांना वाटत आहे. १९७७ च्या निवडणुकांत एकट्या मार्क्सवादी पक्षाने निर्णायक बहुमत मिळ-

विले होते. इतर डाव्या पक्षांना बाजूला ठेवून त्यांना स्वतःचे सरकार बनविता आले असते; पण त्यांनी तसे केले नाही. इतर डाव्या पक्षाशी सहकार्याचे धोरण त्यांनी ठेवले. आघाडीत त्यांनी या वेळी पश्चिम बंगाल समाजवादी पक्ष व लोकशाही समाजवादी पक्ष या दोन पक्षांना सामील करून घेतले आणि त्याना सामावून घेण्यासाठी १९७७ पेक्षा कमी जागा मार्क्सवादी पक्ष लढवीत आहे. पुरोगामी गटही तीन जागा कमी लढवीत आहे. १९८० च्या लोकसभा निवडणुकीत डाव्या आघाडीने एकूण ४८ पैकी ३८ जागा जिंकल्या. त्यानंतरच्याही पोटनिवडणुकांतही तिने यशाची परंपरा टिकविली. हे लक्षात घेता या वेळच्या निवडणुकांत निर्विवाद बहुमत मिळविणे डाव्या आघाडीला सहज शक्य होईल असा आशावाद त्यांच्या गोटात व्यक्त करण्यात येत आहे. इंदिरा कॉंग्रेसने जनता व कॉंग्रेस-(एस्)शी समझोता केला असला तरी त्यांची आघाडी फारशी प्रभावी ठरण्याची शक्यता नाही. □

गोमंतकवार्ता

## पुन्हा प्रादेशिकतेकडे

गोव्यात महाराष्ट्रवादी गोमंतक पक्ष इंदिरा कॉंग्रेस सरकारला एक पर्यायी पक्ष म्हणून इतर पक्षापेक्षा अधिक जय्यत तयारीने उभा आहे. भा. ज. प., जनता या पक्षांचे नेतृत्व अन पक्षशाखा इतक्या नगण्य आहेत की, जलद गतीने पुढे सरसावणाऱ्या या प्रादेशिक पक्षाचा उत्कर्ष पाहून त्या पक्षामधून फुटून बाहेर पडलेले आता पक्षात परत येण्याचा विचार करू लागले आहेत. माजी मुख्यमंत्री व माजी अध्यक्षा सौ. शशिकला काकोडकर यांना परत पक्षात घेण्यावर पक्ष कार्यकारिणी विचार करीत आहे. निवडणूक आयोगापुढे हा पक्ष व सिंह हे चिन्ह गोठवावे म्हणून त्यांनी पुढाकार घेतला होता. पण निकाल त्यांच्याविरुद्ध लागला अन त्या वेळी घेतलेल्या महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाच्या अधिवेशनात त्यांना सहा वर्षेपर्यंत निलंबित करण्यात आले होते. पण तो ठराव आता मागे घ्यावा म्हणून पक्षाच्या एका गटाकडून मागणी होत आहे. कै. दयानंद बांडोडकर याच्या पत्नी व सौ. काकोडकर यांच्या माता सुनंदाबाई बांदोडकर यानी आता म. गो. पक्षात रस घेतला असून सौ. काकोडकर याच्या म. गो. प्रवेशावर त्यामुळे जवळजवळ शिक्कामोर्तब झाल्यासारखेच आहे.

मराठी भाषेबरोबर कोकणी भाषा व घटकराज्य हा नवीन विचारप्रवाह यापक्षाने आणला आहे. त्यामुळे केवळ त्या मागण्यांविरूद्ध म. गो. आधी वावरत होता म्हणून फारकत झालेले समाजकार्यकर्तेही आता पक्षात येतील अशी चिन्हे दिसू लागली आहेत. इतर पक्ष प्रत्येक बाबतीत मागे राहिले व राहाणार आहेत.

काही प्रदेशात राष्ट्रीय पक्षापेक्षा प्रादेशिक पक्षच अधिक कार्य करु शकतात. या पक्षाने गोव्याच्या राजकीय व आर्थिक बाधणीबद्दल फेरविचार केलेला आहे. त्यामुळे येत्या निवडणुकीत कॉंग्रेस (इं)चा पाडाव आता ठरलेलाच आहे अशी जनमानसाची प्रतिक्रिया आहे.

सध्या गोव्यात संप व हरताळ याचा गदारोळ आहे. मागल्या म. गो. सरकारची परिस्थिती आता राहिलेली नाही. ती अधिक बिघडली आहे, हे लक्षात घेण्यासारखेच आहे. कॉंग्रेस (इं) सरकारवर भ्रष्टाचाराच्या झालेल्या आरोपांनी उच्चांक गाठलेला आहे.

सध्या कॉंग्रेस (इं) पक्षात इतका गोधळ माजला आहे की, किती गट आहेत ते मोजणे कठीण होऊन बसले आहे. मुख्यमंत्री श्री. प्रतापसिंग यांची हकालपट्टी करून त्या जागी आपली नेमणूक व्हावी म्हणून प्रत्येक गट जोरदार प्रयत्न करीत आहे. महाराष्ट्राप्रमाणेच येथे सह्यांची मोहीम सुरू करण्यात आली असून या प्रकरणी वारंवार येणाऱ्या मुख्यमंत्र्यांविरूद्धच्या तक्रारीमुळे प्रधानमंत्रीही कंटाळल्या आहेत. नवे नेतृत्व लाभले तरी हे तंटे मिटतील अशी शक्यता मुळीच नाही.

'म. गो. पक्षातून सौ. काकोडकरानी जेव्हा सत्ताधारी कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला तेव्हा आपापल्या खुर्च्या साभाळण्यात सर्व मंत्री इतके गुग होते की, त्याचे प्रशासनावरचे लक्ष पूर्णपणे उडाले होते. याचाच फायदा घेऊन अनेक मंत्र्यानी भ्रष्टाचाराचे अनेक चागले 'नमुने' लोकापुढे ठेवले होते.

सौ. काकोडकरांनी जेव्हा आपल्या अनुयायासह कॉंग्रेस पक्षात प्रवेश केला तेव्हा आपसात जास्तच खटके उडू लागले व गुप्त बैठकीना आपल्याला बोलावले जात नाही, निर्णय घेताना आपले मत विचारात घेतले जात नाही, म्हणुन सौ. काकोडकर संतप्त झाल्या. अजूनही त्या परिस्थितीत फारसा बदल नाही. त्यामुळे त्या कॉंग्रेसमध्ये रहाण्या पेक्षा म. गो.त येणे अधिक पसंत करतील असे दिसते. पण सौ. काकोडकरांना म. गो. च्या एका गटाचा पूर्ण विरोध असल्याचे हल्लीच म्हापसा येथे घेतलेल्या शिबिराच्या वेळी दिसून आले. अदमासे १५००० हजार लोक उपस्थित असलेल्या या शिबिरात याच प्रश्नावर पाठीराखे व विरोधक यानी परस्पर विरोधी घोषणा दिल्याने गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. पण हा निर्णय आता सर्वसाधारण सभेकडे सुपूर्द करण्यात आला आहे.

पक्षैक्याचा व कॉंग्रेसचे संकट निवारण्याचा महाराष्ट्रवादी गोमंतक पक्षाने निर्धार केला आहे. 'सत्ताधारी कॉंग्रेस पक्षातील विकोपाला गेलेली भाडणे, स्वार्थासाठी चाललेल्या रस्सीखेचीत एकमेकांच्या तंगड्या अडकवून एकमेकांना पाडण्याचे चाललेले डावपेच, भ्रष्टाचारात आकंठ बुडालेले अगदी वरपासून खालपर्यंतचे प्रशासन आणि मतदारांचा

पृष्ठ ४० वर

मुंबई वार्ता

# गुन्हेगारीवरील दिलासा देणारा परिसंवाद

प्रसिद्ध तत्त्ववेत्ता आणि समाजशास्त्रज्ञ ड्युर्खाइम (चुकीच्या-बरोबर उच्चारासाठी चु. भू. द्यावी घ्यावी !) यानं असं म्हटलं होतं की' कुठल्याही समाजातलं आत्महत्येचं प्रमाण त्या देशाच्या आणि समाजाच्या मानसिक आरोग्य-अनारोग्याचं द्योतक असतं. केवळ आत्महत्याच नव्हे, तर विसाव्या शतकाच्या संदर्भात आणि बदलत्या कालमानपरिस्थितीनुसार त्यात बदल करून, एकूणच गुन्हेगारीचं चढतं-उतरतं प्रमाण हे समाजाच्या मानसिक स्वास्थ्याचं निदर्शक असतं,असं म्हणावं लागेल. याचा अर्थ असा नव्हे की, सगळेच मानसिक रुग्ण गुन्हेगार असतात; किंवा असाही नव्हे की, घडून येणाऱ्या सर्वच गुन्ह्यांना फक्त मानसिक रुग्णच जबाबदार असतात; पण तरीही या दोहोंचा परस्परांशी घनिष्ट सबंध असतो. ही वस्तुस्थिती मात्र नाकारता येणार नाही. तसंच नाकारता येणार नाही, ते या एकूण विषयाचं वाढत्या गुन्हेगारीच्या या दिवसात असणारं महत्त्व.

अशा या महत्त्वाच्या विषयावर नुकताच मुंबईत एक परिसंवाद घडून आला. आपापल्या क्षेत्रात मातब्बर असणाऱ्या मंडळींनी या परिसंवादात भाग घेतला होता. मुंबईचे पोलिसकमिशनर श्री. रिबेरो, जस्टिस श्री. कोतवाल, मानसरोगशास्त्रज्ञ डॉ बगाडिया आणि संचालक म्हणून डॉ. पाटकर हे या कार्यक्रमातले वक्ते होते.

सध्या मुंबईतले गुन्हे बरेच वाढले आहेत, अशी कबुली कमिशनर श्री. रिबेरो यानी सुरुवातीलाच देऊन टाकली. 'प्रत्यक्षात सरकारी आकडेवारी गुन्हे कमी होत चाललेत, असं म्हणत असली, तरीही मी असं म्हणतो. कारण ज्या वर्गवारीमध्ये गुन्ह्याचे आकडे प्रसिद्ध होतात, त्या वर्गवारीप्रमाणे ते खरं आहे म्हणजे असं, ज्या गुन्ह्याना विशेष कौशल्य लागेल, चातुर्याचा, समयसूचकतेचा, तल्लखपणे वापर करावा लागेल, असे म्हणजे घरफोडी, इतकचं काय, पण शिताफीनं पाकिट मारणं यासारखे प्रकार कमी झालेत. चोरी करण्यासाठीसुद्धा फारसे कष्ट न घेता सहज किंवा वेळप्रसंगी विलक्षण धोका पत्करून करायच्या गुन्ह्याचं प्रमाण वाढलं आहे. म्हणजे रात्रीच्या वेळी सुरा दाखवून पैसे–दागिने लुटणं, अथवा भरधाव वाहनावरून जाता जाता चेन खेचणं, या गुन्ह्यांमध्ये जे थ्रिल असतं, ते अनुभवण्याकरताच जणू काही हे गुन्हे केले जातात. यातल्या पुष्कळ गुन्ह्याची तर नोंदही होत नाही. पण हे प्रकार किती बोकाळलेत, हे मला सांगायला नकोच. तसंच बँकेमधून अफरातफर, भागीदारीत लाडीलबाडी, वायदे पुरे न करणे असले सुशिक्षित गुन्हेही वाढले आहेत. सुशिक्षिताचे हे गुन्हे केवळ पैशाशीच संबंधित असतात असं नाही, तर एकूणच कायद्यातून पळवाटा काढणं, चुकीच्या ठिकाणी गाडी उभी करणं, वाहनाचा वेग किंवा दिवाबत्ती नसणं, असे, म्हणजे 'चलता है'– असल्या निष्काळजी वृत्तीतून घडत असतात. सुशिक्षितांची ही अवस्था, तर बकाल वस्तीतून आलेल्या तरूण मुलांकडून तर काय अपेक्षा ठेवावी ? अशी गुड मुलं चोरीच्या पैशाचं नेमकं करतात तरी काय, याचा मी एकदा शोध घेतला, तेव्हा कळलं की, हे पैसे फार तर १–२ दिवस त्याच्या खिशात टिकतात. बरेचसे चांगल्या हॉटेलमध्ये बीअर, चिकन–बिर्याणी असल्या छानछोकीत उडवले जातात.'

–एकूण 'बुढी, बीमार माँ की दवाई की लिए मजबूरन' चोरी करणं हे फक्त हिंदी चित्रपटातच असतं म्हणायचं !

'एकूणच हॅवज् आणि हॅव नॉटस् याच्यामधली दरी इतकी प्रचंड आहे की, पैशाचा योग्य आणि फायदेशीर विनियोग कसा करावा याचीही जाण त्यांना समाज अथवा शिक्षणानं दिलेली नाही.

'त्याचबरोबर आणखी एका गोष्टीचा विचार करायला हवा, तो म्हणजे पोलिसांचा अपुरा पगार. कौटुंबिक जबाबदाऱ्या या सर्वसामान्य माणसाप्रमाणेच भेडसावत असताना त्याच्याकडून अत्यंत शुद्ध चारित्र्य, स्वच्छ वागणुकीची अपेक्षा सरसकट केली जाते. पण अशी अपेक्षा करणाराचं वर्तन तरी स्वच्छ असतं का ? पोलिसांमध्ये दारू पिण्याचं प्रमाण सर्वसामान्याएवढचं आहे. ते कमी करण्याच्या दृष्टीनं आणि त्यांना अधिक निरोगी करण्यासाठी मी मनोविकारतज्ज्ञाची मदत घेतो आहे.'

अशा प्रकारची मदत मनोविकारतज्ज्ञ निश्चितपणे देतील, असं आश्वासन देत डॉ· बगाडिया म्हणाले की प्रत्यक्ष गुन्हेगारांमध्ये मानसिक रुग्णाचं प्रमाण काहीसं अधिक असलं, तरी मानसिक रुग्णांकडून भयंकर गुन्हे घडण्याची शक्यता तशी कमी असते. कारण गुन्हा घडवून आणण्यासाठी लागणारं योजनाबद्ध वर्तन हे त्यांच्या बौद्धिक आवाक्याबाहेरचं असतं. कुठलाही गुन्हा हा बहुधा बदलत्या समाजपरिस्थितीचा परिपाक असतो. डॉ. बगाडियांच्या मते, शहरातली बकाल वस्ती याला पुष्कळशी जबाबदार आहे. अनेक पोटार्थी मुंबईत येतात, इथेच राहतात. त्याची पुढली पिढी शिक्षण घेते, पण त्यांना रोजगाराची हमी नसते. रिकामं मन आणि त्या जोडीला रिकामे हात, म्हणजे सैतानाला आमंत्रण. पण खरं म्हणजे, आपल्या देशात जे प्रचंड दारिद्र्य आहे, त्या मानानं गुन्हेगारी कमीच आहे ! याला कारण म्हणजे भारतीय मनाची जडण-घडण, अध्यात्मानं तत्वज्ञान म्हणून माडलेला, आणि आपण दैववाद म्हणून स्वीकारलेला कर्मसिद्धान्त हे यामागच कारण ! दारिद्र्य हे दैवदत्त आहे, आपल्या मागच्या जन्मीच्या वर्तनाची फळं आहेत, असं म्हणून प्राप्त परिस्थितीचा स्वीकार होतो. गुन्ह्याला चिथावणी फारशी मिळत नाही.'

जस्टिस कोतवालांनी या सगळ्याच प्रश्नाकडे वेगळ्याच दृष्टीनं पाहिलं. त्याच्या मते, न्यायदान करताना गुन्ह्यापेक्षा गुन्हेगाराकडे पाहून न्यायदान केलं जातं (क्रिमिनल इज द फोकस, नॉट द क्राइम). पूर्वी गुन्हा हा शिक्षापात्र मानला जात असे, तर आता गुन्हा घडण्यापूर्वीची गुन्हेगाराची वृत्ती, गुन्ह्याची परिस्थिती, घडलेल्या गुन्ह्यामधून गुन्हेगारानं नेमक काय मिळवलं, गुन्हा कसा आणि का घडला, गुन्हेगाराचं वय या सगळ्याचा विचार करून मगच न्याय दिला जातो. यामध्ये आरोपीच्या मानसिक अवस्थेची जाण न्यायाधिशाला असणं आवश्यक असतं. या कामामध्ये मनोविकारतज्ज्ञ मह-

त्याची भूमिका बजावू शकतात. कोतवालांनी या संदर्भात काही सुप्रीम कोर्टातल्या निकालाची उदाहरणं दिली. त्यामध्ये एका केसमध्ये गुन्हेगाराच्या मानसिक अवस्थेकडे बघून गुन्हेगार विचित्र कोडीत सापडल्यामुळे त्यानं गुन्हा केला, असा निष्कर्ष काढून हायकोर्टानं ठोठावलेली फाशीची शिक्षा रद्द करून जन्मठेपेची शिक्षा दिली गेली. तसंच पुण्याच्या गाजलेल्या जोशी-अभ्यंकर खून खटल्यात आरोपींना दिलेली फाशीची शिक्षा सुप्रीम कोर्टाने बदलली नाही, याचं कारण त्या आरोपीमध्ये असलेली मानवी जीवनाबद्दलची पाशवी आणि निर्दय अनास्था, क्रूर स्वार्थीपणा, आणि त्यानी पसरवलेल दहशतीचं वातावरण यामुळे तरुण असूनसुद्धा त्याची शिक्षा कायमच राहिली. अशा प्रकारे, मानसशास्त्र हे योग्य न्यायदानाचा अपरिहार्य भाग झालेलं आहे. जस्टिस कोतवालांच्या, भाषणातला हजरजबाबीपणा आणि संयत, गंभीर चेहऱ्यानं केलेला मर्मभेदी विनोद खास न्यायमूर्तीला शोभणारा होता. ते म्हणाले, न्यायव्यवस्था आणि मानसशास्त्रज्ञ याच्यात देवाण-घेवाण असावी. त्यात लाच एक भाग म्हणजे तुम्ही मला आज जेवायलाही बोलावलं आहे! अर्थात बदल्यात मी तुम्हाला जेवायला बोलावीन असं मात्र समजू नका !!

श्रोत्यानी विचारलेल्या काही शंकाही इंटरेस्टिंग होत्या. उदाहरणार्थ, डॉ. लाकडावाला यांनी एक पेचप्रसंग माडला. ते बालामानसतज्ज्ञ आहेत. त्यांच्याकडे एका सतत खोटं बोलणाऱ्या, फसवणाऱ्या छोट्या मुलाची केस ट्रीटमेंटसाठी आली. एक दिवस, 'आपण ठरलेल्या वेळेपेक्षा उशीरा येत आहोत, कारण आपल्या घरावर आयकर अधिकाऱ्याची धाड आली आहे' असा त्याच्या पालकांचा फोन आला. म्हणजे या मुलापुढे आदर्शच जर फसवणुकीचे आणि खोटं बोलण्याचे मांडले जात असतील, तर त्याच्याकडून अपेक्षा तरी दुसरी कसली करणार ?

त्याचबरोबर आपलं वैफल्य मुलाना बेदम मारझोड करून व्यक्त करण्याचे प्रकार, जे समृद्ध देशात विपुल प्रमाणात आढळतात, पण आपल्याकडे आजतागायत कमी प्रमाणात होते, ते हल्ली अधिकाधिक दिसू लागले आहेत. याचाही गांभीर्यानं विचार व्हायला हवा.

एकूणच वाढत्या गुन्हेगारीकडे समाजधुरिणानी आपापल्या शास्त्राचा, ज्ञानाचा आणि अनुभवाचा वापर करून सूत्रबद्धतेनं पहायलां हवं आणि ते शक्यही आहे, असा दिलासा या परिसंवादामुळे मिळू शकला विशेषत: कोणत्याही परिसंवादातून काही निश्चित निष्कर्षात्मक हाती लागेल यावरचा माझा तरी विश्वास उडत चालला होता. तेव्हा या परिसंवादातून त्याबाबतही भरपूर दिलासा मिळाला !

—ललिता बर्वे

कामगारवृत्त

# नेते अमेरिकेत, मालक ताठ!

उद्योगधंद्यात टाटा, बिर्ला याच्यासारख्या मोठमोठ्या उद्योगपतीच्या पंक्तीत मफतलालचेही नाव आता घेतले जाते. अशा या मफतलाल ग्रुपचा मुंबई कळवा येथील 'मफतलाल इंजिनिअरिंग इंडस्ट्रिज लिमिटेड' हा कारखाना गेल्या ४ डिसेंबर १९८१ पासून बंद असल्याने येथील चार हजार कामगार उपासमारीचे जिणे जगत आहेत.

दोन युनियनच्या वैरामुळे कारखान्यात जे दहशतीचे वातावरण तयार झाले त्याची दखल लगेच घेऊन कंपनीने ४ डिसेंबर ८१ पासून येथे टाळेबंदी जाहीर केली आहे.

१९७६ पासून या कारखान्यात प्रसिद्ध कामगार-नेते श्री. मनोहर कोतवाल यांची मजदूर युनियन ही मान्यताप्राप्त संघटना आहे. या मान्यताप्राप्त संघटनेने १९ फेब्रुवारी १९८१ रोजी व्यवस्थापकांबरोबर वेतनश्रेणीबाबतचा एक नवा करार करून कामगाराना १२५ रुपयांपासून ३७५ रुपयांपर्यंतचे पगारवाढीचे फायदे मिळवून दिले. या मान्यताप्राप्त युनियनने या नव्या कराराची अंमलबजावणी १ सप्टेंबर १९७९ पासून केल्याने कामगारांना मागील सतरा महिन्यांची एकूण ९५ लाख रुपये थकबाकी वाटण्यात आली. शिवाय चारशे कामगाराना कायमही करण्यात आले.

पण दिवाळी जसजशी जवळ येऊ लागली तसतसे कामगार या वर्षी बोनस किती मिळणार, याची चर्चा करू लागले. सर्व कामगाराना आशा होती की, या वर्षी कमीत कमी २० टक्के बोनस मिळेल. इतका बोनस मिळेल, असे कोतवालानीही सांगितल्याने कामगार मोठ्या आशेने बोनसची वाट पहात होते; परंतु १७ ऑक्टोबर १९८१ रोजी मान्यताप्राप्त युनियनशी बोनसचा करार होऊन कामगाराना कायद्याप्रमाणे ८.३३ टक्के अधिक ७.५ टक्के असा १५.३८ टक्के इतका बोनस जाहीर करण्यात आला.

कामगारांना जेव्हा ही वार्ता समजली तेव्हा ते चिडून उठले. २० टक्के बोनसची शक्यता असताना १५.३८ टक्के इतका बोनस का देण्यात आला, असा काही तरुण कामगाराचा सवाल होता. येथूनच पुढील युद्धास सुरुवात झाली. कारण मनोहर कोतवालांनी व्यवस्थापकाबरोबर जो करार केला होता त्याची माहिती कामगारांना देण्यात आलेली नसल्याने कामगारांत असंतोष धुमसत होता. त्यातच नवीन कराराचे फायदे उत्पादनाशी निगडित असल्याने उत्पादन देण्यासाठी अनेक बंधने येऊन पडली

विचारस्वातंत्र्य, व्यक्तिस्वातंत्र्य, लेखनस्वातंत्र्य या मूलभूत मानवी हक्कांवर श्रद्धा असणाऱ्यांना विचार करायला लावणारी प्रभावी जीवनकथा

मॅक्झिम गॉर्की

सुमती देवस्थळे

मूल्य बहा रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

होती म्हणूनच कामगारांमध्ये क्षोभ वाढत होता.

याचं पर्यवसान असं झालं की, काही तरुण कामगारांनी झुजार कामगार नेते डॉ. दत्ता सामंत यांना भेटून त्यांचं नेतृत्व या कारखान्यात आणलं. मनोहर कोतवालानी केलेल्या पहिल्या कराराची मुदत ३१ मार्च १९८४ पर्यंत असताना डॉ. सामंतानी २३ ऑक्टोबर रोजी गेट मिटिंग घेऊन आपल्या असोशिएशन ऑफ इंजिनिअरिंग वर्कर्सला मान्यता द्यावी, २५० रुपये वेतनवाढ व बोनस मिळावा, अशी मागणी केली. त्यानंतर कंपनीला ९ नोव्हेंबर रोजी पत्र पाठवून आपल्या युनियनला मान्यता देण्यात यावी, अन्यथा संपावर जाऊ, अशी नोटिस देण्यात आली.

येथून पुढे मात्र या कारखान्यात दहशतीचे आदोलन सुरू झाले. बोनसची रक्कम 'अंडर प्रोटेस्ट' घ्यावी असा सल्ला डॉ. सामंतांनी आपल्या कामगाराना दिला. काम चालू असताना मशिनशॉप खात्यात कामगारानी डॉ. सामंताच्या नावाचा जयजयकार केला.

परंतु इतक्यात आणखी एक घटना घडली. डॉ. सामंतांची संघटना मोडून काढण्यासाठी बाहेरील गुंड कारखान्यात आणले, या कारणासाठी कामगारांनी मेन ऑफिसवर एक मोर्चा नेला. त्या लोकांना बाहेर काढल्याशिवाय आम्ही काम करणार नाही, अशी ताठर भूमिका मोर्चात घेण्यात आली.

त्यानंतर डॉ. सामंताच्या पाठिराख्यानी मान्यताप्राप्त संघटनेच्या पदाधिकाऱ्यांना कारखान्यात फिरण्यास व कामगारांना भेटण्यास हरकत घेतली, या कारणासाठी अधिकाऱ्यांना घेराव घालण्यात आला. कंपनीचे फिनान्शियल कंट्रोलर श्री. व्ही. आर. भाटिया याची गाडी काही गुंडानी फॅक्टरीजवळ अडवली व त्यांना धमक्या दिल्या. इतर अधिकाऱ्यांना धमक्या देण्याचे सत्र चालूच होते. त्याचबरोबर 'काम बंद'चीही घोषणा कधीकधी दिली जात होती. या सगळ्यामुळे कंपनीच्या उत्पादनावर भयंकर परिणाम झाला. उत्पादन घटल्याने आणि कारखान्याच्या आवारात दहशत वाढल्याने कंपनीने एकूण ४२ जणांना सस्पेंड केले.

१९ नोव्हेंबरला डॉ. सामंतांची दुसरी गेट मीटिंग झाली. त्यामध्ये डॉ. सामंतांनी, २६ नोव्हेंबरच्या आत या ४२ कामगारांना आतमध्ये घ्या, नाही तर आमचे आम्ही काहीही करू, असे व्यवस्थापनाला स्पष्टपणे बजावले; पण याची कोणतीच दखल व्यवस्थापनाने न घेतल्याने २६ नोव्हेंबरपासून 'काम मंद'ला सुरुवात झाली. २९ नोव्हेंबरला चहाबरोबर नेहमीचा नाष्टा न आल्याने कामगारांनी अर्धा दिवस कामही केले नाही.

या सर्व गोष्टीची गंभीरपणे दखल घेऊन कंपनीने १५ दिवसाचा पगार देऊन ४ डिसेंबरपासून येथे टाळेबंदी पुकारली. आज या गोष्टीला चार महिने उलटून गेले आहेत. या चार महिन्यांत आपल्याजवळ जे काही साठवलं होतं ते देऊन कामगारांनी हे दिवस कंठले आहेत. पण आता अशा या महागाईच्या दिवसांत कामगार जराही घरी बसू इच्छित नाहीत.

दोन युनियनच्या वैरामुळे आणि व्यवस्थापनाच्या ताठर भूमिकेमुळे कोणत्याही मागण्या नसताना चार हजार कामगार आज विनाकारण उपासमारीच्या भोवऱ्यात सापडला आहे. व्यवस्थापनाला डॉ. दत्ता सामंत नको आहेत, तर कामगाराना मनोहर कोतवाल नको आहेत. त्यामुळे ही एक विलक्षण कोंडी निर्माण झाली आहे.

ही कोंडी कोण आणि कशी फोडणार? ज्या सरकारला आपण निवडून दिले त्याला याबतीत लक्षही घालावयास सवड नाही. मान्यताप्राप्त संघटनेचे नेते मनोहर कोतवाल तर अमेरिकेत जाऊन बसलेत आणि डॉ. सामंत तर गिरणी-कामगारांच्या भोवऱ्यात व ठाण्याच्या निवडणुकीच्या चक्रात अडकलेत. मग या चार हजार कामगारांना कोण न्याय मिळवून देणार?

या कामगाराची कामावर जाण्याची तर इच्छा आहे; पण दहशतीचा बाऊ जास्त झाल्याने त्याच्यात कामावर जाण्याचे धैर्य नाही. म्हणूनच चार हजार कामगारांसाठी सरकारने आता इथे काही तरी तडजोड घडवून आणावी. कामगारांच्या मागण्या काहीच नसताना केवळ दहशतीमुळे हा कारखाना बंद झाला असल्याने सरकारने सर्वमान्य असा तोडगा काढून कामगाराना सन्मानाने कामावर येऊ द्यावे व त्याची उपासमार एकदाची थांबवावी. कामगार कामावर जाण्यासाठी कोणाच्या तरी मध्यस्थीची अपेक्षा करतो आहे. त्याला साथ देणे हे आता सर्वांचेच कर्तव्य आहे. याच दृष्टिकोनातून पावले टाकावयास हवीत व ही कोंडी फोडावयास हवी.

—मोहन शं. कुलकर्णी, घाटकोपर


# टॉलस्टॉय – एक माणूस

दुसरी आवृत्ती

लेखिका : सुमती देवस्थळे

किंमत : ५५ रुपये

राजहंस प्रकाशन, १०२५ सदाशिव, पुणे ३०

उत्तरमीमांसा : ४७ :

स. शि. भावे

# वृद्धांनी किती जगावे? कसे जगावे?

आज मला अभूतपूर्व आनंद झाला आहे. हा आनंद अती दुर्मिळ आहे म्हणून वाचकाना त्या आनंदात सहभागी करून घेण्याचा मोह मला होतो आहे.

ऑक्टोबर ७९ मध्ये मी विद्यापीठाचा परीक्षक म्हणून जे काम केले त्याच्या मानधनाचा धनादेश पुणे विद्यापीठाकडून मला दोन-चार दिवसापूर्वी मिळाला आहे.

या आनंदाची गोडी, माझ्यासारख्या अध्यापक नसलेल्यांना खरोखरीच कळायची नाही. ते म्हणतील, तब्बल अडीच वर्षांनी मेहेनतना मिळाला. त्याचा काय एवढा आनंद मानायचा? मी त्याना असे विचारतो की, समजा अजून अडीच वर्षे हा धनादेश आला नसता, तर मी काय करू शकलो असतो? काहीही न करता मला निमूट बसावे लागले असते.

कारण, विद्यापीठाच्या नियमावलीत बाकी सारे नियम व त्यांचे तपशील आहेत. फक्त विद्यापीठाने इतराना जे पैसे देणे, ते किती व केव्हा, याचे नियम नाहीत. प्रश्नपत्रिका किती तारखेच्या आत काढायच्या, 'उत्तरपत्रिका तारखेच्या आत तपासून द्यायच्या, निकाल केव्हा लावायचा याचे नियम आहेत. हे नियम जर मोडले गेले तर दंडाची तरतूदही आहे. कोणे एके काळी, परीक्षकांना मेहेनताना केव्हा मिळावा,याचाही नियम होता. निकाल जाहीर झाल्यानंतर, दीड महिन्यानतर व दोन महिन्यांच्या आत मेहेनतान्याचा धनादेश येत असे. काही कारणांनी थोडा उशीर झालाच तर तो तीन महिन्याच्या पलीकडे जात नसे. विशेष म्हणजे, उशीराबद्दल दिलगिरी व्यक्त केली जात असे. आज तो नियम नाही व ते दिलगिरी व्यक्त करणारे अधिकारीही नाहीत.

आज सर्वत्र दिसते ती विलक्षण थंड बेफिकिरी आणि प्राध्यापकाबाबत विलक्षण तुच्छता. प्राध्यापकांबाबतच नव्हे, तर मुद्दाम निमंत्रित केलेल्या तज्ज्ञ विद्वानांबाबतही अशी बेफिकिरी दिसते. परवाचीच गोष्ट. एका अभ्यासमंडळाची सभा होती. सभेसाठी मंडळाचे स्वीकृत सदस्य म्हणून मुबईहून एक शासनाने सन्मान केलेले कवी, एक विख्यात सपादक-प्रकाशक आणि एक श्रेष्ठ कवी आमदार असे हजर होते.

रीतीप्रमाणे त्यांनी प्रवासशुल्काचे बिल तयार करून दिले. त्या बिलात रेल्वेचे नवे वाढलेले भाडे जे त्यांनी स्वत.च्या खिशातून भरले होते ते दाखवले होते.हिशेब खात्याने तो आकडा कमी केला. जुन्या रेल्वेभाड्याचा आकडाच ग्राह्य धरला. तेवढे पैसे कमी दिले. तज्ज्ञ विद्वान घोटाळ्यात पडले. त्याची अडचण सोडवण्याचा प्रयत्न मडळाच्या अध्यक्षानी केला. त्यांच्या विचारणेला उत्तर मिळाले, 'नव्या रेल्वेदराचा रेडी रेकनर आम्हाला अजून मिळालेला नाही. तो मिळाल्यानंतरच नव्या दराने हिशेब करू आणि त्यानंतरही हे जुने हिशेब बदलून मिळणार नाहीत.'

विद्वानाना प्रश्न पडला. हे कमी झालेले बिल घ्यावे, की नाकारावे? एक कायदातज्ज्ञ म्हणाले, 'तुम्ही हे बिल नाकारा. नंतर कोर्टात जा. नव्या दराने त्यांना पैसे द्यावेच लागतील.' दुसरे गृहस्थ व्यवहारी होते. ते म्हणाले, 'आत्ता आले आहे ते बिल घ्या. उरलेल्यासाठी नंतर पत्र लिहा.' तिसऱ्यानी व्यवहारी गृहस्थांना दुजोरा दिला. ते म्हणाले, 'त्या पाऊणशे वर्षांच्या साहित्यिकांचे साधे शंभर रुपये त्यांना अजून मिळालेले नाहीत. ते काय या वयात शंभर रुपयासाठी कोर्टात जाणार? बसलेत वाट बघत. जे देऊ केलय ते परत घेण्याच्या आत उचला!'

कायदातज्ज्ञ रागावले. म्हणाले, शिव्यागाळी करणारांची लठ्ठ प्रवासबिले ताबडतोब दिली जातात निमत्रित तज्ज्ञ विद्वानाना मात्र अशी वागणूक, हे सहन होणे शक्य नाही!'

व्यवहारी गृहस्थ मात्र म्हणाले, 'सारं काही सहन होतंय. आपलीच छोटी छोटी कामं असतात. ती करून घ्यायची तर असं तोडून कसं चालेल?'

त्या तज्ज्ञ विद्वानानी यावर दुरुस्त, म्हणजे कमी केलेली बिले घेतली की नाही, मला माहीत नाही. पण नुकताच घडलेला हा प्रकार आठवला आणि मला अडीच वर्षांनंतर आलेल्या धनादेशाचे मोठेच कौतुक वाटले आणि तब्बल एक वर्षानंतर आलेल्या १५ रुपयांच्या धनादेशाचे तर अपूर्व कौतुक वाटले. अडीच वर्षे विद्यापीठाने माझ्या पैशाचे व्याज घेतले व ती रक्कम कमी नाही, ही टोचणीदेखील मी माझ्या अभूतपूर्व आनंदात विसरलो आणि हे आनंदाचे वृत्त आपल्या वाचक मित्रास त्वरेने कळविलेच पाहिजे, असे ठरविले.

¤

विद्यापीठाकडून अडीच वर्षांनी तरी धनादेश आला हे कळविणे एवढाच काही अर्थात् माझा उद्देश नाही. असेच धोरण विद्यापीठाने चालू ठेवले तर त्यातून प्राध्यापकाना निवृत्तीनंतर उपयोगी पडेल अशी योजना निर्माण होऊ शकेल, असे वाटल्याने हा धनादेश आजच्या मीमासेत आला आहे.

म्हणजे असे : वय वर्षे तीस ते साठ या तीस वर्षांत प्राध्यापकाने जे जे म्हणून परीक्षकाचे काम केले असेल, त्याचा मेहेनताना त्याला त्या त्या वेळी द्यायचाच नाही. तर त्या त्या रकमा 'पुनर्गुंतवणूक योजने'त (reinvestment plan) गुंतवायच्या तीस वर्षांनंतर ही रक्कम व्याजासह घसघशीत होईल. ती मग वय वर्षे ६० पासून ७५ पर्यंत किंवा ८० पर्यंत दरमहा अमुक इतकी, अशी प्राध्यापकाला परत मिळत राहील असा हिशेब आखायचा!

नाही तरी कामाचा, हक्काचा पैसा असूनही तो प्राध्यापकाना मिळत नाही. शिवाय सर्व प्राध्यापकाच्या मेहेनतान्याचे जबर व्याज अलगद विद्यापीठाच्या खिशात जाते! ते व्याज ज्या त्या प्राध्यापकाच्या खात्याला जमा होत राहील. या योजनेला सरकारने संमती द्यावी आणि योजनेच्या कार्यवाहीची हमी घ्यावी. म्हणजे परीक्षकाचे मानद्रव्य आणि त्याचा निवृत्तिनंतरचा काळ याची योग्य सागड घातली जाईल.

वृद्धाची आयुष्यसध्या सुखाची जावी यासाठी आज जे प्रयत्न होऊन राहिले आहेत त्यापैकी उत्तम प्रयत्नात विद्यापीठाच्या या सभाव्य योजनेची गणना होईल यात शका वाटत नाही.

सध्या अशा योजनाचा विशेष विचार चालू आहे. कारण जागतिक आरोग्यदिनाने

यंदा 'जीवन संध्या चैतन्यमय होवो!' (Add life to years) हा विषय यंदाच्या वर्षीचा खास विषय म्हणून घेतला आहे. त्यानिमित्त डॉ. सौ माया नातू, डॉ मोहन आगाशे, सतीश आळेकर इ. मंडळींनी पुण्यात चार दिवसांचा एक कार्यक्रम योजिला होता. या कार्यक्रमात वृद्धांच्या विविध समस्यांचा चांगला ऊहापोह झाला. वार्धक्यात चैतन्य कसे आणावे, हेच या विचारविनिमयाचे मुख्य सूत्र होते.

¤

वार्धक्यात चैतन्य कसे टिकवायचे, ही समस्या हुलकावणी देणारी आणि म्हणून कठीण आहे. ही समस्या सुटायची, तर म्हातारपणच्या समस्या लक्षात घेण्याआधी म्हातारपण हीच एक समस्या आहे, हे लक्षात घ्यायला हवे आहे.

म्हातारपणच्या समस्यांची चर्चा आज सगळीकडे चालू आहे. असे होणे स्वाभाविकही आहे. कारण आज जगात चर्चा करणारे म्हणून जे आहेत त्यांच्यात बहुसंख्य मंडळी वृद्ध किंवा वार्धक्यात नुकताच प्रवेश करणारी अशीच आहेत. स्वत च्या समस्यांचा या बहुसंख्यांनी विशेष विचार करावा, हे स्वाभाविक होय.

जर्मनीमधील लोकसंख्या-अभ्यासकानी तर असा इशारा दिला आहे की, येत्या दोन दशकांत जर्मन लोकात वृद्धांचे प्रमाण वाढतेच राहणार आहे. लोकसंख्या भरमसाट वाढू नये म्हणून सर्वांत कडवा प्रयत्न करणारे लोक म्हणजे जर्मन. (तसे कोणत्याही उपक्रमात जर्मन लोक म्हणजे कडवेच.) कुटुंबनियोजनाचे तंत्र त्यानी परिपूर्णतेला नेले आहे. त्यामुळे लोकसंख्यावाढीचे त्याचे प्रमाण गेली काही वर्षे शून्यावर आले आहे. हे शून्य प्रमाण असेच राहिले तर एक बालक, एक युवा व दोन वृद्ध, असे प्रमाण होईल आणि सन २००० मध्ये हेच प्रमाण १ : ३ : २५ असेही होईल, असा तज्ज्ञाचा अंदाज आहे.

असे झाले म्हणजे कोणतीही सामाजिक बाब, ही प्राधान्याने वृद्धांचीच बाब होईल. सामाजिक विचार हा मुख्यत्वे वृद्धविचार होईल. समाजाच्या विचाराचा—आचाराचा म्हणजे अस्तित्वाचाच उचित तोल ढळेल—असा धोका या तज्ज्ञानी दाखवून दिला आहे.

म्हणजे पाहा: 'जीवेत् शरदः शतम्।' अशी शुभेच्छा आपण देतो-घतो; परंतु जितके जास्त लोक असे शंभरी गाठून किंवा शंभरीच्या जवळ राहून जिवंत, निरोगी आणि आनंदी राहतील, तितक्या प्रमाणात नव्या बाळाना जन्मासाठी जागा कमी कमी मिळू लागेल. कारण लोकसंख्येची वाढ होणे हेही परवडणारे नाही !

सध्याच्या वेगाने लोकसंख्येची वाढ होत राहिली तर काय होईल, याची अनेक भयावह कल्पनाचित्रे शास्त्रज्ञानी अंदाजाने रेखाटली आहेत. डॉ जयंत नारळीकरांनी एका व्याख्यानात अंदाजलेले चित्र मला नेहमी आठवते : येत्या शतकाचे चौथे किंवा पाचवे दशक आहे पृथ्वीभोवतालचा प्राणवायू माणसाना आणि प्राण्यांना मिळून अपुरा पडू लागला आहे. प्राणवायू अपुरा पडल्याने माणसे मरत तरी आहेत, किंवा त्यांच्यात शारीरविकृती तरी निर्माण होत आहेत.

अर्थात, प्राणवायूचा साठा, पृथ्वीचे अन्य घटक यांची मर्यादित स्थिती लक्षात घेता लोकसख्या मर्यादित ठेवली पाहिजे, हे उघड आहे. विचार करू शकणाऱ्या आणि इच्छिणाऱ्या कोणालाही ते पटेल.

पुढचा आणि आज आपल्यासमोर असलेला, पण आपल्याला गंभीरपणाने न जाणवणारा प्रश्न असा आहे की, नियोजित लोकसंख्येत वेगवेगळ्या वयोगटांचे प्रमाण कोणते असावे ? समाजाची व्यवस्थिती आणि प्रगती यासाठी कोणते प्रमाण आदर्श मानावे ? आणि जेथे असे आदर्श, संतुलित प्रमाण नसेल अशा समाजात हे प्रमाण यावे, यासाठी काय करायला हवे ?

सध्या समाजापुढे लोकसंख्येला आळा घालण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे जननियंत्रणाचा. आणि या मार्गाने वयोगटाचे संतुलन साधणार नाही, हे स्पष्ट आहे. मग करावयाचे काय ?

¤

बऱ्याच वर्षांपूर्वी इरावती कर्व्यांनी वृद्धांबाबत लिहिताना (भटामध्ये) 'आम्हाला मरू द्या' असे म्हटले होते. वृद्धांच्या अनेक समस्यांना कंटाळून त्यानी तसे म्हटले होते. जयवंत दळवी यांच्या 'संध्याछाया' तील वृद्ध जोडप्याने हाच मार्ग स्वीकारलेला आहे. ते नाटक बघताना अनेक वृद्धांच्या मनावर विलक्षण ताण येतो, आणि तरीही, त्यांना ते नाटक आपले स्वत चे वाटते.

'संध्याछाया'मधील नाना-नानी एकाकी झाली आहेत. इतर जगाला त्यांच्यात काही रस उरलेला नाही. जे कुटुंब त्यांनी खस्ता खाऊन उभारले त्या कुटुंबाची ऊब त्यांना उरलेली नाही. पाखरे दूर उडून गेली आहेत. त्यांची नवी, नव्या धर्तीची कुटुंबे उभी राहू लागली आहेत. या नव्या कुटुंबांत नानानानींना जागा नाही. म्हणजे, जे आपल्याला हवे आहेत, त्यांना आपण नको, आणि इतर कुणालाही आपण नको, साऱ्या जगालाच आपण नको—असे त्यांना होते. ज्या जगाला आपण नको, ते आपण होऊन सोडावे, हा शहाणपणा, आणि सभ्यपणा. नाना-नानी तेच करतात.

नाना-नानींची ही भावनात्मक तुटलीक आज अनेक वृद्धांच्या मनात असेल. 'आता संपावे' असे अनेकांना वाटत असेल. फक्त कोणाला श्रद्धा, कोणाला माया, कोणाला भीती असे आड येत असेल. कै. काकासाहेब अवचटाचे धैर्य आणि मनस्वीपणा सर्वांजवळच नसतात.

पण हा झाला भावनात्मक वैताग. येत्या पन्नास वर्षांत वस्तुस्थिती अशी येणार आहे की, समाजाच्या संतुलनासाठीच वृद्धाना मरावे लागणार आहे. कोणाची इच्छा असो, अगर नसो, जननाचे आणि मरणाचे असे दोन्ही टोकांचे नियोजन समाजाला करावे लागणार आहे.

मानवाने निसर्गाचे इतर मार्ग बंद केले आहेत. रोगराई, साथी, दुष्काळ, भूकंप, अपघात अशा दुर्घटनानी पूर्वी हजारो, लाखोजण मरण पावत. हे मरण मानवाने आटोक्यात आणले आहे. युद्धात माणसे मरत. त्या प्रमाणावरील युद्धही मानवाने बंद केले आहे. याउलट आरोग्याचे, दीर्घायुष्याचे उपाय त्याने यशस्वी केले आहेत. जीवनाची जणू सारी सूत्रे त्याने हाती घेतली आहेत. अर्थात जननाच्या नियोजनाबरोबरीने मरणाचे सामाजिक व शास्त्रीय नियोजनही त्यालाच करावे लागणार आहे.

मरणाच्या नियोजनाचा हा काळ फार लांबवरचा नाही. आणखी तीसेक वर्षांनी माझा स्वतःचा समावेश अशा नियोजनांत झालेला असेल, अशी कल्पना मी करू शकतो. तीस-पसतीस वर्षांत माझ्यापुढे मग दोनच पर्याय उरतील. नियोजनातील नंबराची वाट

पाहुणे. किंवा, आधीच स्वतःची वेगळी सोय करणे. आधी वेगळी सोय करणे हे मला वाटते, जास्त सुखाचे होईल !

¤

तरी एक प्रश्न उरतोच. 'त्या' वेळेपर्यंत कसे वागावे ?

इतरांनी वृद्धांशी कसे वागावे, याबाबत सध्या बरेच विवेचन होत आहे; पण वृद्धानी इतरांशी कसे वागावे, याचा विचार मात्र फारसा होत नाही.

परवा एक आजोबा भेटले होते. ते म्हणाले, 'वृद्धांनीच आपण इतरांशी कसे वागायचे ते ठरवायला हवे आहे. आपण जसे वागू तसे मग लोक आपल्याशी वागतील,' मी विचारले, 'तुम्ही कसे वागता ? काही ठरवून वगैरे वागता का ?' तर ते म्हणाले, 'अगदी खास ठरवून, कृत्रिम असं नव्हे; पण थोडसं ठरवून वागतो.'

मी म्हटलं, 'मला हे तुमचं वागणं ऐकायला आवडेल. सांगता का ?'

आजोबा म्हणाले, 'साधारणपणे माझं हे ट्रेड सीक्रेट मी कुणाला सांगत नाही; पण तू एवढा विचारतोयस तर सांगतो !' आजोबा सांगू लागले—

'तुमचं मॅनमॅनेजमेंटचं शास्त्र आहे ना ? तसं माझं म्हातारपणचं मॅनमॅनेजमेंट टेक्निक आहे. या टेक्निकचा पहिला मुद्दा हा की, आपला वावरण्याचा गट ओळखणे. दुसरा मुद्दा हा की, गटातील घटकाचे व आपले संबंध चालू ठेवण्यासाठी समान पद्धती—channel—शोधून काढणे. निरीक्षणाने व 'प्रयत्न–प्रमाद' पद्धतीने ही 'रीती' शोधता येते. तिसरा मुद्दा हा—इतरांशी असलेल्या संबधातून समाधान निर्माण झाले पाहिजे आणि या समाधानाचा जास्त वाटा दुसऱ्या व्यक्तीकडे गेला पाहिजे......

'आता माझंच बघ. मला चार मुलगे आणि दोन मुली. म्हणजे आम्हा आजोबा–आजीचे राहण्याचे गट झाले सहा. पैकी मुलींची घरं त्यांची त्यांची. अडी-अडचणीला असले तरी हे गट खास आपले नव्हेत. म्हणजे गट उरले चार. सध्या हे चारी गट चढाओढीने आम्हाला त्यांच्याकडे राहायला बोलावत असतात......

कारण, आम्ही गट नीटपणे समजून घेतलाय. आता गटाचा प्रमुख कोण ? तर मुलगा नव्हे, सूनबाई ! या सूनबाईशी त्यांना समाधान देणारा संबंध प्रस्थापित करायचा. प्रथमच त्यांना सांगायचे की, आमचा मुलगा ज ऽ रा वेंधळा आहे. ती आहे म्हणून घर चालले आहे. नंतर सांगायचे की, सूनबाईंचे आई-वडील म्हणजे अगदी देवमाणसे ! सूनबाईला या देवमाणसांचे वळण आहे. हे विश्लेषण ऐकता ऐकता सूनबाईला पटते की, आपल्या सासू-सासऱ्यांना खरी समज आहे......

'मग शेवटचा प्रयोग करायचा. सूनबाईच्या भावाचे नुकतेच लग्न झालेले असते. अर्थातच तिचे माहेरी जाणे कमी झालेले असते. अशा वेळी तिची वैनी तिच्याकडे येऊन गेल्यावर आपण एवढेच म्हणायचे की, 'बाकी सगळं ठीक आहे; पण मुलगी थोडी चमत्कारिक वाटते. का कोण जाणे !' या विश्लेषणानं सूनबाईच्या डोळ्यात पाणीच तरळतं. 'तुम्हाला म्हणून हे समजतं, मामंजी' अशी तिची रुद्ध स्वरात पावती मिळते......

'एकदा गटप्रमुख सूनबाई अशा अनुकूल झाल्या की, दोनतृतीयांश काम फत्ते ! उरलेला एकतृतीयाश निलेश आणि शर्वरी या नातवंडांनी वाटून द्यायचा. निलेशशी संदीप पाटील आणि ग्रेग चॅपेल याच्याविषयी बोलायचं. शर्वरीशी कुमार गौरव, संजय दत्त आणि प्रकाश पदुकोण यांच्याविषयी बोलायचं. मधूनच दोघांना नाझिया, झोहेब या हसनभावंडांची बिट्टूनं काढलेली कॅसेट आणून द्यायची, म्हणजे आपली गट्टी पक्की होते......

'मग दोन महिने झाले की, गट क्रमांक दोनकडे प्रयाण करायचं. निघताना सूनबाई, निलेश आणि शर्वरी अजिबात जाऊ देत नाहीत; पण आपण आग्रहाला दाद द्यायची नाही. निघायचं म्हणजे निघायचं ! कारण सूनबाई क्रमाक दोन, तमंच अभि आणि मीनल तशाच आग्रहानं न्यायला आलेली असतात ना !' आजोबा थांबले.

त्याना नक्की काय म्हणायचं आहे, हे आपल्याला कळतंय असं मला वाटू लागलं होतं. तुम्हाला तर ते कळलंच असणार. तर ते इथे स्पष्ट कशाला सांगू ?

म्हातारपणी हीच एक समस्या आहे, हा महत्त्वाचा मुद्दा राहूनच गेला. हरकत नाही. पुन्हा केव्हा तरी.

□


**दलित-दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारे गोष्टीरूप आंबेडकर चरित्र**

सर्व मराठी मुलांच्या हाती हा 'कथा-संग्रह' देणे योग्य ठरेल! दलित–दलितेतर या भेदांना ओलांडून जाणारा हा स्फूर्तिदायक कथा-संग्रह संस्कारक्षम मुलांना अत्यंत उद्‌बोधक वाटेल. इतिहासाचे सर्जनशील साहित्यात कथारूपाने जे रूपांतर होते ते सिद्धहस्त लेखक कसे सोन्यासारखे करून दाखवितो त्याचा पुरावा बागुलांच्या या गोष्टीरूप चरित्रातून मिळतो.

—रा. ग. जाधव
(केसरी, रविवार, ६-१२-८१)

# आंबेडकर भारत

लेखक बाबुराव बागुल

राजहंस प्रकाशन, पुणे. मूल्य : वीस रुपये

अवतीभवती । शरद कृष्णन

# □ आगामी विधानसभा निवडणुका

प. बंगालमधील मतदारयाद्यांच्या संदर्भात न्यायालयात कुजत पडलेले प्रकरण निकाली निघाल्याने ज्या राज्यामध्ये निवडणुका घेणे आवश्यक आहे अशा सर्व राज्यांच्या निवडणुकांचा कार्यक्रम निवडणूकमंडळाने घोषित केला आहे. या घोषित कार्यक्रमानुसार १९ मे रोजी हरियाना, प. बंगाल, हिमाचल प्रदेश व केरळ या राज्यांमध्ये निवडणुका घेण्यात येणार आहेत. निवडणुकाची तारीख घोषित झाल्याने विविध राजकीय पक्षाच्या हालचालीना चांगलाच वेग आला आहे. वरील निवडणुकांखेरीज लोकसभेच्या ६ जागांसाठी पोटनिवडणूक होणार असून त्यात, मध्ये घोषित करूनही दोन वेळा पुढे ढकलल्या गेलेल्या गढवाल मतदार संघाचा समावेश आहे. हेमवतीनंदन बहुगुणा हे या मतदारसंघातून निवडणूक लढवत आहेत.

राज्य विधानसभांसाठी होणाऱ्या निवडणुकापैकी केरळमध्ये होणारी निवडणूक विशेष लक्षवेधी असेल. विसर्जित विधानसभेमध्ये 'युनायटेड डेमोक्रॅटिक फ्रंट' व 'लेफ्ट डेमोक्रॅटिक फ्रंट' या दोन प्रमुख आघाड्याचे बळ समसमान असल्याने सभापतीच्या निर्णायक मताचा टेकू घेऊन करुणाकरन सरकारला काही दिवस राज्य करावे लागले. आता दोन्ही आघाड्या निवडणुकीच्या तयारीला लागल्या आहेत. पहिल्या आघाडीमध्ये इंदिरा काँग्रेसचा वरचष्मा आहे, तर दुसऱ्या आघाडीमध्ये डाव्या कम्युनिस्ट पक्षाचे वर्चस्व आहे. आघाडीमधील पक्षाच्या जागा ठरवण्याचे जिकिरीचे काम सध्या चालू असून कमीत कमी मतभेद होऊन हे जागावाटप व्हावे, यासाठी दोन्ही आघाड्या प्रयत्नशील आहेत. केरळ विधानसभेमध्ये भाजपचा एकही प्रतिनिधी आजवर नव्हता; परंतु आता भाजपला प्रतिनिधित्व मिळण्याची शक्यता आहे. एक गोष्ट नक्की की, कम्युनिस्टाचे वर्चस्व असलेल्या या राज्यामध्ये संघाची व भाजपची शक्ती जाणवण्याएवढी वाढली आहे. आघाड्यांमध्ये सामील असलेल्या एकाही पक्षाला भाजपबद्दल ममत्व नाही. पण भाजपच्या अल्प ताकदीची जाण या पक्षाना आली असल्याने जाहीररीत्या भाजपविरुद्ध शंख करण्यात येत असला तरी खाजगी बैठकीमध्ये भाजपचा अनुनय चालू आहे. कारण चुरशीच्या निवडणुकांमध्ये, संख्येने अल्प असली तरी हुकमी मते निकालावर परिणाम करण्याची जादू करून दाखवू शकतात. कोणत्याही आघाडीमध्ये नसलेल्या, परंतु त्रासदायक ठरावी इतपत शक्ती संपादन केलेल्या भाजपने स्वतःच्या ताकदीवर ४५ जागा लढवण्याचे ठरवले आहे. या पक्षाला २–५ जागा मिळतील की नाही, ही शंका असली तरी निकालावर परिणाम करण्याचे सामर्थ्य या पक्षासाठी मतदान करणाऱ्या हुकमी मतदारांजवळ जरूर आहे. उमेदवार निश्चित करण्याच्या कामाला वेग आला असून हा मजकूर प्रसिद्ध होईतोपर्यंत चित्र बरेच सुस्पष्ट झाले असेल. आज तरी परिस्थिती अशी आहे की, हुकमी व निर्णायक बहुमत कोणत्याच आघाडीला मिळेल असे वाटत नाही; परंतु ज्या पद्धतीने प्रथम डाव्या आघाडीचे सरकार कोसळले आणि नंतर करुणाकरन यानाही जावे लागले, त्या पक्षांतराच्या पद्धतीबद्दल जनतेमध्ये विलक्षण चीड आहे. पक्षबदल करणाऱ्या आमदाराना त्याची किंमत मोजावी लागेल. केरळमध्ये कोणतेही शासन असले तरी अस्थिरता हाच त्याचा पाया असतो. केरळमधील जनतेलाही त्याची सवय झाली आहे. निवडणुका झाल्या तरी अस्थिर सरकारची ही परंपरा खंडित होण्याची शक्यता कमीच आहे.

निवडणुका घोषित झाल्यापासूनच प. बंगाल डाव्या कम्युनिस्टांच्या नेतृत्वाखालील आघाडीला बहाल केला असावा, अशा पद्धतीने इंदिरा काँग्रेससह अन्य पक्षाचे वर्तन आहे. त्यामुळे ज्योति बसू व त्यांचा पक्ष याविरुद्ध आरडाओरडा करणे, निवडणुकांमध्ये गोंधळ होणार आहेत, असे गृहीत धरून आतापासूनच त्याविरुद्ध वातावरण तापवणे यासारखे प्रकार सुरू आहेत. ज्या काही थोड्या मतदारसंघामधून डाव्या आघाडीमध्ये नसलेल्या पक्षाचे उमेदवार सातत्याने निवडून आले आहेत, अशा मतदारसंघावर विरोधी पक्षांचा डोळा असून सर्व विरोधी पक्ष या जागांवर आपला अधिकार सागत असल्याने तडजोड होणेही अवघड होऊन बसले आहे. वानगीदाखल चौरंघी मतदारसंघाचे उदाहरण देतो. या मतदारसंघातून डाव्या कम्युनिस्टाच्या विरोधात असलेल्या उमेदवाराने अनेक वेळा विजय मिळवला आहे. या मतदारसंघावर आघाडीपासून दूर असलेल्या १४उमेदवारांनी दावा केला आहे. या १४ मध्ये प्रियरंजनदास मुन्शी याचा समावेश आहे. याउलट डाव्या आघाडीचे आणि कम्युनिस्टाचे जिथे हुकमी वर्चस्व आहे, त्या बरद्वान, तसेच २४ परगणा पट्ट्यामध्ये आपल्या उमेदवाराचे नाहक बळी देण्यास विरोधी पक्ष तयार नाहीत. अर्थात कोणी ना कोणी उमेदवार शोधून या जागाही लढविल्या जातीलच; पण येथे आपली धडगत नाही, याची पुरेशी जाणीव विरोधी पक्षाना आहे. प्रबळ सत्ताधारी पक्षाविरुद्ध एकच उमेदवार उभा करण्यात विरोधी पक्ष यशस्वी झाले तर विरोधी पक्षाना विजय मिळतो असे नाही; परंतु विजय मिळण्याची शक्यता वाढते, एवढे जरूर म्हणता येईल. प. बंगालमध्येही डावे कम्युनिस्ट आणि त्यांचे सहकारी याच्या विरोधात उभ्या ठाकलेल्या पक्षाना एकास एक उमेदवार, असे धोरण आखता आले तर त्याचा लाभ मिळू शकेल, असे गेल्या निवडणुकीमधील निकालावर दृष्टिक्षेप टाकला तर लक्षात येते. एकास एक अशी लढत जर त्या वेळी झाली असती तर डावे कम्युनिस्ट आणि त्यांचे सहकारी यांना आणखी किमान पन्नास जागा गमवाव्या लागल्या असत्या; पण तसे होऊ शकले नाही. या वेळीही तसा प्रयत्न दिसत नसल्याने इंदिरा काँग्रेस, जनता, लोकदल आदी पक्षाचे स्वतंत्र झेंडे निवडणुकीच्या धामधुमीत मिरवले जातील. १९७७ च्या निवडणुकीमध्ये सध्या सत्तेवर असलेल्या आघाडीने नेत्रदीपक यश मिळवले, तर इंदिरा काँग्रेसच्या सदस्यांची संख्या दोनशे वरून वीसपर्यंत खाली घसरली.

१९७७ ते १९८२ या या पाच वर्षांच्या कालखंडामधील ज्योती

बसू सरकारची कामगिरी पुष्कळच समाधानकारक आहे. केंद्रस्थानी सत्तेवर असलेल्या इंदिरा काँग्रेसबरोबर उघड उघड संघर्षाची भाषा चालू ठेवणारे हे एकमेव राज्य सरकार पाच वर्षे सत्तेवर राहू शकले, हाच एक चमत्कार मानावा लागेल. राज्यपाल बदलण्यावरून झालेला संघर्ष आणि त्यानंतर केव्हाही सत्ताभ्रष्ट होण्याची शक्यता असूनही बसू सरकारने आपल्या मर्यादांमध्ये बसणारी अनेक कामे करून दाखवली. या पक्षाची ग्रामीण भागामधील ताकद गेल्या पाच वर्षांत दुपटीने वाढली, असे विरोधी पक्षही मान्य करतात. प. बंगाल विधान-सभेच्या २९४ सदस्यांपैकी २७० सदस्य याच ग्रामीण भागातून येतात. ही वस्तुस्थिती लक्षात घेतली तर राज्य विधानसभेवर आघाडीचेच वर्चस्व पुन्हा रहाणार, हे मान्य करावे लागते. ग्रामीण भागामध्ये या पक्षाचे सामर्थ्य वाढले, त्याचे मोठे श्रेय या पक्षाचे एक नेते आणि बसू मंत्रिमंडळामधील जमीन सुधारणा विभाग सांभाळणारे मंत्री बिनय चौधरी यांच्याकडे जाते. शेतमजुरांना अनुकूल ठरणाऱ्या सुधारणा त्यांनी अमलात आणल्या. त्यांच्या कर्जाची सोय केली. किमान वेतन कायदा लागू केला आणि मुख्य म्हणजे, हे सारे कागदा-वर न ठेवता प्रत्यक्षात उतरवून दाखवले. राज्यामधील पंचायतीचे नियंत्रण करणारे मंत्री श्री. देवदत्त बंडोपाध्याय यांनी पंचायत-पातळीवर केलेल्या कामाचे फळही सत्ताधारी पक्षाला मिळणार आहे. सत्तेवर असलेला राजकीय पक्ष सर्व मार्गांचा अवलंब करून आपल्या पक्षाची ताकद वाढवत असतो. बसू याचा पक्ष आणि त्याचे सहकारी या बाबतीतही आघाडीवर आहेत. वाटेल त्या मार्गांचा अवलंब करून आपल्याला अनुकूल ठरेल अशी घट्ट यंत्रणा उभी करण्यात बसू आणि कंपनी यशस्वी झाली आहे. सर्व प्रमुख नेमणुका करताना नेमल्या जाणाऱ्या व्यक्तीचा राजकीय रंग पारखून मगच नेमणुका केल्या गेल्या आहेत. त्यामुळे निर्माण झालेल्या बळकट चौकटीचा लाभ सत्ताधारी आघाडीस मिळणार आहे. सत्ताधारी पक्षाची नागरी भागा-मधील प्रतिमा उजळ नाही. कायमची वीजकपात, अकार्यक्षम पोलीस-खाते, वाढती गुन्हेगारी, बेसुमार बेकारी, प्रचंड लोकसंख्या यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांना सत्तेवर असलेले सरकार जबाबदार आहे, अशी भावना नागरी भागामध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे या भागामध्ये विरोधी पक्षांनी नेट लावून काम केले तर त्यांना मोठे यश मिळण्याची शक्यता आहे. तथापि, आपण सत्तेपासून फार दूर असल्याची भावना या पक्षांमध्ये इतकी खोलवर रुजली आहे की, कार्यकर्ते काहीसे हतबल असून काहीही केले तरी काही फरक पड-णार नाही, अशी काहीशी नकारात्मक भूमिका त्यांनी स्वीकारली आहे. तात्पर्य, या निवडणुकीनंतर विद्यमान सत्ताधारी आघाडीला पुन्हा पाच वर्षे सत्ता राबवण्याची संधी मिळण्याची दाट शक्यता आहे

## हरियाना व हिमाचल प्रदेशामध्ये विरोधी पक्षांचा जोर

लोकदल आणि भाजप यांच्यामध्ये सामंजस्य झाले तर हिमाचल प्रदेशामधील निवडणुका इंदिरा काँग्रेस पक्षाला चांगल्याच जड जातील. हरियानामध्येही या दोन पक्षांमधील युतीचा जोरदार दबाव इंदिरा काँग्रेसवर पडू शकेल. सध्याच्या राजकीय हालचाली पाहिल्या तर निवृत्तीची भाषा करत, तळ्यात-मळ्यात करत बसलेले चौधरी चरणसिंग भाजपशी या दोन राज्यांमध्ये युती करण्यास तयार आहेत. भाजपही लोकदलाबरोबर हातमिळवणी करून या दोन राज्यांमध्ये पुन्हा सत्ता संपादन करण्यास उत्सुक आहे. हरियाना-मधील भजनलाल सरकारची प्रतिमा मुळीच उजळ नाही. केवळ सत्तेच्या लोभाने त्यांनी पक्षांतर केले आणि इंदिरा काँग्रेसचा टिळा लावून सत्ता राबवण्यास सुरुवात केली. चरणसिंग, अटलजी व बाबु-जींचा छोटा पक्ष येथे एकत्र येत आहेत. हे तिन्ही नेते प्रचारामध्ये जातीने लक्ष घालणार आहेत. जागा-वाटपावरून लठ्ठालठ्ठी होईलच, परंतु तरीही परिस्थितीच्या दबावामुळे परस्पर सहकार्य टिकून राहील. याउलट इंदिरा काँग्रेसमधील अंतर्गत यादवी मोठ्या प्रमाणात उफाळून येईल. आणि इंदिरा काँग्रेसचे काही प्रमुख नेते विरोधी पक्षांना अप्रत्यक्ष मदत करतील. हरियानामधील एका जमान्यातील सर्वेसर्वा बन्सीलाल नेमकी काय भूमिका घेतात, यालाही महत्त्व आहेच

हिमाचल प्रदेशामधील रामलाल सरकार प्रामुख्याने पक्षांतर करून आलेल्या आमदारांच्या पाठिंब्यावरच उभे आहे. या सरकारची प्रतिमाही फारशी उजळ नाही. जनता पक्ष केंद्रस्थानी सत्तेवर होता त्या वेळी हिमाचल प्रदेशामध्ये शांतकुमार यांचे सरकार सत्तेवर होते. शांतकुमार जनसंघ गटाचे असल्याने तेव्हा स्वाभाविकपणे त्या गटाचे वर्चस्व होते. सध्या ते राज्यपातळीवरील भाजपचे अध्यक्ष आहेत. त्यांची स्वतःची प्रतिमा फारशी उजळ नाही. स्वतःच्या मतदारसंघात त्यांनी जो शाही बंगला बांधला आहे तो चर्चेचा विषय झाला आहे. असे असले तरी या पक्षाची लक्षणीय ताकद असून येथेही मित्रपक्षाबरोबर आघाडी झाली तर इंदिरा काँग्रेसला निवडणुका जड गेल्याखेरीज रहाणार नाहीत. लोकदल—भाजप युतीचा मोठा लाभ हिमाचल प्रदेशात होऊ शकेल, असा चौधरी चरणसिंग यांचा अंदाज असून तो अगदीच बिनबुडाचा नाही.

लोकसभा निवडणुकीपैकी सर्वांत महत्त्वाची निवडणूक गढवाल मतदार संघात लढवली जाणार आहे. हेमवतीनंदन बहुगुणा यांना अजूनही ही निवडणूक होईल की नाही, याबद्दल खात्री नाही. बहुगुणा यांना अनेक विरोधी पक्षांचा पाठिंबा आहे. या निवडणुकीबद्दल ते ज्या पद्धतीने बोलतात त्यावरून आणि इंदिरा काँग्रेसने या निवड-णुकीबाबत जी भूमिका घेतली आहे ती लक्षात घेता, ही निवडणूक निश्चितच अटीतटीने लढवली जाईल. बहुगुणा निवडून आले तर विरोधी पक्षाचा एकच खासदार लोकसभेमध्ये वाढणार असला तरी या निवडणुकीचे राजकीय महत्त्व लक्षात घेतले तर त्यांचे लोकसभे-तील आगमन, इंदिरा काँग्रेसला पाच—सात जागा गमावण्याइतके महाग पडणार आहे. बहुगुणा लोकसभेमध्ये येता कामा नयेत, ही इंदिराजींची धारणा असून त्या स्वतः या पोटनिवडणुकीच्या संदर्भात जातीने लक्ष घालत आहेत. विद्यमान लोकसभेची जवळजवळ अर्ध्याहून जास्त मुदत पूर्ण झाली आहे आणि अशा परिस्थितीत राज्य विधानसभांच्या या निवडणुका वारे कोणत्या दिशेने वाहात आहे, हे सूचित करणाऱ्या असल्याने सर्व राजकीय पक्ष आपल्या सामर्थ्याची चुणूक दाखवण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहेत.

निवडणुकीच्या सावलीत उभ्या असलेल्या काश्मीरमध्ये, शेख अब्दुल्ला आणि त्यांची नॅशनल कॉन्फरन्स हा प्रबळ पक्ष आहे. आज काश्मीरची सत्ता शेखसाहेबांच्या हाती आहे. राज्य विधानसभेची

अजून एक वर्षाची मुदत बाकी आहे; पण शेखसाहेबांना आणि त्यांच्या पक्षाला निवडणुकीचे वेध लागले असून नॅशनल कॉन्फरन्सने निवडणुकीची तयारी चालवली आहे. या पक्षाचे विद्यमान अध्यक्ष शेखसाहेबांचे चिरंजीव डॉ. फरुक शेख हे विरोधी पक्षांनी, विशेषत: इंदिरा कॉंग्रेसने, आपला गाशा गुंडाळावा अशी भाषा करत असले तरी इंदिराजी ही गोष्ट मानण्यास तयार नाहीत. अगदी अलीकडे, त्यांनी काश्मीर-दौरा केला आणि शेखसाहेबांचे नाव न घेता त्यांच्या पक्षावर सडकून टीका केली. तसेच, आपल्या पक्षाच्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना निवडणुकीसाठी सिद्ध राहण्याचे आवाहन केले. या पक्षाचा जो राजकीय मेळावा भरवण्यात आला होता त्याला काश्मीर खोऱ्यामधील पाच हजार कार्यकर्ते उपस्थित होते. लडाख व जम्मू विभागातून चार हजार कार्यकर्ते आले होते. राज्य पातळीवर सत्तेवर असलेला पक्ष इंदिरा कॉंग्रेसच्या कामकाजाकडे खुनशी वृत्तीने पहात असला तरी त्यांच्या चिडचिडीला भीक न घालता पक्षबांधणी मजबूत करून आगामी निवडणुका जिद्दीने लढवण्याचे इंदिरा कॉंग्रेसने ठरवले आहे. स्वत: शेखसाहेब या निवडणुकीत उतरणार नाहीत. आपली मुख्यमंत्रिपदाची गादी आपल्या चिरंजिवांना मिळावी, अशी त्यांची इच्छा असून त्याच दृष्टीने त्यांनी डॉ. फरुख शेख यांना पक्षाचे अध्यक्षपद दिले आहे. तिकिटवाटप करतानाही ते अशा पद्धतीने केले जाईल की, नॅशनल कॉन्फरन्सने निवडणुकामध्ये बाजी मारली तर डॉ. फरुख शेख सहजगत्या मुख्यमंत्री व्हावेत. दरम्यान शेखसाहेबांची प्रकृती ढासळली असून त्यांना राज्याचा कारभार चालवण्यासाठी मोठ्या प्रमाणावर नोकरशाहीवर अवलंबून रहावे लागत आहे. आपली प्रकृती चांगली आहे व आपण अजूनही पुरेसे कार्यक्षम आहोत, हे दाखवण्यासाठी शेखसाहेब जम्मू भागाचा दौरा करणार असले तरी आता ते थकले असून त्यांना नोकरशाहीवर अवलंबून रहावे लागत आहे. चार-पाच ज्येष्ठ सरकारी अधिकाऱ्यांचा एक कंपू तयार झाला असून राज्यामधील सत्ता या कंपूकडूनच सध्या राबवली जाते. या पाच मंडळींपैकीही मुख्य सचिव नूर अहंमद, नियोजन संचालक एम्. मकबूल व पोलीसप्रमुख गुलाम हुसेन शहा यांना विशेष महत्त्व असून आज राज्यामधील प्रत्येक महत्त्वाचा निर्णय या कंपूकडून घेतला जातो. शेखसाहेबांना जवळजवळ शोभेच्या बाहुलीची अवकळा आली आहे. राष्ट्रीय सुरक्षा कायद्याचा मनमानी वापर सुरू असून विविध राजकीय पक्षांचे किमान २०० कार्यकर्ते तुरुंगात आहेत. विधानसभेमध्ये याबाबत प्रश्न विचारण्यात आले असता त्यांना का पकडण्यात आले आणि नेमके किती लोक आतमध्ये आहेत, याची माहिती देण्यास नकार देण्यात आला. नोकरशाहीमध्येही काश्मीरशी—शेखसाहेबांशी आणि त्यांच्या पक्षाशी निष्ठा असणारांना प्राधान्य देण्यात आले असून, आय. ए. एस. 'अधिकाऱ्यांना दुराव्याची वागणूक देण्यात येते. काश्मीर शासनाने स्वत:ची अॅडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस सुरू केली असून या यंत्रणेमार्फत येणाऱ्या अधिकाऱ्यांना विशेष प्राधान्य देऊन, आय. ए. एस. अधिकाऱ्यांना त्यांच्या हाताखाली काम करणे भाग पाडले जाते. स्वत. मुख्य सचीव आय. ए. एस केडरमधील असले तरीही, सर्व आय. ए. एस. अधिकाऱ्यांना, मी राज्यामधील अन्य अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करणे भाग पाडीन, असे ते म्हणतात. अनेक आय. ए. एस. अधिकाऱ्यांनी आपल्याला काश्मीरमधून हलवण्यात यावे, अशी मागणी केली असून नवीन आय. ए. एस. अधिकारीही काश्मीरमध्ये नेमणूक स्वीकारण्यास तयार नसतात. राज्यामधील एकंदर परिस्थिती स्फोटक असून केंद्र शासनाला आता केवळ बघ्याची भूमिका घेता येणार नाही. इंदिराजींना आपला पक्ष निवडणुकीमध्ये समाधानकारक टक्कर देऊ शकेल, असा विश्वास असल्याने त्यांनी आपल्या पक्षाला निवडणुकीच्या दृष्टीने तयारी करण्याचे आदेश दिले आहेत.

## □ भ्रष्टाचाराला राजकीय आश्रय

भ्रष्टाचाराला राजकीय नेत्यांकडून जे संरक्षण दिले जाते त्याबद्दल देशामधील ज्येष्ठ विचारवंतांनी आणि केंद्र व विविध राज्य शासनांमधील ज्येष्ठ अधिकाऱ्यांनी वेळोवेळी नापसंती व्यक्त केली आहे. आय. ए. एस. अधिकाऱ्यांना ज्या संस्थेत प्रशिक्षण दिले जाते, त्या संस्थेचे संचालक श्री. अप्पू यांचा निवृत्तीचा निर्णय हा अशा स्वरूपाचा भ्रष्टाचाराला विरोध करण्याच्या भूमिकेतून घेतला गेला. अगदी अलीकडे आंध्र प्रदेश विद्युतमंडळाचे अध्यक्ष डॉ. एन. टाटाराव यांनी विद्युतमंडळामध्ये ज्या पद्धतीने इंजिनिअर्सची भरती करण्यात येते त्या पद्धतीबाबत तीव्र निषेध नोंदवला. ते म्हणाले- केवळ मंत्र्यांनी शिफारस केली म्हणून आम्हाला ६०० अकार्यक्षम इंजिनिअर्संना घ्यावे लागले. अनेक ठिकाणांहून नाकारले गेलेले हे इंजिनिअर्स सामान्य वकुबाचे असले तरी त्यांच्याविरुद्ध काहीही करता येत नाही. असा अकार्यक्षम सेवकवर्ग असूनही आम्ही बऱ्यापैकी वीजउत्पादन करू शकतो, हा एक चमत्कार मानावा लागेल आणि या चमत्काराचे श्रेय मोजक्या कार्यक्षम अधिकाऱ्यांना द्यावे लागेल. शृंगेरी येथील खाणीमधील कर्मचाऱ्यांपैकी कारकूनमंडळींना टंकलेखनाची किमान पात्रता पूर्ण करणारी प्रशस्तिपत्रके सादर करण्यास सांगण्यात आले. ४५ बोगस प्रशस्तिपत्रके करण्यात आली. चौकशी सुरू झाली तेव्हा एका मंत्रीमहोदयांनी चौकशी ताबडतोब थांबवण्याचे आदेश दिले. विशाखापट्टणम् येथून सिमेंट खरेदी केलेल्या एका ग्राहकाने प्रत्येक पोत्यामध्ये कमी सिमेंट असल्याने आपले नुकसान होते, अशी तक्रार गुदरली. वजने-मापे खात्यामार्फत चौकशी होऊन संबंधित व्यापाऱ्याकडील १४० पोती जप्त करण्यात आली. खटला भरण्यात आला. पुन्हा एक मंत्रीमहोदय मध्ये पडले. सरकारने खटला काढून घ्यायचे ठरवले तर विशाखा कंझ्यूमर कौन्सिलने हा खटला काढून घेण्यास परवानगी मिळू नये, अशी विनंती उच्च न्यायालयाला केली आहे. त्या संदर्भात आंध्र सरकारला 'कारणे दाखवा' नोटीस बजावण्यात आली आहे. केवळ एका राज्यामधील हे काही नमुने आहेत. भ्रष्टाचारला मिळणारे राजकीय समर्थन किती तापदायक असते, याची झलक या प्रकरणामध्ये पहावयास मिळते आणि भ्रष्टाचार हा समाजजीवनाचा कसा अंगभूत भाग झाला आहे, हेही लक्षात येते.

□

श्यामचा संसार : (कथा ३२ वी)

फिरोझ रानडे

# एका दगडात दोन पक्षी

'येथे एका दगडात दोन पक्षी कसे काय मारत असतील बुवा?' श्यामला मस्कतला येऊन आता जवळजवळ दोन महिने होत आले होते. प्रथम त्याची काही दिवसांकरता एका हॉटेलमध्ये रहाण्याची-जेवणाखाण्याची व्यवस्था केली गेली होती. मग त्याच्याकरता योग्य असा गाळा पाहून देऊन त्याला खाटा, जेवण्याचे मेज, बसायला चागल्या ऐसपैस बैठकी दिल्या होत्या. आता श्याम कधीकधी घरीच जेवण बनवत असे वा एखाद्या खानावळीत जात असे. आता त्याच्या जुजबी ओळखी पण झाल्या होत्या. असाच जुजबी ओळखीचा एक मराठी माणूस गप्पा मारत असता श्याम त्याला 'येथे एका दगडात दोन पक्षी कसे काय मारत असतील बुवा?' विचारता झाला होता.

श्यामच्या ह्या प्रश्न विचारण्यामागे काही पार्श्वभूमी होती. मस्कतमध्ये अक्षरशः औषधालाही पक्षी दिसणार नाहीत. आता आपण लोक काही औषधाला पक्षी वापरत नाही, पण इथले लोक अभक्ष्य भक्षण करणारे असल्यामुळे कदाचित औषधाला म्हणूनही पक्षी वापरत असतील; पण वापरोत किंवा न वापरोत, इथे पक्षी म्हणून मिळणार नाही. ह्याचे भौगोलिक वा वातावरणिक काय कारण असेल ते असो.

ह्या गेल्या दोन महिन्यांत श्यामने अक्षरशः एकच पक्षी पाहिला होता, तो म्हणजे पोपट! तोसुद्धा श्याम ज्या हॉटेलमध्ये रहात होता त्या हॉटेलच्या प्रवेश-कक्षात ठेवला होता म्हणून! आता सबंध गावात फक्त एकच पक्षी आहे, हे श्यामला जसे माहीत होते तसे त्याच्या मित्राला पण माहीत होते. हे वरचे वाक्य म्हणण्यात श्यामला थोडा विनोद करून मित्राला हसवता आले तर पहावे, हा पण हेतू होता.

'पक्षच नाहीत तर पक्षी कोठले?' श्यामचा नव-मित्र श्यामपेक्षा काकणभर जास्तच विनोदी निघाला वा काकणभर कमी मराठी भाषाज्ञानी निघाला होता. हल्ली महाराष्ट्रात फुटकळ विनोद करण्याचे प्रमाण फार वाढले आहे, हे बाकी मराठी माणसाप्रमाणे श्यामच्याही ध्यानात आले होते. अगदी विनोद करण्याचा मोका म्हणून कोणी सोडत नाही. अर्थात उगाच गंभीर चेहरा करून बसण्यापेक्षा वा उगाच शिरा ताणून ताणून वादावादी करण्यापेक्षा असे फुटकळ विनोद करणेही बरे. मात्र ह्या विनोदावर श्याम दोन कारणांकरता अगदी जुजबी हसला. एक तर 'एका दगडात दोन पक्षी कसे मारतात?' ह्या श्यामच्या वाक्याचे त्या मित्रोने हवे तेवढे कौतुक केले नव्हते व दुसरे म्हणजे, जर श्याम त्याच्या विनोदावर पोट धरधरून हसला असता तर त्या मित्राला उत्तेजन मिळून त्याने डोके दुखेपर्यंत विनोद केला असता!

कदाचित् त्या मित्राला मुळात विनोद करावयाचाच नसावा. श्याम महाराष्ट्राबाहेर बरेच वर्षं राहिला असल्याकारणाने त्याचे मराठी आपोआपच विनोदी झाले होते. हा मित्र तर काय उत्तर प्रदेशात जन्मला व वाढला होता. त्याचे सगळे शिक्षण हिंदी व इंग्रजीत झाले होते. त्यामुळे त्याला पक्ष हे पक्षी ह्या शब्दाचे पुल्लिंग आहे, असेही वाटले असावे व तो अजाणता 'येथे पक्षच नाहीत तर पक्षी कोठले?' असे म्हणून गेला असावा.

अर्थात 'येथे पक्षच नाहीत ...' ह्या म्हणण्यालाही काही पार्श्वभूमी होती. त्याने नुसताच विनोद केला नव्हता वा मराठी व्याकरणाची चूक केली नव्हती. जशी नेपाळमध्ये राजेशाही आहे वा हिंदुस्थानात लोकशाही आहे तशीच येथे सुलतानशाही आहे इतिहासात वेगळे वेगळे सुलतान व त्याच्या शाह्या इतक्या बदनाम झाल्या आहेत की, ओमानमध्ये सुलतानशाही म्हटल्यावर कदाचित धाबरून जायला होईल.

पण सध्याचा सुलतान काबुल-बिन-सैद हा तरुण, सुशिक्षित व प्रगतिशील विचाराचा आहे. त्याला शिक्षणाचे महत्त्व तर कळले आहेच; पण मुली व स्त्रिया मागासलेल्या आणि अशिक्षित रहाता कामा नयेत, असे त्याचे विचार आहेत व त्या विचाराला अनुसरून त्याने मोठया प्रमाणात शाळा-कॉलेजेस बांधण्याचा कार्यक्रम हाती घेतला आहे. ओमानला युनिव्हर्सिटी नाही- ती स्थापण्याकरता त्याने ब्रिटिश तज्ज्ञाची एक कमेटी नेमली आहे सुलतानाचे असे जरी प्रगत विचार असले तरी सर्व सत्ता त्याच्याच हाती आहे. त्यामुळे येथे राजकीय पक्ष नाहीत व पक्ष नसल्याने, आहे तो पक्ष फोडून नवा पक्ष काढण्याचा प्रश्न नाही, पक्षांतर नाही. 'येथे पक्षच नाहीत तर पक्षी कुठले?' ह्या श्यामच्या मित्राच्या वाक्याला अशी नकळत पार्श्वभूमी होती. तो मित्र ते वाक्य वेगळया अर्थी म्हणाला होता; पण ते आणखी वेगळया अर्थी लागू पडत होते.

खरं म्हणजे 'येथे एका दगडात लोक दोन पक्षी कसे काय मारतात बुवा?' हा प्रश्न श्यामने वेगळया अर्थी विचारला होता. त्याच्या मनात आकाशात उडणारे पक्षी नसून हिंदी लोक एका दगडात दोन पक्षी कसे मारतात, ह्याबद्दल आश्चर्य व कुतूहल होते व ते त्याने व्यक्त केले होते. आता ही कथा वाचणारे प्रथम हिंदी व मग मराठी अशा राष्ट्रीय बाण्याचे असल्यामुळे त्याना ह्या वाक्यातला गर्भित अर्थ व 'दगड' कोण व 'पक्षी' कोण, हे लक्षात येण्यास वेळ लागू नये.

हिंदुस्थानात इतके बहाद्दर व नेमबाज लोक आहेत की. ते एका दगडात तीन-तीन चार-चार पक्षी मारतात; पण याचे हिंदुस्थानात व्हावे तसे कौतुक होत नाही; कारण हिंदुस्थानात रगड पक्षी आहेत म्हणून. तेव्हा त्याच्याबद्दल मोठे आदराने बोलण्याचे येथे कारणही नाही व हे स्थळही नव्हे.

पण इथे एकही पक्षी नसून हिंदी लोक एका दगडात दोन-दोन पक्षी मारतात त्याचे मनापासून कौतुक होणे आवश्यक आहे. कोठेही गेले तरी आपला हिंदी बाणा सोडवायचा नाही, ही वृत्ती जो आहे तीच ह्या लीलेने दोन पक्षी मारण्यामागे आहे. व त्या वृत्तीचा, त्या दगडांचा व पक्षांचा ऊहापोह करण्याचा व त्याचे शक्य होईल तेवढे कौतुक करण्याचा येथे विचार आहे.

मस्कतमध्ये एका दगडात दोन पक्षी मारण्याच्या वेगवेगळया तऱ्हा, पद्धती आहेत.

त्यातली राजमान्य – चुकलो – सुलतानमान्य पद्धत म्हणजे कचेरीच्या वेळा, नतर नोकरी करणे. येथील सरकारी कचेऱ्या सकाळी ७॥ ते दुपारी २ पर्यंत असतात. पण खाजगी कचेऱ्या वगैरे ७॥ ते १ व परत ४ ते ७पर्यंत असतात. त्यामुळे सरकारी नोकर दुपारी ४ ते ७ पर्यंत कुठे नकशानवीस, कुठे फडणवीस म्हणून, कुठे कारखानीस म्हणून काम करत असतात. येथल्या ओमानी अधिकाऱ्यांना व इतर कर्मचाऱ्यांना अशी परवानगी आहे. त्यांच्या स्वतःच्या कचेऱ्या आहेत. त्यांची दुकाने आहेत वगैरे वगैरे. अर्थात अशी कचेरीनंतर काम करण्याची परदेशी लोकाना परवानगी नाही; पण एखाद्या गोष्टीची परवानगी नाही म्हणून अडून रहाण्याची हिंदी लोकांची वृत्ती नाही व त्या वृत्तीला अनुसरुन झाडून सगळे लोक जोडधंदा करत असतात. आनंदाची व अभिमानाची गोष्ट एवढीच की, असा जोडधंदा करण्याची वृत्ती फक्त वरच्या थरातच नव्हे, तर सर्व थराथरातून असते. इंजिनियर्स, आर्किटेक्टस्, अकौन्टंटस् वगैरे तर असला दुसरा पक्षी मारत असतातच, पण कचेरीत खालच्या जागेवर काम करणारे, साफसफाई करणारे व गाडीवानही कोणाच्या घरी काम करुन, स्वैपाकपाणी करून वा टॅक्सी वगैरे चालवून आपला आपला दुसरा पक्षी मारत असतात.

श्यामला असा दुसरा पक्षी मारता आला तर नाहीच, पण त्याला त्याचा दगड मात्र लागला. ओमानला येताच त्याला कळले होते की, येथे हजारोंनी हिंदी लोक आहेत. शेकड्याने मराठी लोक आहेत एवढेच नव्हे तर त्याच्या आडनावाचेच तीन-चार जण आहेत. त्याचा एक आडनावबंधू एक consultation Firm चालवत होता. श्यामला त्याच्याबद्दल कळताच तो मोठ्या उत्साहात आला व त्याने त्या आडनावबंधूला दूरध्वनीवर गाठले. श्याम आपला आडनाव बंधू येथे आहे, हे कळून जितका उत्तेजित झाला होता तेवढा काही तो, म्हणजे आडनावबंधू झाला नव्हता. श्याम त्याच्या कचेरीत गेल्यावर त्याने श्यामचे थंडपणे स्वागत केले व थंडगार पेय प्यावयास दिले. श्यामचा चेहरा-मोहरा कसा आहे, ह्याची बहुतेकांना कल्पना आहेच. त्या त्याच्या चेहऱ्या-मोहऱ्यावरून व श्यामने आडनावबंधुला भेटायची जी काही उत्सुकता दाखवली त्यावरून व त्याच्या ओमानला येणाऱ्या भारतीयाच्या वृत्तीबाबतच्या अनुभवावरून त्याने मनाशी कयास बांधला व तो फटकन श्यामला म्हणाला, 'आमचे कचेरीत खूप काम असते. आहे त्या कर्मचाऱ्याकडून ते होत नाही. जर तुमची तयारी असेल तर उद्यापासून येथे कामावर या!' श्यामला ते वाक्य फारच खटकले. त्याच्या मनात आले की, आपण दिसायला इतके का 'हे' आहोत की, आपल्याला दुसरा पक्षी मारायला ह्या गृहस्थाने येता येताच हातात दगड पकडून दिला. आपण त्या गृहस्थाला भेटण्याकरता जी काही उत्सुकता, तो आपला आडनावबंधू आहे म्हणून दाखवली ती तो फक्त दुसरा पक्षी मारायला मिळेल ह्या हेतूनेच होती, असे तो समजला होता. हेच श्यामच्या मनाला लागले; पण नंतर त्याने विचार केला की, येथे जर सर्रास पद्धतच असेल तर तो तरी काय करणार बिचारा? असो.

आता आपण कचेरीत राहूनच काही लोक दुसरा पक्षी कोणता व कसा मारतात ते बघू या. येथे बहुसख्य हिंदी 'भय्या' पद्धतीने रहातात. 'भय्या' पद्धत म्हणजे बायका–मुले उत्तरप्रदेशात आपल्या गावी व स्वतः मुंबईला सडेफटिंग रहाणे. सरकारी कचेरी ७॥ ते २ पर्यंत असते, हे मघाशी सांगितलेच आहे. येथे उकाडा इतका असतो की, प्रत्येक कचेरीत व घरात वातानुकूल यंत्रे लावलेली असतात. त्या यंत्रावर येणाऱ्या विजेच्या खर्चाची भरपाई म्हणून सर्वांना त्यांच्या त्यांच्या पगाराच्या मानाने भत्ता मिळत असतो. असा भत्ता साधारण २५ रियालपासून ५० रियालपर्यंत म्हणजे आपल्या भाषेत ६०० रुपयांपासून १२०० रुपयांपर्यंत मिळत असतो. म्हणजे ते तुम्हाला ठराविक भत्ता देतात. जर खर्च कमी आला तर राहिलेले पैसे तुमचे व जास्त आला तर तुम्ही स्वतःच्या खिशातून भरावयाचे असतात.

आता खर्च जास्त होऊन स्वतःच्या खिशातून पैसे देण्याच्या प्रश्नापर्यंत येतो कोण? श्यामने काही जुजबी लोकाशी दुपारी ३॥–४ वाजण्याचे सुमारास दूरध्वनीवर बोलण्याचा प्रयत्न केला; पण कोणीही टेलिफोन उचलेना! ते सज्जनही 'भय्या' पद्धतीने रहात होते. त्यामुळे दुसऱ्या कोणी टेलिफोन उचलण्याचा प्रश्नच नव्हता. काही दिवसांनी श्यामची व त्यांची भेट झाल्यावर श्यामने, त्यांना टेलिफोन केला होता, पण कोणी उचलला नाही, वगैरे सांगितले. त्यावर तिघांचे एकच उत्तर होते व ते म्हणजे 'कचेरीत फार काम असते. त्यामुळे दुपारी कचेरीत जावे लागते.' आता श्यामची सगळी जिंदगी सरकारी कचेरीत काम करण्यात गेली होती व कोणत्याही सरकारचे काम असो, ते साधारण सारखेच 'खूप' असते, हे त्यालाही माहीत होते. काही दिवसातच ह्या कचेरीतल्या खूप कामामागला 'दगड' व 'दुसरा पक्षी' त्याला कळला.

त्याचे काय होते की, कचेरी साधारण संध्याकाळी ६॥–७ पर्यंत वातानुकूल असते. घरी थाबले तर वातानुकूल – यंत्र चालू ठेवावे लागणार व त्यावर खर्च होणार. म्हणजे घरची वीज वाचवावी, ह्या हेतूने कचेरीतले खूप काम! आता योगायोगाने मोठ्या साहेबाने कचेरीत पाहिले तर 'काय हो, हे लोक वेळेनंतरही काम करतात', असे त्याचे मत होते व त्याचा फायदा मिळतो तो वेगळाच!

येथे शेकड्याने भय्ये लोक असल्यामुळे त्यांच्या खाण्या-पिण्याची व्यवस्था करण्याकरता पंजाबी, गुजराती व मद्रासी लोकांनी खानावळी काढल्या आहेत. मराठी खानावळवाले स्वतःच सगळे 'खाऊन' बसल्यामुळे त्याना स्वतःलाच चालवत नाही; ते खानावळी काय चालवणार? व तेही महाराष्ट्रापासून शेकडो मैल दूर! नावच काढू नका.

अपेक्षेप्रमाणे मद्रासी खानावळ सगळ्यात स्वस्त, म्हणजे तेथल्या जेवणाला साधारण १२ रुपये पडतात. गुजराती खानावळीत १८ रुपये पडतात व पंजाबी खाण्याला २५ ते ३० रुपये पडतात. आता सगळ्यात स्वस्त म्हणजे दर जेवणाचे १२ रुपये देणे आले! मुंबईला २॥–३ रुपयात राइसप्लेट खाण्याची सवय झाली असल्याकारणाने हे १२ रुपयांचे सगळ्यात स्वस्त जेवण जेवूनही पोट दुखू लागते! मग काय करावे? मग दगड व पक्षाची शोधाशोध सुरू होते.

येथेही जेवण 'पार्सल' पद्धतीने म्हणजे बांधून देण्याची पद्धत आहे. व जेवण बाधून दिले म्हणजे थोडे जास्त दिले जाते. मग तसे

जेवण पार्सल करून घ्यावयाचे व ते दोन वेळा पुरवावयाचे ! जर पार्सल करता वापरलेली प्लास्टिकची पिशवी पदरात पडते ते वेगळेच!

मस्कतला हिंदुस्थानातली इंग्रजी वर्तमानपत्रे येत असतात पण ती सगळी विमानाने येत असल्याकारणाने अतिशय महाग असतात. म्हणजे Times of India चा एक पेपर जवळजवळ तीन रुपयाला पडतो. आता हिंदुस्थानबद्दल, तेथले कोणकोणते मुख्य मंत्री बदलले आहेत हे कळून घेण्याबद्दल उत्सुकता असते. पण फक्त मुख्यमंत्री बदलण्याची बातमी वाचायला महिन्याला नव्वद म्हणजे फार होतात. मग काय करावयाचे ? तर तीन जण मिळून एक वर्तमानपत्र घेतात व पाळीपाळीने वाचतात ! ह्यात आनंदाची गोष्ट एवढीच की, रद्दी करून वा रद्दी विकून मिळणाऱ्या पैशाबाबत ह्या तिघात कधीही झगडा होत नाही. ह्याचे कारण पक्षी मारता मारता त्यांचा स्वभाव मनमिळाऊ झाले असतो असे नव्हे तर येथे जुनी रद्दी कोणी विकत घेत नाही हे असते !

येथे येणाऱ्या सर्व कारागिरांना वर्षातून एकदा-स्वत: त्यांना व त्यांच्या बायका-मुलांना हिंदुस्थानची वारी चटकन करायला मिळत असते. कधीकधी कारभाऱ्याला काही कारणाने हिंदुस्थानला जायला जमत नाही. कधीकधी मुलांच्या शिक्षणाची येथे सोय नसल्यामुळे बायकामुले महिना-दीड महिना मस्कतला रहातात व मग परत जातात. पण कोणी सह-कुटुंब जात असो वा त्याचे फक्त कुटुंब जात असो, येथल्या बाकी जनतेला त्याचा फार आनंद होत असतो. आता ज्याचे कुटुंब हिंदुस्थानात जात असते तो आता काही महिने ' भम्पेगिरी ' करावी लागणार म्हणून दुःखी असतो पण बाकी जनतेला त्याची पर्वा नसते.

जसे हिंदुस्थानात पोस्टखात्याने दर वाढवले आहेत तसे येथल्या सरकारने पण वाढवले आहेत. एक पत्र टाकायचे म्हणजे दोन अडीच रुपये लागतात. तेव्हा हिंदुस्थानातून येताना लोक खूपशी हिंदुस्थानची तिकिटे, पाकिटे व आन्तर्देशीय पत्रे घेऊन येतात. मग कोणी चालला की, त्याच्याबरोबर प्रत्येक जण पत्रे देतो. कधीकधी अशा पत्रांची संख्या १००-१५० पर्यंत जाते. ह्या पत्रात लांबलांबच्या नातेवाईकांना मस्कतमध्ये कसा भरपूर पैसा मिळतो. येथे सगळीकडे कसे वातानुकूल वातावरण असते ह्याची माहिती देऊन, त्यांना मत्सरायला लावले असते. त्याचप्रमाणे कुठे कोणाकडे काही पैसे यायचे बाकी असतिल तर त्यांना आठवण देणारी पत्रे असतात. कोठे L. I. C. च्या पत्राचे उत्तर असते. थोडक्यात म्हणजे फार महत्त्वाची ही पत्रे नसतात. कारण महत्त्वाची असतात तो महाग पडोत वा स्वस्त पडोत पाठवणे भागच असते व त्याप्रमाणे पाठवली जातात.

शाम लेखक झाल्यापासून–म्हणजे त्याचे लेख छापायला लागले गेल्यापासून–तो राधाला पत्रे अगदी मोठी व सर्व तऱ्हेच्या माहितीने परिपूर्ण लिहू लागला होता. एका दगडात दोन पक्षी वगैरेबद्दल त्याने राधाला सगळ्या दगडांची व पक्ष्यांची माहिती देणारे पत्र पाठवले व तो राधाच्या पत्राची वाट पहात राहिला.

काही दिवसांनी राधाचे पत्र आले. बाकी सर्व मजकूर, लोकसभेत वा राज्यसभेत काही माहिती लोकहिताची ठरणार नाही म्हणून मंत्री महोदय देत नाहीत तसा फक्त दगडाबद्दल व पक्ष्यांबद्दल राधाने लिहिले होते. ते सांगण्यासारखे आहे. कारण जनहिताचे व जनफायद्याचे आहे. राधाने लिहिले होते.

' तुमच्या पत्रामुळे आम्हाला येथे नवे नवे दगड व पक्षी मिळाले आहेत. आता आम्ही घरी स्वैपाक न करता खानावळीतून डबा आणतो. एक डबा तिघांना पुरतो. आता मी पुढली पत्रे पण जो कोणी ओमानला येईल त्यांच्याबरोबरच पाठवीन. पत्राची वाट अशी पाहू नका '.

शामला आपण काही तरी वेगळ्याच तऱ्हेचे दगड आहोत, कारण आपण काही वेगळेच दोन पक्षी मारले आहेत ह्याची जाणीव झाली !



---

# पुस्तकं

## फक्त ओळख

खास लहान मुलांनी वाचावीत अशी ही चार पुस्तकं.त्यांपैकी बिरबलाच्या सुरस गोष्टींचे दोन भाग ' बिरबल १ ' आणि ' बिरबल–२ ' १९८० मध्ये मॅजेस्टिकने प्रकाशित केले. या दोन्ही भागांचे लेखक आहेत र. ग. विद्वांस. दुसरं पुस्तक आहे एका तीन अंकी बाल–नाटकाचं. नाव आहे ' अटक मटक चवली चटक ' राजा ठाकुरांनी लिहिलेलं हे नाटकही मॅजेस्टिकनेच १९८२ मध्ये प्रकाशित केलं. चौथं पुस्तक आहे, महावीर जोंधळ्यांचं ' एक पाय तळ्यात ' हे पुस्तक सुरेश एजन्सीचं आहे.

र. ग. विद्वांसांनी लिहिलेले बिरबलाच्या गोष्टींचे दोन भाग म्हणजे ' गोष्ट सांगा ' म्हणून हट्ट करणाऱ्या बालगोपाळांना गप्प करायचा हुकमी एक्काच ! कारण यातल्या सगळ्या गोष्टी छोट्या छोट्या, सहज लक्षात ठेवण्यासारख्या आहेत. सर्व गोष्टींत बिरबलाचा नेहमीचा चतुरपणा आणि बादशहाचा भोळसटपणाच उघडकीला येतो. त्यामुळं या गोष्टी लहान मुलांना नक्कीच आवडतील. पहिल्या भागात २२ आणि दुसऱ्या भागात २८ अशा एकूण ५० गोष्टी आहेत. ' घडाभर अक्कल ', ' दिवा तेवे प्रासादात ' यासारख्या काही पाच–सहा गोष्टींचा अपवाद वगळला तर बिरबलाचे बरेच नवीन चातुर्यगुण दाखवण्यात लेखकाचं कौशल्य दिसून येतं. सुट्टीत वेळ घालवण्यासाठी लहान मुलांना हे दोन भाग अवश्य आणून द्यायला हवेत.

' अटक मटक चवली चटक ' या बालनाटकात राजा, प्रधान, राक्षस, परी यासारखी लहान मुलांना हमखास आवडणारी पात्रं आहेत. एका म्हाताऱ्या राजाला तरुण व्हायचं असतं, त्याची ही गोष्ट. तरुण होण्यासाठी फूलनगरीच्या नीलपरीकडे असलेलं सुगंधी फूल हवं असतं. प्रधानजी या मोहिमेवर निघतात; पण सुगंधी फुलाऐवजी विषवृक्षाचं भयंकर विषारी फूल घेऊन येतात. राजाचा काटा काढण्याची प्रधानजींची कारस्थानं यशस्वी होत नाहीत. कारण ? या

नाटकात शापित तरुण आहे. पुष्करणीदेवी आहे. थोडक्यात काय, लहान मुलांना गुंगविण्यासाठी लागणारा सगळा मसाला यात आहे. नाटकाच्या विषयात आणि माडणीत वेगळं असं काहीच नाही. कानाला गोड लागणारे काही गेय संवाद मात्र लेखकाने चांगले लिहिले आहेत.

महावीर जोंधळ्याचं 'एक पाय तळ्यात' मुखपृष्ठापासूनच लक्ष वेधून घेतं. चित्रविचित्र पोशाख केलेल्या, गळ्यात रंगीत फुलांची परडी लटकवलेल्या फूलविक्याचं चित्र मुखपृष्ठावर आहे. पुस्तकाच्या आतली चित्रेही अशीच मनोवेधक आहेत. या चित्रामुळे या पुस्तकाच्या माडणीला आणि विषयाला वेगळाच घाट आला आहे. वसू नावाच्या एका आळशी मुलाची ही गोष्ट आहे. वसूच्या हातात कला असते. तो छान फुलदाण्या तयार करायचा; पण आळशीपणा! हे करू का ते करू, अशा सभ्रमात वसू काहीच करायचा नाही. वसूच्या चमेली जीवनात येते आणि ती त्याला पार बदलून टाकते. त्याच्याकडून काम करून घेते आणि शेवटी आळशी वसू राजा होतो. या संपूर्ण पुस्तकातली संवादातील गेयता, लयबद्धता आणि तालबद्धता खिळवून टाकणारी आहे. तीच गोष्ट छपाईची. मुखपृष्ठ आणि आतील चित्रांची छपाई इतकी चागली आहे की, त्यासाठी तरी हे पुस्तक बघायलाच पाहिजे. मुखपृष्ठ आणि चित्र सुभाष अवचटांची आहेत, लहान मुलानी हे पुस्तक पहायलाच हवं!

### दोन कादंबऱ्या

'आले देवाजीच्या मना' आणि 'तुझ्या मना—माझ्या मना' या चिंतामणी लागू याच्या दोन कादंबऱ्या पुण्याच्या रविराज प्रकाशनने या वर्षी प्रकाशित केल्या आहेत.

'आले देवाजीच्या मना' ही कादंबरी 'विनोदी' या छापाखाली जाऊ शकेल; पण कादंबरीचा विषय, त्याची मांडणी आणि कादंबरी विनोदी करण्यासाठी रचलेले प्रसंग अगदीच सामान्य आहेत. दादासाहेब खानविलकर या वृद्ध हॉटेलमालकाकडे कामाला असलेला पिंटू जहागिरदार हा अतिशय बावळट नोकर या कादंबरीचा नायक आहे. पिंटूला त्याच्या दूरच्या नात्यातल्या आजोबांनी मरतेसमयी बावीस हजार रुपये देण्याची सोय केलेली असते. पैशाची ऊब मिळाल्यामुळे पिंटू शेवटी चातुर्याने 'नाट्यलीला' या नाट्यसंस्थेचा मालक होतो. या प्रवासात पिंटूच्या बावळटपणामुळे निर्माण झालेले अनेक विनोदी प्रसंग आहेत. बावळट पिंटू प्रेमात आणि व्यवसायात यशस्वी होतो, त्याची ही गोष्ट. कादंबरीत विनोदी असे काहीच नाही. विषयाची माडणी हलकी—फुलकी आहे इतकेच. चिंतामणी लागूंच्या इतर प्रकाशित कादंबऱ्याच्या साच्यातली ही आणखी एक कादंबरी—वेळ जात नाही म्हणून चाळायला हरकत नाही.

दुसरी कादंबरी आहे 'तुझ्या मना, माझ्या मना' एका छोट्या कथाकल्पनेवरूनसुद्धा चिंतामणी लागूसारखा लेखक कादंबरी कशी बेतू शकतो, याचं हे उत्तम उदाहरण आहे. 'टेलीपथी' म्हणजे दुसऱ्या व्यक्तीच्या अंतर्मंथनातील विचार आतरिक सामर्थ्याने ओळखणे. दोन व्यक्तीमध्ये ही टेलीपथी निर्माण झाली की, एकमेकाच्या मनातले विचार आरशात पाहिल्याइतके स्पष्ट दिसतात, असा लागूंचा दावा आहे.

नीता ही श्रीमंत आई—वडिलांची एकुलती एक मुलगी. तिचा नियोजित पती अमीत नेव्हीत असतो. एका पार्टीमध्ये नीता-अमीतची रणजीत खन्नाशी ओळख होते आणि त्यातून हे टेलीपथीचं चक्र सुरू होतं. नीता आणि रणजितमध्ये ही टेलीपथी निर्माण होते. त्यामुळे भयंकर विचित्र मानसिक तणाव दोघांच्या मनात निर्माण होतो. रणजितकडून दुर्लक्षिली गेलेली त्याची बायको श्यामली रणजितच्याच मित्राकडे आकर्षित होते. रणजितला अर्थातच हे सगळं त्याच्या टेलीपथीमुळे दिसत असतं, तर रणजितच्या मनातलं पिशाच्च नीताला लख्ख दिसत असतं. या तणावाचा शेवट होतो श्यामलीच्या मृत्यूने. श्यामलीचा मृत्यू सहज नसून रणजितने तिचा खून केला आहे, हे फक्त नीतालाच माहीत असते. कादंबरीच्या शेवटी रणजित नीताला धमकीवजा सूचना देऊन तिचं आयुष्यही आपल्याबरोबर बांधून ठेवतो.

चिंतामणी लागूंची ही बहुदा सत्ताविसावी कादंबरी. लागूंच्या इतर कादंबऱ्यांप्रमाणेच त्यांचे वाचक याही कादंबरीची दखल घेतील. □

रंगभूमी

# कोठीवाली

## जुन्याच बाटलीतील जुनाट दारू

सुमारे तीन—चार महिन्यापूर्वी 'नाट्यसुविधा' या संस्थेतर्फे भालचंद्र पानसे यानी दिग्दर्शित केलेले 'मॅडम' नावाचे नाटक रंगभूमीवर आले होते. नुकतेच 'विश्वनाथ थिएटर्स' तर्फे गोपाळ टाकळकर यांनी लिहिलेले आणि भालचंद्र पानसेनीच दिग्दर्शित केलेले 'कोठीवाली' नावाचे नाटक प्रदर्शित झाले आहे.

कोणतेही नाटक दिग्दर्शित करायचे असेल, तर त्यात समाजाकडून, विशेषतः पुरुषजातीकडून अत्याचार झालेली एक तरी बाई असलीच पाहिजे, अशी भालचंद्र पानसेंची अटच असावी. (एक कळी फुललीच नाही, नंतर मॅडम आणि आता कोठीवाली.) त्याशिवाय त्यांना आपले धीट दिग्दर्शन दाखवता येत नसावे. 'कोठीवाली' नावावरूनच वाचकांच्या लक्षात सगळी कथा आली असेल. जवळजवळ एकाआड एक हिंदी चित्रपटांत कमीत कमी पावणे चार बेबस कोठ्या आपण पाहिलेल्या असतात. हे नाटक असल्यामुळे त्यात एकच 'बेबस कोठी' आहे आणि आपल्या 'फक्त' कलेचे प्रदर्शन त्या कोठीत (आणि फक्त शरीराचे प्रदर्शन या नाटकात) करून आपल्या बहिणीचे—वासंतीचे (स्नेहल) पालनपोषण करणारी कलाबाई (ज्योती चांदेकर) ही बेबस 'बेबस कोठी' वाली आहे. या बेबसपणाचा फायदा घेऊन कलाबाईवर बलात्कार (या ठिकाणी दिग्दर्शक दिसतो.) करण्याचा प्रयत्न करणारा जीवनसेठ (स्वरूपकुमार) आहे. तरीपण कलाबाईत असलेल्या संगीत, स्वर, ताल, नाद, रूप, यौवन आणि अदा या इंद्रधनुष्यावर प्रेम करणारा एक हळवा हिरो प्रकाश (दीपक जोशी) आहे. जीवनसेठला त्याच्या काळ्या काळ्या कुट्ट्ट कामात मदत करणारी चांदणी वेश्या (नयन इनामदार)

आहे. (चांदणीच्या सगळ्या प्रवेशांमध्ये तर दिग्दर्शकच दिग्दर्शक अगदी नको नको इतका आणि सतत दिसत राहतो) शेवटी जीवनसेठचा खून करणारा आणि कला आणि वासंती या आपल्याच सख्ख्या मुली असल्याचे उघड करणारा चाचाजी (चंद्रकांत गोखले–बिच्चारे नटसम्राट!) आहे. आणि हो, प्रत्येक कोठीवर एक पाळलेला अर्धवट गृहस्थ करमणुकीसाठी ठेवलेला असतो, तसा या कोठीवरही एक युसुफ (प्रभाकर वाळके) आहे. तर हे सगळे मिळून फर्माइशी तौरपर–म्हणजे प्रेक्षकाची फर्माइश नाही; तर त्याचीच आपापसातील फर्माइश–तर अशा फर्माइश तौरपर कधी मुजरा, नृत्य, कधी लावणी, कधी शेरोशायरीची मैफील, कधी कव्वाली, कधी बलात्कार, कधी खून, कधी प्रेम असे कायकाय कायकाय प्रेक्षकांना करून दाखवतात. त्यात फक्त वाईट इतकेच आहे की, आम्ही पाहिलेल्याच या सगळ्या गोष्टी ते पुन्हा पुन्हा नवीनच असल्यागत करून दाखवतात.

या सगळ्या सर्कशीत सर्वात जास्त कीव आली ती चंद्रकांत गोखल्यांची! त्यांनी या नाटकातील चाचाजीची भूमिका का आणि कशासाठी स्वीकारली असेल, याचे मला अतिशय कुतूहल आहे.

आणि सर्वांत कौतुक वाटते ते नाटकाचे दिग्दर्शन आणि नेपथ्य सांभाळणाऱ्या भालचंद्र पानसेंचे. स्वत.चा वकुबाचा आड अत्यंत सुमार व बेताचा असूनही हा पठ्ठा त्यातच पोहरे बुडवून सगळ्या नाटकांमधून तेच ते दिग्दर्शनाचे आणि नेपथ्याचे पाणी खरवडून काढतो आणि अजिबात संकोच, भीड, लाज न बाळगता प्रेक्षकांच्या अंगावर उडवतो!

नाटकामध्ये नृत्य या नावाखाली ज्योती चांदेकरांनी केलेली पायाची आदळआपट, स्नेहलने मारलेल्या उड्या हा नाटकातील आणखी एक त्रासदायक भाग. त्यातल्या त्यात सौ. शैलजा वैद्य यांनी गायलेली गीते आणि अन्वर कुरेशीची कव्वाली थोडासा विरंगुळा देऊन जातात. या दोघांच्या मदतीने 'कोठीवाली' नाटकाऐवजी एखादा सुगम संगीताचा कार्यक्रम सादर केला, तर तो प्रेक्षकाच्या दृष्टीने फारच सुसह्य होईल.

दारू जितकी अधिक काळ मुरवून ठेवावी, तितकी ती अधिक कडक आणि नशीली होते म्हणतात. पानसे मात्र थोड्याशा कपड्यांआड दडलेल्या आणि थोड्याशा कपड्यामधून डोकावणाऱ्या सेक्सची दारू जितकी अधिक वापरतील तितकी ती अधिक पांचट होत जाणार! मग भले ते कधी आशू, कधी ज्योती चांदेकर तर कधी नयन इनामदार अशा कितीही बाटल्या बदलोत! *

## संगीत पंचनायिका

प्रति–
श्रीमती लीला फणसळकर,
लेखिका–संगीत पंचनायिका.

विषय–आमच्या अनुमतीवाचून आमच्या संहितेवर स्वतःचे नाव 'लेखिका' म्हणून नोंदवून आमची रॉयल्टी बुडवल्याबद्दल.

महोदय,

नुकताच 'संगीत पंचनायिका' नामक एक नाट्यप्रयोग पुण्याच्या ऐतिहासिक भरत नाट्य मंदिरात पाहिला. या प्रयोगाच्या प्रवेशपत्रिकेवर छापल्याप्रमाणे लेखिका म्हणून आपले आणि दिग्दर्शक म्हणून श्रीधर राजगुरू यांची नावे होती.

या नाट्यप्रयोगामध्ये स्वयंवर, सौभद्र, शारदा, मानापमान आणि एकच प्याला या आमच्या पाच नाटकांमधील पाच प्रवेश त्यातील नाट्यगीतासकट सादर करण्यात आले. हे सर्व प्रवेश अत्यंत जुन्या पद्धतीप्रमाणे रंगवलेले पडदे, पात्रांची अनुरूप वेशभूषा आणि रंगभूषा वापरून सादर केले, त्याला कोणतेही आधुनिक वळण अथवा आधुनिक साज आपण चढवला नाही, याबद्दल आमच्या कातड्याचे जोडे करून आपल्या पायात घालावेसे वाटत आहेत. (दोन–तीन आठवड्यापूर्वीच टी. व्ही. वरील 'गजरा' नावाच्या एका प्रकारात बाळ कोल्हटकर नावाच्या विदूषकाने शर्ट–पँटमधील अर्जुनसुभद्रेला 'मॉड' संगीताच्या तालावर 'काते, फार तुला मजसाठी' हे गीत म्हणून दाखवतो असा एक उपप्रकार सादर केला. कोल्हटकरांसारख्या अत्यंत सामान्य व बेताच्या वकुबाच्या माणसाने अशा विडंबन वगैरेच्या मागे लागावे, हे पाहून आम्हाला–आमच्यापैकी विशेषतः गडकऱ्यांना–हसावे की चिडावे तेच कळेना.) थोडक्यात जुन्या थाटाचे दिग्दर्शन आणि त्याच वळणाचा कलाकारांचा अभिनय याबाबतीत आम्हाला तक्रार करण्यास किंचितही वाव नाही. रुक्मिणी, सुभद्रा, भामिनी आणि सिंधू या नायिकांची सोंगे वठविणाऱ्या उमाशशी भालेराव आणि शारदेचे सोंग वठविणाऱ्या मीना फातरफेकर यांच्या गाण्याचा बाजही एकंदरीत गंधर्वी गायकीचाच होता. पात्रांनी स्वगते म्हणणे ही स्वगते वा नाट्यगीते चालू असताना रंगमंचावरील अन्य पात्रांनी 'आता आपण नेमके काय करायचे' या विचारात पडणे इत्यादी दोषही या प्रयोगात मन.पूर्वक जपले गेलेले पाहून आम्हाला परम संतोष वाटला.

इतके सर्व असूनही आमचा प्रमुख आक्षेप उरतो, तो म्हणजे या नाट्यप्रयोगावर आपण लेखिका म्हणून स्वतःची मोहर कशी काय उठवलीत? या नाट्यप्रयोगात केलेल्या पाच प्रवेशाचा आम्ही याआधी उल्लेख केलाच आहे. सोयीनुसार एखाद्या पदाची जागा बदलणे आणि त्या अनुषंगाने दोन-तीन वाक्ये इकडेतिकडे सरकविणे (उदाहरणार्थ–'एकच प्याला' मधील 'कशि या त्यजू पदाला' हे असे जागा बदललेले गीत) यासाठीसुद्धा मुळात आमची परवानगी आवश्यक होती, मग त्या सगळ्याला स्वत च्या नावावर खपवणे दूरच राहिले.

की या पाच प्रवेशांना एका साखळीत बसवण्यासाठी आपण प्रत्येक प्रवेशाच्या आधी नटी आणि सूत्रधाराचा उपप्रवेश टाकला आहे, त्यामुळे सर्व नाटकाची लेखनमालिका आपणाकडे आली असल्याचे आपण मानता? आमच्याच नाटकाच्या कथा अथवा कथासूत्र खरे म्हणजे ही नटी वा सूत्रधार सांगतात. 'शारदा' नाटकातील प्रवेशाआधी तर त्या नटीने मूळ नाटकातीलच वल्लरीच्या तोंडची 'श्रीमत पतीची राणी' आणि 'म्हातारा इतुका न अवघे पाउणशे वयमान' ही दोन पदे गायली. (तिने ती फारच वाईट म्हटली, हा भाग सोडून द्या.) तर अशा रीतीने ताब्याच्या वा कथिलाच्या कोंदणामध्ये हे पाच प्रवेश बसवल्यानंतर त्या कोंदणासकट संपूर्ण कलाकृती स्वत.च्या नावावर जमा करून टाकण्याचे कौशल्य आपण कसे दाखविले?

आमच्या स्वर्गस्थ आठवणीप्रमाणे सात–आठ महिन्यांपूर्वी टी. व्ही. वर 'पंचनायिका' याच नावाचे नाटक सादर झाले होते आणि त्याच्याही लेखिकेचे नाव लीला फणसळकरच होते; पण त्या नाटकामध्ये जुन्या नाटकांमधील पाच नायिकांच्या मनाचा एका वेगळ्या दृष्टिकोनातून वेध घेऊन त्यांच्या भूमिकांची एक नवीच मांडणी सादर केली होती. अर्थातच या साऱ्यातून एक स्वतंत्र कलाकृती साकार झाली.

दुर्दैवाने आम्ही पाहिलेल्या 'पंचनायिका'च्या बाबतीत तसे म्हणता येत नाही. तरी आपण आमच्याकडे या नाटकात प्रवेश उद्धृत करण्यासंबंधी परवानगीची मागणी केली होती का, याचा त्वरित खुलासा करणे.

आपले कृपाभिलाषी
अण्णासाहेब किर्लोस्कर
गोविंद बल्लाळ देवल
कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
राम गणेश गडकरी

—सदानंद बोरसे

चित्रपट

## गोंधळात गोंधळ

चित्रपटांची नावं फसवी असतात, हे 'गोंधळात गोंधळ' पाहून पुन्हा एकदा पटलं. चित्रपटाची जाहिरात 'तुफान विनोदी' पद्धतीनं केलेली आणि नावही असं पटकन लक्ष वेधून घेणारं, त्यामुळं पडद्यावरही काही धमाल कॉमेडी पहायला मिळणार, असं वाटत होतं; पण सर्वसामान्य मराठी चित्रपटांप्रमाणे याही चित्रपटानं निराशा केली. पडद्यावर ज्या घटना घडतात त्यांना गोंधळ का म्हणावयाचं या प्रश्नानं आपल्या मनात मात्र बराच वैचारिक गोंधळ निर्माण होतो, असे नाही तर तसे—या चित्रपटांनी आपलं नाव सार्थ केलं आहे हे नक्की.

सर्व पुरुषांची 'जनरल' भ्रमरवृत्ती आणि सर्व स्त्रियांची 'जनरल' संशयीवृत्ती यातून हा तथाकथित गोंधळ निर्माण होतो. रवींद्र घाटगे (रवींद्र महाजनी) हा आबासाहेब घाटग्यांचा एकुलता एक मुलगा तर मदन (अशोक सराफ) हा त्यांचाच मानलेला मुलगा. रवी डेप्युटी कलेक्टर असतो; पण हिरोगिरी करण्याखेरीज तो काहीच करत नाही. मदन खरोखरच हीरो व्हायची स्वप्नं पहात असतो. ज्याच्या त्याच्या 'स्टेप्स' प्रमाणे रवी हेमा (प्रिया तेंडुलकर) हा आधुनिक मुलीच्या प्रेमात पडतो, तर मदन मंगला (रंजना)च्या प्रेमात पडतो. मंगल ही गोव्याकडची गावंढळ, अशिक्षित, पण अतिशय तिखट मुलगी असते. दोघाची लग्नं होतात. इथपर्यंत काही किरकोळ गोष्टी सोडल्या—म्हणजे रवी वडिलांना 'तुम्ही ठरवलेल्या मुलीशी मी लग्न करणार नाही' असं ठणकावतो, तर वडिलांनी नेमकी तीच मुलगी (हेमा) रवीसाठी निवडलेली असते, यासारख्या मध्यंतरापर्यंत प्रेक्षक 'गोंधळ कुठे आहे?' या प्रश्नाने अस्वस्थ झालेले असतात. मध्यंतरानंतर सावित्री (कविता किरण) ही पडद्यावर अवतरते आणि संशयकल्लोळाचा खरा गोंधळ सुरू होतो. सावित्री म्हणजे रवीचा बॉस सुब्रमण्यमची मेव्हणी. मराठी संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी ही सुंदर मेव्हणी चक्क रवीच्या घरात दाखल होते, नवऱ्याची भ्रमरवृत्ती ओळखून हेमा सुज्ञपणे आपल्या मावसभावाला (संजय जोग) बोलावून घेते आणि आपल्या मार्गातला काटा काढते. भारतीय संस्कृतीचे गोडवे गात चित्रपट संपतो. 'गोंधळात गोंधळ' ची ही कथा; पण कथा वाटते तेवढी सरळ नाही. गोंधळ निर्माण करण्यासाठी एकमेकाच्या खोल्या बदलणे, खोटी चिठ्ठी वापरून दुसऱ्याची जागा चोरून वापरणे, यासारख्या ठरीव हुकमी घटना निर्माण केल्या आहेत. तरीदेखील चित्रपट हवी तेवढी पकड घेऊ शकत नाही.

'आपली माणस' नंतर श्री. नाईक यांचा हा दुसरा चित्रपट. संकलकाच्या खुर्चीतून नाईक आता दिग्दर्शकाच्या खुर्चीत गेले आहेत आणि यशस्वीही झाले आहेत. फुटकळ कथा असतानाही सिनेमा बघवतो तो केवळ कलाकारांमुळे. प्रिया तेंडुलकर, रंजना, अशोक सराफ यांनी मन लावून काम केले आहे. सुब्रमण्यमच्या भूमिकेत राघवेंद्र कडकोळनाही बराच वाव मिळाला आहे. कविता किरणला विशेष काम नाही; पण ती अभिनय करू शकते, हे या चित्रपटात जाणवतं. प्रिया तेंडुलकर आणि कविता किरण यांच्यामुळे मराठी पडद्यावर 'सोफिस्टिकेटेड' नायिका मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. रंजनाची अभिनयातली जाण आणि सहजता यामुळे तिने रंगवलेली मंगला छाप पाडून जाते.

चित्रपटाची दुसरी जमेची बाजू म्हणजे, छायाचित्रण. गोव्याच्या पार्श्वभूमीवर केलेलं बाह्यचित्रण लक्षात रहाण्याजोगं आहे. चित्रपटातली सर्व गीतं जगदीश खेबुडकरांची आहेत. गीत आणि चाली नेहमीप्रमाणेच आहेत. 'मंगला तू मंगला' या गाण्याचा ठेका ठीक जमला आहे. थोडक्यात काय, सामूहिक प्रयत्नांमुळे हा चित्रपट एकदा बघण्याजोगा झाला आहे. हलक्या–फुलक्या विनोदी चित्रपटांचं मराठी सिनेमासृष्टीला वावडं असताना असा चित्रपट काढण्याचा प्रयत्न नक्कीच कौतुकास्पद आहे. 'गोंधळ'ला दुसरं पारितोषिक मिळाल्यामुळं आता ते सिद्धही झालं आहे. *

## चित्रपटाबाहेर

□ पूर्वीच्या काळी सिनेमात बिनधास्तपणे अंग उघडी टाकणारी रेखा आता अलीकडच्या सिनेमात अगदी अंगभर साडीत किंवा कपड्यात दिसते. तिचं उतू चाललेलं कपड्यांचं वेड निर्मात्याची मात्र डोकेदुखी होऊन बसलं आहे. कारण या कपड्यावर होणाऱ्या खर्चाला काही सुमारच नसतो. सिनेमातील दुसऱ्या हिरॉइनपेक्षा आपल्या साड्या किंवा ड्रेसेस अधिक उठून दिसले पाहिजेत, असा रेखाचा अट्टाहास असतो; पण अलीकडेच 'औरत'च्या सेटवर मात्र रेखानं सगळ्यानाच आश्चर्याचा धक्का दिला. या सिनेमात ती पारंपारिक भारतीय स्त्रीची भूमिका रंगवणार आहे आणि भारतीय स्त्री म्हटल्यानंतर साडी अपरिहार्यपणे आलीच. त्यामुळं या भूमिकेविषयी तिला सांगितल्यानंतर रेखानं काय करावं? ती उठली ती सरळ वांद्र्याच्या एका साडीसेन्टरमध्ये गेली आणि तासाभरात तिनं जवळजवळ पंचवीस हजार रुपयाच्या साड्या खरेदी केल्या! हे पाहावाच, शूटिंगला सुरुवात

झाली नाही तर ही अवस्था, मग पुढे काय? या कल्पनेनं निर्मात्याच्या पोटात अक्षरशः गोळा उठला. पण रेखाने त्या खर्चाचा भार निर्मात्यावर न टाकता स्वतः केला आणि त्यामुळे या निर्मात्याच्या तोंडी सध्या रेखाच्या कौतुकाशिवाय दुसरा शब्दच नाहीय.

¤

फिल्मी वर्तुळात सध्या कुमार गौरव आणि रती अग्निहोत्री यांच्या वाढत्या स्नेह-संबंधाची विशेषच चर्चा होते आहे. त्यावरून कुमार गौरवच काय, पण एकंदरीतच नव्या पिढीची प्रेमप्रकरणं भलत्याच स्पीडने रंगताहेत असं दिसतंय. 'लव्हस्टोरी'च्या वेळेस त्याने रीमा कपूरबरोबर झालेला साखरपुडा मोडून विजयंतामध्ये इंटरेस्ट घ्यायला सुरुवात केली आणि सगळीकडे एकच धुमाकूळ घातला. पुढे त्याला पूनम धिल्लोंवाचून चैन पडेनासं झालं. 'लव्हर्स' आणि 'अवर इंडिया' या दोन्ही आगामी सिनेमात पूनमलाच नायिका म्हणून घ्यावं, असा त्यानं हट्ट धरला, पण त्याच्या म्हणण्याला किंमत न देता राजेंद्रकुमारनं पद्मिनी कोल्हापुरेला घेतलं. आता 'स्टार'मध्ये रती अग्निहोत्री बरोबर काम करताना त्याची रतीवरच विशेष मर्जी बसली आहे आणि ती किती चांगली आहे, तिच्याबरोबर काम करण्यात किती मजा येते वगैरे गोष्टी तो सगळ्यांना रंगवून रंगवून सांगतो आहे. बिचाऱ्या विजयंता आणि पूनम! दोघीही त्याच्या नावाने खडे फोडत आहेत.

¤

'आनंद और आनंद'च्या बाबतीत देव आनंदची ढिलाई आणि चालढकल पाहून कंटाळलेला सुनील आनंद, या जन्मी तरी सिनेमात काम करायला मिळणार नाही, अशाच समजुतीत होता. पण तेवढ्यात देव-आनंदने शूटींगला सुरवात करून त्याला दिलासा दिला. पण पहिले काही दिवस उत्साहात शूटींग पार पडल्यानंतर हा सिनेमा 'नायिकाच नाही' म्हणून रखडला. सुनील आनंदला एकदम 'ब्रँड न्यू' नायिका मिळावी म्हणून देव आनंदने आतापर्यंत किती पोरी पाहिल्या कुणास ठाऊक, पण त्यातली, एकही त्याच्या पसंतीला उतरली नाही; तर त्याने ज्यांना विचारले, त्या मुलींनी त्याला उडवून लावलं. पहिल्यांदा तो सनी दयोलची नायिका अमृता सिंग हिच्यासाठी प्रयत्न करीत होता. ती जरी सनीबरोबर 'बेताब,' 'सन्नी' आणि 'हीर रांझा' अशा तीन चित्रपटात काम करीत असली तरी तिला नायिका म्हणून घ्यायचं आणि 'आनंद और आनंद' आधीच पूर्ण करायचा, असा देव आनंदचा बेत होता. पण 'सन्नी', 'बेताब' आणि 'हीर-रांझा' हे तीन सिनेमे पूर्ण होईपर्यंत अमृताने दुसऱ्या कुठल्याही सिनेमाच्या ऑफर्स घेऊ नयेत, अशी अट घालून धर्मेन्द्रने देवआनंदचा डाव धुळीस मिळवला. त्यामुळे देवआनंदने नूरजहाची मुलगी हीना हिच्यासाठी प्रयत्न केले. पण, तिचं लग्न ठरलं असल्याने ती सिनेमात काम करू शकणार नाही, असं सांगून नूरजहाननेही देवला सोयीस्करपणे कटवलं. त्यानंतर आता देव आनंदने सोनिया मुलचदानी नावाच्या एका तरुणीची निवड ९९% निश्चित केली असून त्याने तिला वजन कमी करण्यासाठी सध्या पाचगणीला पाठवलं आहे. त्यानंतर तो तिला आशा चन्द्राकडे अभिनयाचं शिक्षण देण्यासाठी पाठवणार आहे. म्हणजे हे सारे सोपस्कार देवच्या स्पीडनं पूर्ण होईपर्यंत सुनील आनंदला हरी हरी करत बसणं आलं.

¤

दत्त कुटुंबाला आता परत जरा बरे दिवस येऊ घातलेत, असं म्हणायला हरकत नाही. कारण संजय दत्त नुकताच जर्मनीची हवा खाऊन परतला आणि या ट्रीपनं त्याच्यात आमूलाग्र बदल घडवून आणल्याने इतके दिवस हमरीतुमरीवर आलेले बाप-लेक आता अगदी गळ्यात गळा घालून फिरताना दिसतात. सध्या दोघांच्यातही 'आपलंच कसं चुकलं' हे दाखवून देण्याची स्पर्धा लागली आहे. 'माझी बेजबाबदार आणि अतिरेकी वागणूक यामुळेच आमच्यात वाकडं आलं', असं संजय दत्त म्हणतो; तर 'त्याच्या मनाच्या नाजूक अवस्थेत मीच त्याला समजून घेऊ शकलो नाही', असा पिताजी सुनील दत्त यांचा दावा! ते काहीही असो. पण सध्या दत्त फॅमिली 'आनंदी आनंद गडे' अशा अवस्थेत आहे. सगळं मार्गी लागल्याचं पाहून आता तरी निदान नर्गिसच्या आत्म्याला शांती लाभेल.

¤

बी. आर. चोप्रांनी 'तलाक तलाक, तलाक' मधला रोल आपल्याला न देता सलमाला दिल्याबद्दल झीनत अमानचा रागाने अक्षरशः तीळपापड झाला होता. त्यामुळे दिलीपकुमारच्या घरी एका पार्टीच्या वेळी झीनत आणि सलमाची आमनेसामने गाठ पडल्यानंतर या दोघींची चांगलीच रंगणार, असं सगळ्यांना वाटलं होतं. पण प्रत्यक्षात घडलं मात्र उलटंच! 'तलाक तलाक तलाक' मधला रोल बी. आर. नी तुला दिला म्हणून मी तुझ्यावर जळते वगैरे वाटेल ते आरोप माझ्यावर उगीचच केले आहेत, पण ते सगळे खोटे आहेत, त्यामुळे तू त्याच्याकडे लक्ष देऊ नकोस, असं झीनतनं सलमाला सांगितलं. तेव्हा सलमानं तिला सांगितलं की, 'मी कुठलीच फिल्मी मॅगेझिन्स वाचत नाही. त्यामुळे मी हे काही वाचलेलं नाही आणि गैरसमज होण्याचा प्रश्नच येत नाही. उलट 'इन्साफ-का तराजू' पाहिल्यापासून मी तुमची फॅन झाले आहे!' सलमाचं बोलणं ऐकून झीनत-ला अगदी भरुन आलं आणि त्यांच्यातली 'गट्टी फू' संपली. आता झीनतची अगदी जवळची मैत्रीण म्हणजे सलमा!

—शुभदा रानडे

---

## पुणे : दिनांक १७ एप्रिल

पृष्ठ ३ वरून

मधील परस्पर नातेसंबंधाच reporting म्हणजेसुद्धा पत्रकारिताचं आहे. या दोनही गोष्टी एकाच टोकाला मिळणाऱ्या आहेत. अंतर्मुखता आणि बहिर्मुखता असा फरक करण्याने मराठी साहित्याची व पत्रकारितेची हानीच होणार आहे.'

पत्रकारिता आणि कादंबरी—वास्तव आणि अवास्तव हे मुद्दे मांडण्यात आणि खोडून काढण्यातच परिसंवाद संपला. 'पत्रकारिता रंजकतेकडे झुकत आहे आणि कादंबरी वास्तवाकडे वळत आहे' यासारखे निष्कर्ष काढणारे एक—दोन मुद्दे सोडले तर परिसंवाद ठीक झाला.

परिसंवादानंतर झालेली ग्रंथनारायणाची पूजा म्हणजे र. कृ. जोशींनी नव्याने प्रचलित केलेलं 'हॅपनिंग', (र. कृ.च्या मते आपण मध्यमवर्गीय माणसं फार लाजतो बुवा! जे करावसं वाटतं ते उत्कटतेनं कधीच करत नाही. साध्या मोठ्यानं टाळ्यांसुद्धा आपण

वाजवत नाही. राष्ट्रगीत पुटपुटतं म्हणतो. हे आहे काय ?) ग्रंथनारायणाची पूजा झाल्यावर सगळ्यांना बुक्का लावला. (बुक्का हा शब्द 'बुक'वरून झाला आहे अशी बारीक कोटी करून श्री. अनंत भाव्यांनी खसखस निर्माण केली.) पूजेच्या प्रसादसेवनात मंडळी इतकी रमली की, काहींना हरिभाऊंची मुलाखत सुरू झाल्याचा पत्ताच नव्हता ! (भेळ मात्र फारच छान होती.)

सर्वश्री अनंत भावे आणि रामदास भटकळ यांनी हरिभाऊ मोटयाची घेतलेली प्रदीर्घ दिलखुलास मुलाखत हा एक चांगला 'event' होता. स्वतःच्या वैयक्तिक आनंदासाठी प्रकाशक बनलेला; पण त्याचा व्यवसाय न करता उत्कृष्टतेची जपणूक करणाऱ्या या आगळ्या प्रकाशकाला ऐकण्याची सगळ्यानाच उत्सुकता होती. विचारलेल्या प्रश्नांना हरिभाऊंनी नेमकी उत्तरे दिली. त्यातून त्याची स्वत.ची ओळख तर झालीच; पण चागला प्रकाशक कसा असावा, व्यवसायातली नैतिकता म्हणजे काय याचीही जाता जाता माहिती मिळाली.

ह. वि. मोटे प्रकाशन म्हणजे प्रकाशन क्षेत्रातलं आदरणीय स्थान ! त्याची सगळीच प्रकाशन एकाचढ एक सरस. विश्रब्ध शारदा (दोन खड), हिंदोळयावर, कळयाचे नि.श्वास, सूर्यास्त–किती उदाहरणं द्यावीत ? पण हरिभाऊचं लाडक प्रकाशन आहे कै. कोल्हटकराच 'बहुरूपी'! याशिवाय त्याची खास आवड म्हणजे 'विश्रब्ध शारदा', निवडक शेजवलकर, रणागण, हिंदोळयावर आणि रामशास्त्री. इतर प्रकाशनातली 'धार आणि काठ', साहित्यातले मानदड-- 'व्यक्ती आणि वल्ली' त्याना चागली प्रकाशन वाटतात. लक्ष्मीबाई टिळकाची 'स्मृतिचित्रं' आपल्याला मिळालं नाही म्हणून त्याना वाईट वाटत.

समारोपात हरिभाऊ म्हणाले, 'I never feel lonely, I feel full of life'.

रंगलेली मुलाखत सपली. मुलाखतीतून फक्त हरिभाऊच कळले नाहीत तर त्याच्या पत्नी सौ. कृष्णाबाई मोटे याचही चित्र उभं राहिलं. सपूर्ण मुलाखतीत या पति-पत्नीचं association सतत जाणवत होतं.

– मेधा देशपांडे

# एस. एम.

## एका संध्याकाळी मुक्काम मिरज

एखादी संध्याकाळ अचानक बरचसं काही देऊन जाते. १३ एप्रिलला असंच झालं ४–५ दिवस श्री. एस. एम. जोशीचा मुक्काम सांगली जिल्ह्यात होता. बॅ. नाथ पै हायस्कूलच्या आर्थिक मदतीसाठीही थोडाबहुत प्रयत्न होता. तेव्हा मिरज रोटरी क्लबनं १३ एप्रिलच्या संध्याकाळी त्यांच्याशी सुसंवाद घडवून आणला.

८० जवळ आलेल्या या तपस्वी राजकारण्यानं बरंच काही पाहिलेलं ! तेव्हा गप्पाच्या स्वरुपातलं त्यांचं विचारप्रकटन हा योग चांगला होता. कारण आमच्या सांगली मिरजकडील लोकांना असा योग सहजपणे मिळणं फार अवघड. घडवून आणला तरच येणार. ८० च्या डिसेंबरमध्ये असाच एक अपूर्व योग मिरज रोटरीन घडवून आणला होता. नानी पालखीवालांचं भाषण ! प्रचंड यातायात करून घडवून आणलेलं पालखीवालाच हे भाषण ही मिरजेच्या सांस्कृतिक जीवनातील एक Event होती.

एस. एम. १३ एप्रिलच्या सायंकाळी अत्यंत Relaxed मूडमध्ये मिळाले माझ्या सुदैवाने विजेचा असहकार असल्याने हॉलमध्ये कार्यक्रम लगेच चालू करता येण जमत नव्हत. त्यामुळ बाहेर व्हराडयात त्यांच्याशी बोलता आल. प्रादेशिक पक्षाची वाढ धोकादायक आहे, निदान धोका पोचू शकतो. याबद्दल त्याना विचारलं. ते त्यानी तसं मान्यही केलं, पण हे क्षणिक आहे. गोंधळून जाण्याचं कारण नाही, अ. भा. पातळीवरील पक्षाविषयी निर्माण झालेला एक प्रकारचा भ्रम निरास हे याच मूळ आहे, कारण कोणताच प्रादेशिक पक्ष, निदान तूर्तास तरी निश्चित असा कार्यक्रम किंवा समस्या घेऊन पुढे येत नाहीय ! मी विचारलं पण अ. भा. पातळीवरील विरोधी पक्षानी या प्रादेशिक पक्षाशी निवडणुकाच्या वेळी समझोता केला तर या निवडणुकीनंतरही एक अस्थिर सरकारच जन्मणार ! कारण सध्या 'आंध्र, म्हैसूर, केरळ येथे निर्माण होऊ पाहणारे रामाराव (N.T.R.) राजकुमार यांचे पक्ष सुरुवातीला तरी कमालीचे लोकप्रिय असणार आहेत हेच एस.एम. नी संयुक्त महाराष्ट्राचे उदाहरण देऊन सांगितलं. यांची तात्कालिक लोकप्रियता ओसरली की, पुन्हा सारं ठीक होईल ! मला उगीचचं वाटलं आता अण्णांची फार विचार करायची इच्छाच दिसत नाही. कारण प्रादेशिक पक्षांचा गंभीर धोका केरळपासून पंजाब पर्यंत सगळीकडेच जाणवतोय ! पण फार ताणावसं वाटलं नाही, मग मी राष्ट्रवादाच्या संकल्पनेबद्दल विचारलं तर ते म्हणाले; धर्माधिष्ठित राष्ट्रवाद ही कालबाह्य कल्पना आहे. कारण ती मानली तर आपण यादवीला निमंत्रण देणार आहोत, मानवतावादावर अधिष्ठित राष्ट्रवाद हाच एक तरुणोपाय आहे त्या वेळी त्यानी नागालँडमध्ये केलेल्या चर्चेचे काही उल्लेख सांगितले. आणि साधा प्रश्न विचारला की, भारतातून फुटून चीनकडे जाण्याने तुमचे भले होईल की, भारतात राहून ! हा साधा विचारच शेवटी राष्ट्रवादाची प्रेरणा होतो. मानवतावादावर अधिष्ठित राष्ट्रवादाची कल्पना योगी अरविंदानीही माडलेली आहे. एस. एम. याचं म्हणणं योग्य आहे पण शेवटी भौगोलिक राष्ट्रवादच खरा हे 'सत्य' जगात मान्य केलं गेलं आहे.

आता फार खोलात जायला वेळ नव्हता वीज येण्याच लक्षण नसल्याने रोटरीप्रमुखानी सभा गच्चीवर वाऱ्यात घेण्याचे ठरवले आणि संध्याकाळच्या प्रसन्न वातावरणात मोजक्या पण जाणकार श्रोत्याच्या पुढे सुरुवातीलाच शिक्षणासंबंधी विचार माडताना एक मार्मिक सूत्र लक्षात आणून दिलं. या देशाच्या महापुरुषानी स्वातंत्र्याकरिता खटपट करतानासुद्धा प्रथम येथल्या शिक्षणाचा विचार केला. पार रानडे टिळक याच्यापासून गांधी-जयप्रकाश या महापुरुषाना भारतातल्या तरुणाच्या शिक्षणाबद्दलची काळजी होती. राष्ट्रीय शिक्षणापासून मूलोद्योगा–पर्यंतच्या शिक्षणाच्या साऱ्या कल्पना हे त्याचेच फलित आहे. किंबहुना स्वातंत्र्यलढा आणि शिक्षणासंबंधी चळवळ या हातात हात घालून वाटचाल करताना दिसतात. कारण या देशाच्या कल्याणाबद्दलची जाणीव करून

देणारं शिक्षण नव्या पिढीला मिळणं आणि स्वातंत्र्यानंतर शिक्षणाच्या साह्यानं या देशाचं मंगल करणं हे दोन्हीही उद्देश महत्त्वाचे होते. पण स्वातंत्र्यानंतर हे दोन्हीही उद्देश बाजूला पडले आणि शिक्षणसंस्थांना विद्या-पीठांना कारखान्याचे स्वरुप आलं परिणामी शिक्षण घेण्यातला राष्ट्रकल्याणाचा महत्त्वाचा उद्देश बाजूला पडला आणि स्वकल्याण हाच उद्देश राहिला आणि त्यामुळे शिक्षणक्षेत्रा-तला सगळा भ्रष्टाचार निर्माण झाला. एस. एम. नी केवळ दुखणंच मांडलं असं नव्हे तर उपायही सांगितले. पुण्यातलं ज्ञानेश्वर विद्या-पीठ हा त्या दृष्टीने चांगल्या उपायांपैकी एक उपाय आहे. अशा प्रकारची स्वायत्त विद्यापीठे ज्ञान देताना केवळ पदवी हा मर्या-दित उद्देश ठेवत नसल्याने ज्यांना ज्या विष-याचे ज्ञान घेऊन आयुष्यात यशस्वी होता येईल, इतकंच नव्हे तर राष्ट्रकल्याणही साधता येईल असे वाटते, त्यांना हा मार्ग उत्तम आहे.


मला इथं थोडी गफलत होते आहे असं वाटलं. कारण 'स्वायत्त' विद्यापीठांनी असं शिक्षण देणं व त्यासाठी योग्य ती फी घेणं आणि कर्नाटकातल्या खाजगी वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी महाविद्यालयांनी कॅपिटिशन फी घेणं यात फार तर गुणात्मक अथवा तपशीलात्मक फरक असेल; पण व्यवहारत: दोघेही एकाच पातळीवर येतात. एका रोटे-रियन्‌नी ही शंका एस्. एम् ना विचारली-सुद्धा; पण ही शंकाच अशी आहे की, याचं निर्णयात्मक उत्तर देणं अवघड आहे. एस. एम.ना याची जाणीव असावी. प्रश्न अनुत्तरि-तच राहिला.

स्त्री–स्वातंत्र्याबद्दल शिक्षणाच्या अंगांनी विचार करताना अण्णांनी जी एक समस्या सांगितली ती साऱ्यांनाच गंभीरपणे विचार करावयास लावणारी आहे. शिक्षण घेतल्याने व त्या आधाराने आर्थिक स्वातंत्र्य मिळाल्याने 'स्त्री–स्वातंत्र्य' जवळ येत नाही. किंबहुना लहान गावात नोकरी करणारी स्त्री जास्त जास्तच 'गुलाम' होत आहे. हा विचार अस्वस्थ करणारा तर होताच; पण 'स्त्री–स्वातंत्र्यासाठी स्त्री–शिक्षण' हे सूत्र सांग-णाऱ्यांना अंतर्मुख करणारा होता. तेव्हा चाकोरीबद्ध शिक्षण हे जसं स्वतंत्र राष्ट्राला 'स्वराज्य' देऊ शकत नाही, तसं स्त्रीला खऱ्या अर्थानं स्वातंत्र्यही देऊ शकत नाही ! म्हणजे पार जोतिबा फुलेंच्यापासूनचे स्त्रि-यांच्या शिक्षणाचे सारे प्रयत्न मृगजळामागची धाव ठरली आहे. हा विचार स्त्रीशिक्षण-विषयक कल्पनांना हादरा देणारा आहे.

मग याला काय उपाय ? मानवतावादावर आधारित संपूर्ण क्रांतीचा सांगितला गेलेला विचार ! प्रत्येक व्यक्तीस मी पूर्ण 'स्वतंत्र' झालो, माझ्यात पूर्ण क्रांती झाली असं आणि दुसऱ्या व्यक्तीतही ती होणं अत्यंत आवश्यक आहे असं वाटणं हा एकच उपाय त्याला आहे, असं त्यांनी सांगितलं. जय-प्रकाशांच्या संपूर्ण क्रांतीचं हे साधं सोपं स्पष्टीकरण जेव्हा त्यांनी दिलं तेव्हा मला गंमत वाटली. अत्यंत निष्ठेने समाजवादी पक्षाचं अनुयायित्व पत्करून, सारं राजकीय आयुष्य घालवणारा हा विचारवंत पंडित-दीनदयाळ यांच्या विचारांशी किती जवळ आला आहे ! एकात्म मानवतावादाची संक-ल्पना संपूर्ण क्रांतीच्या कल्पनेशी फार जवळची आहे, असं मी माझ्या समाजवादी मित्रांना चर्चेतही सांगतो. आज एस. एम.ही तेच बोलले, वैयक्तिक चर्चेतही अप्रत्यक्षपणे योगी अरविंदांच्याच कल्पनेला मान्यता दिली. तेव्हा मिरज रोटरीच्या त्या प्रसन्न संध्याकाळी, आयुष्याची संध्याकाळ दृष्टिपथात आलेल्या या विचारवंताने कोणत्याच तत्त्वाचा, हे तत्त्व या पक्षाचे असा आग्रह न धरता, हे तत्त्व राष्ट्र-कल्याणाचे हे साधे सूत्र मनाशी धरून साऱ्या श्रोत्यांशी सुसंवाद केला. मन खरोखरीच आनंदाने भरून आले आणि मग चर्चेच्या वेळी त्यांनी मला सांगितलेल्या एका सूत्राचा पूर्ण उलगडा झाला. कोणताही राजकारणी वयाच्या ७०–७५ नंतर विशिष्ट पक्षाचा रहात नाही–निदान राहू नये ! त्याचे विचार त्याच्या पक्षाला किंवा विरोधी पक्षाला मार्गदर्शक म्हणूनच पाहिले जावेत. त्याच्या-जवळच्या या 'मधुघटा'तले मधुकण आता साऱ्यांचे आहेत !

वयाच्या ८०–८२ वर्षांनंतरही सत्तेचे राजकारण खेळणाऱ्यांच्या कोलांट्या उड्या दररोज वृत्तपत्रात वाचत असतानाच एस. एम.नी दिलेला हा विचार, मला वाटतं, लोक-शाहीवर आणि व्यक्तिस्वातंत्र्यावर श्रद्धा असणाऱ्या कोणत्याही सुबुद्ध नागरिकाला धीर देणारा आहे. १३ एप्रिलच्या या रोटरी-संध्येची माझी ही कमाई मला फार मोठी वाटली !

–आनंद बागलकोटे

# लाल किल्ल्यातील अभियोगाची कहाणी

**लेखक : पु. ल. इनामदार**

**मूल्य : २० रुपये**

राजहंस प्रकाशन, पुणे ४११ ०३०

## कथासूत्र....

एरणगावातले अप्पासाहेब चव्हाण म्हणजे गावकऱ्यांचा देव होता. मुकुंदराव हा अप्पासाहेबांचा एकुलता एक मुलगा. त्याच्या एका करणीनं एरणगाव अस्वस्थ झालं होतं. गावात नव्याने रहायला आलेल्या देसाई कुटुंबात एकूण तीन माणसं–श्यामकांत, त्याची बायकोकल्पना आणि मुलगी नीलू. कल्पनाच्या अप्रतिम लावण्यामुळे मुकुंदरावाच्या मनात वादळ निर्माण झालं. श्यामकांत नसताना त्याने कल्पनावर जबरदस्ती करण्याचा प्रयत्न केला. झाल्या प्रकारानं होरपळलेलं देसाई कुटुंब मुंबईला नाथाकाकांकडे येऊन पोचलं. गोळे हा काकांचा सहृदय श्रीमंत मित्र. त्याने श्यामकांतची मुंबईला बदली करवून दिली, त्याला मुंबईत रहायला घर मिळवून दिलं. अडी-अडचणीला श्यामकांत गोळेकडून काही उसने पैसे घेत असे. ते कल्पनाला पसंत नव्हतं. श्यामकांतने परत कधीही उसने पैसे घेणार नाही, असं कल्पनाला वचन दिलं.

काही दिवस लोटले. एक दिवस गोळेने कल्पनाजवळ एक हजार रुपये ठेवायला दिले. चुकून शंभराची एक नोट जास्त आली. श्यामकांतच्या पोस्टाच्या हिशेबात एकशेदहा रुपये कमी भरत होते. अस्वस्थ श्यामकांतला कल्पनाने ती शंभराची नोट दिली. श्यामकांत नेहमीच पैशाच्या अडचणीत. मुलीची किरकोळ हौस भागवण्यासाठीसुद्धा त्याने घड्याळ आणि अंगठी गहाण टाकली होती !

शेजारचे कर्णिक चैनीत राहू शकतात. आपलीच परिस्थिती ओढगस्तीची का? या विचाराने कल्पनाची बेचैनी वाढतच होती.

# सबला

**माधव शिरवळकर**

## : दोन :

अजूनीही गोळेची रजा चालूच होती. कित्येक महिन्यांत त्यानं न घेतलेली रजा त्याला एकदम मंजूर झाली होती. दिवसभर चैन करण्याशिवाय त्याला दुसरा उद्योगच नव्हता. राहून राहून त्याच्या मनात तो त्या हजार रुपयांचा विचार येत होता आणि ती घटना आठवत होती.

ती रात्र गोळेच्या आयुष्यात भलतीच नशीबदार निघाली होती आणि रात्रीनं नशीब पांघरलेलं पाहून गोळेनं तिला मनसोक्त भोगली होती. त्या रात्री तो सपना क्लबमध्ये पत्त्यातील राजा–राणीच्या सान्निध्यात होता. क्लबमध्ये खूप माणसं असूनही गडबड फारशी नव्हतीच. फक्त सिगरेटींचा धूर तिथल्या तिथं रेंगाळत होता. बाहेर जाण्याची वाट शोधत होता. गोळे एखाद्या मुत्सद्दी माणसासारखा हातातल्या पत्त्यांकडे पहात होता. सिगरेटचा झुरका घेत होता आणि एक एक चाल करत होता. मध्येच वाटलं तर चहाचा कप न बोलताही त्याला मागवता येत होता. फ्लशच्या तीन पत्त्यांच्या त्रिकोणात गोळेच्या बरोबरच्या खेळाडूचं वाटोळं चाललं होतं. रात्रीनं पांघरलेल्या नशिबाखालून एक एक ट्रायो, एक एक पेअर निघत होती. गोळेचा खिसा रुपये पोटात घेत होता.

रात्र झरझर संपली. गोळेला वाटलं ही रात्र कधी संपूच नये; पण ती संपली. सकाळी नऊपर्यंत गोळे खेळत राहिला. त्याच्या हातातले पत्तेसुद्धा कंटाळले असावेत. खेळणं झाल्यावर क्लबच्या मॅनेजरनं ते पत्ते रद्दीत टाकून दिले. खिसे चाचपत आळसावलेल्या आनंदानं गोळे घराकडे निघाला होता. दिवसभर झोप काढायची होती. रात्रभर बरोबर खेळणारा सहानी सकाळच्या पारी मायनस तोंडानं बाहेर आला होता. तो गोळेला म्हणाला :–

'यार, तेरे तकदीरने दुनिया लूट ली हमारी !'

'छोडो यार, तुम्हारी दुनिया अगर इतनी छोटी होती तो ये टार रोड बनानेके लिये मजदूर नही मिलते...खैर, लिफ्ट देगा ?' गोळेनं त्याच्या ॲम्बॅसॅडरकडे पहात विचारलं.

'क्यूं नही, तुम्हे लिफ्ट नही देंगे तो और किसे देंगे, चलो गाडी आपहीके लिये तो है !'

गाडीने धीमा वेग घेतला. सहानी म्हणाला,

'यार, गोले आज तो तेरा जेब सडका है, क्वार्टर आपनेको पिलाएगा ?'

'क्वार्टर ? क्वार्टर के बच्चे पुरी बोतल पीके मरेगा तो भी और पिलायेगा आज. आज की सुबह कल रात के लिये ठहरी थी उस खुशीमें चलो !'

गोळे गाडीतल्या गाडीत विचार करीत होता. खिशात बरेच पैसे होते. त्याचा हिशोब फक्त त्या पत्त्यांनाच माहीत होता. त्याने खिशातले पैसे मोजले. दोनशे रुपये वेगळे काढले. दारूसाठी पुरणार होते. बाकीचे एक हजार रुपये बरोबर नेणं धोक्याचं होतं. खिशात ठेवून हिंडणं तर नक्कीच मूर्खपणाचं होतं. प्यायल्यानंतरच्या बेशुद्धीत कोणी पैसे मारले असते तरी पत्ता लागला नसता. डोळे तारवटलेले होते. शामकांताचं घर जवळ येत होतं. गोळेनं विचार केला, पैसे ह्याच्याकडेच ठेवावेत. मगच पुढं जावं. सहानीला थोडं थांबवून गोळे झटकन वर जाऊन आला. कल्पनाच्या हातात हजाराची चवड

ठेवून आला. तारवटलेल्या डोळ्यांनी दगा दिला होता. नोट नोटेला चिकटून गेली होती. हजाराचे अकराशे झाले होते; पण गोळे विचार करीत होता फक्त हजार रुपयांचाच !

¤

त्या दिवशी गोळे आराम करीत घरी बसला होता. त्याला स्वतःचंच हसू आलं. सिगरेट ओढता ओढता तो स्वतःशीच हसत होता. कल्पनाला त्या दिवशी मारलेल्या थापांचं त्याला आश्चर्य वाटत होतं. वास्तविक बँकेचा संप नव्हता. गोळेला ते पैसे पंधरा दिवसांनंतरच पाहिजे होते; असंही काही नव्हतं. तो कोणत्याही महत्त्वाच्या कामाला निघाला नव्हता. त्या दिवशी त्याला कसलीही घाई नव्हती. फक्त बाटलीतली दारू, त्याची आणि सहानीची वाट पहात होती आणि ते दोघं तारवटलेल्या डोळ्यांनी तिला भोगणार होते.

ती घाई नव्हती. ती अधीरता होती.


¤

ते पंधरा दिवस पार पडले. कल्पनाच्या विश्वासाच्या डब्यामध्ये गोळेचे हजार रुपये सुरक्षित होते. फक्त एक शंभराची नोट एका दहाच्या नोटेबरोबर पोस्टाच्या हिशेबात भरली गेलेली होती. श्यामकांतावरचं एकशेदहाचं दडपण एकदम शून्यावर आलं होतं. आपल्यातून एक शंभराची नोट पसार झालीय, ह्याची जाणीव त्या निर्जीव नोटांच्या चवडीला असणं शक्य नव्हतं. अकराशेतून एकशे कमी. गोळेचे हजार बरोब्बर उरले ! आपण त्या रात्री पांघरलेल्या नशिबाची एक चिंधी पोस्टातल्या हिशेबाला रफू करत असेल, अशी कल्पना गोळेला स्वप्नातही नव्हती ! मात्र त्या रफूचे धागे कल्पनाच्या मनातून गेलेले होते. धास्तीची सुई फार तीक्ष्ण होती.

पंधरा दिवसांनी गोळे आज येईल, उद्या येईल असं कल्पनाला वाटत होतं; पण पैशाकरता तो फिरकलाही नाही. हा हा म्हणता म्हणता महिना उडून गेला. विश्वासाच्या डब्यातले हजार रुपये कंटाळून गेले. देसाई कुटुंबात काही ना काही धुसफूस चालत राहिली. दिवस तणाव घेऊन उगवायचे. वेदना माळून मावळायचे. शेवटी ते विश्वासाच्या डब्यातले हजार रुपये कल्पनाला फितूर झाले. त्यातल्या आणखी दोनशे रुपयांनी देसाई कुटुंबासाठी देह ठेवला. उरलेले आठशे जीव मुठीत धरून होते !

झालं होतं ते असं की, कल्पनाची भीती त्या शंभर रुपयांनी चेपली होती. मग जसजशी गरज लागेल तसतसे पाच-दहा, पाच-दहा कमी-जास्त काढताना कल्पना निर्विकार होती. वेळ येईल तेव्हा काय करायचं याच्या खोट्या समजुती ती मनाशी करत होती. गोळे अगदी दाराशी येऊन बसलाच असता तर बाकीचे पैसे तिनं कुठूनही उसने आणले असते. घरातल्या पैशांची भर आयत्या वेळेला त्यात टाकली असती; पण गोळेला त्या पैशांची गरज आता वाटत नसावी. बहुधा त्या पैशांची आठवणसुद्धा तो विसरला असावा. आता बहुधा एकदम हजार रुपयांची गरज गोळेला लागणार नाही. तो थोडे थोडे शंभर-दोनशे करून पैसे घेऊन जाईल अशीच शक्यता फार. हे सारे कल्पनाचे सोयिस्कर विचार होते. कल्पनाचे कळत-नकळत हेच होत होतं. मनाला ती सारखी थोपटत होती. ते रडू नये म्हणून नीलूसारखी त्याला झोपवत होती.

¤



बरेच दिवस गोळे कुठे दिसला नव्हता. येता-जाता वाटेतही कुठे दिसला नव्हता. घरी एखादी फेरीसुद्धा त्यानं मारली नव्हती. श्यामकांताला त्याची चौकशी करावीशी वाटली. तो कुठे गावा-बिवाला गेलाय काय, अशी शंकाही त्याच्या मनात डोकावली. रजा संपून तो कामावर हजर झालाय की नाही, याचीही काही माहिती त्याला नव्हती. मुंबईतल्या मुंबईत राहून नाथाकाकांकडे जाणं होत नव्हतं. संसाराच्या घाण्यानं मर्यादा आखून एक वर्तुळ बनवून टाकलं होतं. त्याच्याबाहेर जाऊन काही करायचं तर ताकद फार लागत होती. कित्येकदा ते परवडत नव्हतं.

पण श्यामकांताला आज प्रकर्षानं वाटलं की, गोळेकडे जाऊन आलंच पाहिजे. काही झालं तरी त्याच्याशी मैत्रीचे संबंध आलेले होते. त्यानं जागा मिळवून दिली होती. वेळोवेळी मदत केली होती. त्याची चौकशी करणं हे कर्तव्यच होतं. सडाफटिंग माणूस कधी आजारी पडला, काय झालं तर कळायचं कसं ?

श्यामकांत गोळेच्या घराजवळ गेला. गोळे नेहमीसारखा स्टुलावर पाय पसरून सिगरेट ओढत आणि खुर्चीच्या पाठीवर डोकं टाकून आरामात बसला होता. सुदरलालशेठ कुठे तरी बाहेर गेला असावा. एक तर ती कुठे दिसलाही नाही आणि त्याचा आवाजही आला नाही. सुदरलालशेठच्या भाषेतून सुटका झाल्याबद्दल मनातल्या मनात श्यामकांताने निश्वास सोडला.

श्यामकाताने बाहेरूनच दाराची कडी वाजवली. कोणतीही हालचाल न करता गोळे निर्विकारपणे म्हणाला–'येस ?'

गंमत म्हणून श्यामकांताने पुन्हा कडी वाजवली. तसा गोळेनं आपला स्थूल देह ताडदिशी वळवला आणि ओरडतच त्यानं विचारलं, 'हू इज देअर ? ब्लडी !' श्यामकाताला बघताच चेहरा बदलण्याचा प्रयत्न करीत त्यानं मऊ आवाजात म्हटलं,

'अरे, ये ये ! मला वाटलं कुणी सेलसमन वगैरे आहे का काय ? बस ना. एकदम कसा काय इकडे आज ?'

'अरे बेटया, तू सध्या आहेस कुठे ? भेट नाही, गाठ नाही. शेवटी पत्ता काढत घरी आलो. म्हटलं घरी तरी भेटशील ! रजा संपली का नाही ?'

'आठवडा उरलाय; पण रजेची काळजी करतोय कोण ? आपल्याला विचारणारा ऑफिसात अजून पैदा व्हायचाय आमच्या !' गोळे सहजपणे म्हणाला.

'बरं, सध्या चाललंय काय तुझं ?' श्यामकांतानं विचारलं.

'काही नाही. बस, आपलं हेच !' खांदे वर घेत सिगरेटच्या हाताचा कपाळापाशी कोन करीत गोळे म्हणाला.

'गोळे लेका, हे किती दिवस चालणार ?'

'माझं आयुष्य किती आहे ते कुणाला माहीतय ?' गोळेच्या ह्या बोलण्यानं श्यामकातान ओळखलं, गोळे निराशपणेच हे बोलतोय.

'गोळे, माझं ऐक, तू लग्न कर. प्रपंचात पडलास म्हणजे मग बघ कसा पंत होऊन जाशील एकदम !'

'कशाला पुन्हा तेच तेच. तुला माहितेय गोळेनं दिलेलं वचन गोळे कधी मोडत नसतो. प्रॉमिस इज प्रॉमिस. हे तर आईला दिलेलं वचन तेसुद्धा मरताना. नाही, श्यामकांत, इटज् इम्पॉसिबल !'

'अजूनही तुला चागल्या मुली सांगून येतील, श्यामकात लोचटासारखे पुन्हा तेच बोलला; पण त्यावर गोळे शांत राहिला. त्यान हलकासा हुंकार सोडला. ऐकायला नं येईल असा. मात्र मग थोडं थाबून तो म्हणाला–

'खैर, वो छोड दो. बऱ्याच दिवसांनी भेटलायस. तुझं कसं काय चाललंय ?'

'ठीक आहे. नेहमीसारखं. तारीख बदलून तोच शिक्का मारायचा. पत्र वेगळी, आकार तोच.' शामकांत मिस्किलपणे म्हणाला, गोळेला हसू आलं.

'आमचा नन्हा फरिश्ता काय म्हणतोय ? कित्येक दिवसांत तिचे सोनेरी केस पाहिलेले नाहीत.'

'आहे की, अगदी मजेत. परवाच विचारत होती. गोळेकाका कुठे गेले ? म्हटलं आज तेच बघून येतो.' श्यामकांत म्हणाला.

'वहिनीचं कसं काय चाललंय ?'

'मजेत.'

'काय रे, नीलूला मावशी–बिवशी आहे की नाही एखादी ?'

'तसं कौतुकाचं कुणी नाही. कल्पनाच सगळ्यात लहान. बाकीच्यांची लग्न होऊन लाब लाब पागल्यायत. वर्षाकाठी एखादं टपाल. बाकी संबंध काही नाही ! का रे बाबा ?'

'परवा एक बाई पाहिली बस स्टॉपवर. डिट्टो वहिनीसारखा चेहरा ! म्हटलं, नीलूची मावशीच असणार. म्हणून विचारलं. अगदी चेहरा म्हणजे असा की, बहिणी–बहिणी !' गोळे चक्क खोटं बोलत होता. त्याला बसस्टॉपवर कुणीही भेटलेलं नव्हतं. त्याच्या उद्योगात तो दंग होता.

थोडाफार गप्पा मारून श्यामकात निघाला. गोळे त्याला पोचवायला लुंगी-गंजीफ्रॉकवर गप्पा मारत वाड्याच्या गेटपर्यंत आला. बसस्टॉपपर्यंत तंगड्या टाकत जाणाऱ्या पाठमोऱ्या श्यामकांताकडे पहात गोळे विचार करत होता, 'सुंदर बायका अशांच्याच पदरात का पडतात ?'

¤

रखेली ठेवण्याचा गोळेचा विचार पक्का झाला होता. त्याची बहीण गेल्यापासून तो सगळ्याच बाबतीत बेबंद झाला होता. दारू, सिगरेट, जुगार कुठल्याही बाबतीत कोणतीही मर्यादा त्याला उरली नव्हती. मनाला येईल ती मर्यादा आणि इच्छेला येईल तेव्हा बंधन. एकूण त्याचा स्वैर आचार चालू होता.

गोळेच्या बाबतीत एक गोष्ट अगदी उघड होती आणि ती म्हणजे पैसा असून शरीरसुख तो विकत घेऊ शकत नव्हता. कित्येकदा तो वेश्यांच्या वस्तीतून फिरला होता. वेश्यांकडे जाणारे त्याचे मित्रही काही कमी नव्हते; पण गोळेला भीती वाटत होती म्हणा, त्यात काही गैर वाटत होतं म्हणा किंवा त्याची घाण वाटत होती म्हणा. पैसा जवळ असूनही कोणत्याही बाजारबसवीला भाड्यानं घेणं हे त्याला जमलंच नव्हतं. सक्तीच्या ब्रह्मचर्यानं तो नुसता तडफडत होता.

रखेली हा त्यावरचा उत्तम उपाय होता. गोळेलाही मनातून तो पटला होता; पण आपल्या रखेलीला दुसरं कोणीही जवळ घेतलेलं त्याला चाललं नसतं. मग त्यासाठी त्यानं कितीही पैसा मोजला असता; पण गोळेला आता स्त्रीची गरज होती.

¤

गोळेकडे फेरफटका मारून झाल्यानंतर श्यामकांत सरळ घरी आला. नीलूला कुठली तरी गोष्ट सांगत कल्पना दरवाज्यातच बसली होती. शेजारची एक दोन मुलंही गोष्ट ऐकण्यात गुंग होऊन गेली होती. तेवढ्यात श्यामकांत घरी आल्यानं त्याच्यात व्यत्यय आला, 'पुढे काय, पुढे काय' म्हणत कल्पनाभोवती ती चिमुरडी पोरं पिंगा घालू लागली. कल्पना लक्ष देत नाहीसं पाहून मग तीही कुठे तरी पांगली. बाबा आलेले पाहून गोष्ट विसरून नीलू क्षणात बाबाच्या पायाशी खेळू लागली.

'कुठे जाऊन आला ?' कल्पनानं नेहमीसारखं विचारलं.

'गोळेकडे गेलो होतो.' श्यामकांत सहजपणे बोलून गेला; पण कल्पनाला ठसका लागल्यासारखं वाटलं. तिनं पटकन विचारलं...

'कुणाकडे ?'

'आपल्या गोळेकडे. बरेच दिवसांत भेटला नव्हता, म्हणून गेलो.'

'काही बोलले ते ?'

'कशाबद्दल ?'

'अं. कशाबद्दल असं नाही; पण म्हणजे होते कुठे इतके दिवस ?' कल्पनानं कसं तरी सावरत वाक्य पुरं केलं आणि चेहरा सारखा करण्याचा प्रयत्न केला.

'का ? काही खास गोष्ट आहे का ?' कल्पना गडबडलेली पाहून श्यामकांतानं विचारलं; पण कल्पनानं स्वत.ला पूर्ण सावरलेलं होतं. ती म्हणाली, 'छे बुवा, खासबिस काही नाही. मी सहज विचारलं.'

श्यामकांताशी बोलण्यात तिनं बाजी मारली होती; पण आतून तिचं तिलाचं सारखं वाटत होतं की, ती हजार रुपयांची गोष्ट आपण नवऱ्याला सांगायला हवी होती; पण ते गोळेचे पैसे आहेत, हे ऐकताच कदाचित श्यामकांत चिडला असता. रागावला असता. कारण गोळेभावजीकडून उसने पैसे घेत जाऊ नका, असं सांगून तिनंच शामकांताकडून वचन घेतलं होतं.

सहज म्हणून तिच्या विश्वासाच्या डब्यातले पैसे तिने पुन्हा चाचपले. त्यात आठशे रुपये चिमणीच्या पिलासारखे निपचित पडले होते.

¤

गोळेची रजा संपायला तीन-चार दिवसच उरले होते. त्या दिवशी सकाळ होऊन उन्हं ओटयावरून घरात शिरली तरी गोळे उठला नव्हता. रात्री मायनस हाताने खूप उशिरा येऊन तो झोपला होता. सुंदरलालशेठकडे त्याच्या गावची दहा-बारा पाहुणेमंडळी आली होती. बाहेरच्या बागेत येऊन कचाकचा बोलत ती इकडे तिकडे फिरत होती. काहीजण खालून हाक मारून वरच्याना बोलवत होते. वरचे खालच्यांशी ओरडून बोलत होते. त्या गलबलाटात गोळेची झोपमोड झाली. तो कलकलाट त्याच्या मस्तकात जाऊ लागला. एक शिवी हासडून त्यानं अंगावरचं पांघरूण उडवलं आणि बाटलीचे दोन डोस घेऊन पुन्हा झोपायचं, असा विचार केला. तोंड धुवायला म्हणून गोळे बाहेर आला. सुंदरलालशेठने पाहुण्यांची जत्रा भरवलेली पाहून गोळे मनातल्या मनात उखडला. सुंदरलालशेठकडे पाहून तो म्हणाला, 'शेठ, पेपर वाचला काय आजचा ?'

'नाय बा. पेपर वाचायमंदी काय मजाच नाय. ते आमचे शेअरचा भाव एकदम डाउन करून टाकला. आमच्या वांदा करून टाकला.'

'शेठ, ठाण्याचा सगळा पागलखाना मुंबईत आणलाय !'

'अरे, काय म्हणते सगळा पागल लोकच्या काय काम मुंबईमंदी?' सुंदरलालशेठ गोळेचं बोलणं खरं वाटून म्हणाला.

'त्यातले, दहा वेडे पळालेत शेठ मुंबईत !'

'हरे राम राम ! आता काय होणार ?'

'आपल्या वाडयात शिरले ते तर सत्यानाश करून टाकतील.'

'हरे राम राम राम. पोलीस काय झक मारते काय ?'

'शेठ, तुमच्या पाहुण्यात कोणी वेडा घुसलेला नाही नं, जरा बघून ठेवा !'

'नाय नाय. तू काय बोलते असा. समदे भाववंद लोक आहे आमचे; सके भावबंद.'

'तरीच.' असं म्हणून गोळे घरात निघून गेला. 'तू काय बोलला गोले, ते तू काय बोलला पुना बोल.' असं म्हणत ढेरी हलवत सुंदरलाल शेठ गोळेच्या मागे गेला. गोळेनं दारूची बाटली काढलेली पाहून पुन्हा हरे राम राम करीत सुंदरलालशेठ अंगणातल्या बंबात काटक्या घालायला निघून गेला.

तोंड धुऊन झाल्यानंतर गोळेला थोडी तरतरी आली. दारू पिण्याचा विचार सोडून देऊन तो शर्ट घालून बाहेर पडला. बाहेर एक फेरफटका मारून जवळच्या उडप्याकडे जाऊन नास्ता घ्यायचा त्याचा विचार होता; पण जवळच्या उडप्याने दरवाजा खेचून हॉटेल बंदच ठेवले होते. गोळे हॉटेलचा शोध घेत लांबवर चालत गेला. फुटपाथवर आडव्या झालेल्या एका रांगेला अडखळून ताटकळत उभा राहिला.

समोरच्या एका सिनेमाटॉकीजवर ॲडव्हान्स बुकींग जोरात चाललेलं होतं, त्याचीच ती रांग होती. गोळेला वाटलं, आज सिनेमा बघावा. मनात आल्यासरशी तो रांगेत उभा राहिला. रस्त्यावरून माणसं ये-जा करीत होती. गोळे येणाऱ्या-जाणाऱ्या बायका पोरी न्याहाळत होता.

रांग हळूहळू पुढे सरकत होती. गोळेचा नंबर जवळ आला. तेवढ्यात त्याचं लक्ष समोरच्या कापडाच्या दुकानाकडे गेलं. दोन पुरुष आणि एक बाई असे झकपक कपडयातले तिथे दुकानातून बाहेर येत होते; पण दोन क्षण गोळे तिकडे पहात राहिला आणि एकदम त्याच्या मनात वीज सळसळून गेली. काही तरी कल्पना त्याच्या डोक्यात मसदिशी शिरली होती.

'येस' खिडकीतून आवाज आला !

गोळेचं लक्षच नव्हतं. तो कुठे तरी पहात बधीर झाल्यागत झाला होता.

'येस' तिकिट खिडकीतून जोराने आवाज आला. गोळे भानावर आला.

'अं...अं. तीन तिकीट कलका मॅटिनी. बॉक्सका देना !'

म्हणजे गोळेनं विचार बदललेला होता. त्याला उद्या सिनेमा पहायचा होता; पण ती बॉक्सची तीन तिकीटं त्यानं कुणासाठी काढली होती हे समजत नव्हतं.

गोळे खरोखरीच विक्षिप्तासारखा वागायचा काही वेळा.

¤

घडयाळात अकराचे टोले पडले. कल्पना घरातली कामं आटपून नुकतीच मोकळी होत होती. घरात कुणीही नव्हतं. श्यामकांत केव्हाच पोस्टात निघून गेला होता. चाळीत फारसा आवाजही ऐकू येत नव्हता. रस्त्यावर उन्हाच्या सावल्या दबा धरून बसल्या होत्या. शेजारी कुठे तरी डोकवावं, असा विचार तिच्या मनात आला. नीलू शेजारीच कुणाच्या तरी घरी खेळत असावी. ती कुठे आहे, हेही पहायला हवंच होतं.

तेवढयात नीलूचाच आवाज आला. काही तरी ओरडत ओरडतच ती घरात शिरली. तिचा आवाज नीट ऐकला तेव्हा कल्पनाला सम-

---

**पण बॉक्सची तीन तिकिटे गोळेने कोणासाठी काढली होती ?**

---

जलं गोळेभावजी वर येताहेत. त्याचाच आनंद होऊन नीलू नाचतेय! पण गोळे येतोय हे पाहून कल्पनाच्या मनात धडकीच भरली. विश्वासाच्या डब्यात आठशे होते. दोनशे आणायचे कुठून ? पण तेवढ्यात गोळेचाच आवाज ऐकू आला—

'कुणी आहे का घरात ?'

जड पायाने कल्पना पुढे गेली आणि 'या' असं कृत्रिमपणाने म्हणाली. गोळे आता काय बोलतोय, ह्याच्याकडे तिचे डोळे लागले होते. नेहमीप्रमाणे खिशात हात घालून गोळेनं नीलूला लॉलीपॉप आणि खेळण्यातली एक शिट्टी काढून दिली. ती कर्कश वाजवीत नीलू गॅलरीत निघून गेली. कल्पनाला तिचं ते शिट्टी वाजवणं म्हणजे धोक्याचाच इशारा वाटला; पण खरं म्हणजे त्या शिट्टीतून कोवळा आनंद साडत होता.

'बसा नं, चहा करते !' कल्पना पुन्हा जडपणे म्हणाली.

'नाही, आता चहा वगैरे नको, मी तुमच्याकडे आता आलो होतो म्हणजे...' गोळे थोडा थाबला. कल्पनाच्या छातीत एकदम धस्सं झालं.

'तुमचे पैसे देऊ का ?' कल्पनाने अतिशय हिंमत करून त्यांना विचारलं.

'अं, पैसे नको...पण काय...सगळं विचित्रचं होऊन बसलंय.' गोळे सावकाशपणे बोलत होता. त्यातला धूर्तपणा कल्पनाला कळत नव्हता. शेवटी ती श्यामकांताचीच बायको होती !'

'काय झालं ?' कल्पनानं विचारलं.

'झालं काही नाही. आज मॅटिनीला जायचा विचार होता माझा आम्ही तिघे मित्र जाणार होतो. अगोदर ठरलं होतं म्हणून तिकिटं बुक करून ठेवली आणि ह्या बेटचानी आज सकाळी निरोप पाठवला की, आज न येता उद्या येतो. म्हणजे आता ती तिकिटं फुकट जाणार नाहीत का ? ह्या आपल्या लोकांना काही कळतच नाही !' गोळे वैतागल्यासारखा बोलत होता.

'कमाल आहे. अगोदर कळवायचं नाही का त्यानी ?' कल्पना काही तरी बोलायचं म्हणून बोलली.

'वहिनी, तुम्ही येताय का पिक्चरला ?'

'मी ?' कल्पना अवाक झाली.

'हो, नाही तर ही तिकिटं वायाच जाणार. पिक्चर चांगला आहे. म्हणून जीव तुटतो. बाहेर वीस वीस रुपये ब्लॅक चाललाय !'

गोळेबरोबर पिक्चरला जाणं हे कल्पनाला शक्यच नव्हतं. शक्य असतं तरी असं एकट्याबरोबर जाणं तिला आवडलं नसतं. तिनं मनाशी निर्णय घेतला, काही झालं तरी गोळेबरोबर सिनेमाला नाही जायचं. श्यामकांत बरोबर असेल तर गोष्ट वेगळी. कल्पना जरा ठामपणे म्हणाली, 'नाही हो, आज आम्ही चाळीतल्या बायका बायका मिळून नाटकाला जाणार आहोत. दीड वाजता निघू दुपारी इथून.' कल्पनाने सराइतासारखी थाप मारली होती. ह्यावर गोळे विचारात पडला.

'मला वाटलं तुम्हाला तरी वेळ असेल. जाने दो. आता एकटा कोण जातोय पिक्चरला. तिकिटं जाऊ देत अक्कलखाती !' गोळे इकडेतिकडे पहात अस्वस्थ होत म्हणाला.

'आमचं म्हणजे काय अगोदरच ठरलं होतं ना; पण पुढल्या वेळी तुम्ही सुद्धा जरा आधी सांगा म्हणजे ह्यानाही रजा घेता येईल. त्याना सोडून मी पिक्चर बघायचा-म्हणजे कसं, नाही का ?' कल्पना पुन्हा पुन्हा तिचं म्हणणं मांडत राहिली. गोळे थोडा वेळ विचारात पडल्यासारखा झाला. मग सुस्कारा सोडून म्हणाला, 'छा:, काही नाही तर निदान 'ते' काम तरी करून येतो. घरी नुसतं पडून राहून बोअर होईल. वहिनी, असं करा ते हजार रुपये आहेत ना, ते द्या जरा, 'त्याच' तरी काम करून येतो !'

'अं...हो देते नं, किती देऊ ?' कल्पनानं आशा मुठीत धरून विचारलं.

'किती दिले होते मी एक हजार नं ?'

'अं...हो हो !'

'मग द्या ते सगळेच ! बरेच दिवस ते कामही रखडत पडलंय. आज ते पार पाडून टाकतो. डोक्याला त्रास नको !' गोळेच्या बोलण्याचा ओघ सहजतेचा होता.

आता मात्र कल्पना विचित्र कात्रीत सापडली होती. विश्वासाच्या डब्यात आठशे होते. घरात फार तर चाळीस-पन्नास निघाले असते. गोळे आज अचानक उगवला होता. सगळेच्या सगळे हजार मागत होता. विश्वासाचा डबा केविलवाणा झाला होता. कल्पनाच्या डोक्यात विचार आला, पैसे खर्च केले नसते तर बरं झालं असतं; पण आता आल्या भोगाला उत्तर द्यायलाच हवं होतं.

निलू कुठे गेली, हे बघून येण्याचं निमित्त करून कल्पना शेजारी बढेआजीकडे गेली. त्या देवळात निघून गेल्या होत्या, कुठल्याशा सप्ताहाला बसल्या होत्या. कुलकर्णीवहिनींनी 'आता नाहीत; पण उद्या देते' म्हणत मान हलविली. धारगळकरकाकू म्हणाल्या, 'पैसे आहेत हो, पण लॉकरची चावी हे घेऊन गेलेयत जाताना.' कल्पना वेड्यासारखी आणखी कुठेकुठे जाऊन आली. हात रिकामाच होता. कल्पनाच्या छातीतली धडधड वाढू लागली. पोटात फाळ पडला. गोळेला हजार द्यायचे कुठून ? एकदा तिला वाटलं, गोळेला फक्त आठशेच द्यावेत. नाही तर साडेआठशे; पण दीडशे मी खर्च केले, हे सांगायला तिचा धीर होत नव्हता. कल्पना घाबरून गेली. गोंधळून गेली. नाइलाज झाला.

'कुठं गेली ही पोरं ?' असं म्हणत कल्पना पुन्हा घरात घुसली. गोळेला ती दाखवत होती की, मी नीलूला बघायलाच गेले होते, इतका वेळ.

'वहिनी, जरा मला मोकळं करा नं. नाही तर उशीर होईल कामाला.' गोळे नरमाईनं बोलला.

'अं...गोळेभावजी, मी आत्ताच शेजारी जाऊन आले. आमचं नाटक आजचं नाही. उद्याची आहेत तिकिटं. मला वाटलं आजचीच का काय ? मग मला वाटतं, आपण जाऊ या सिनेमाला. म्हणजे तिकिटं पण फुकट जायची नाहीत. अनायासे मोकळा वेळ मिळालाच आहे !' गडबडून जाऊन कल्पना तोंडाला येईल ते बोलत होती गोळे हसला. म्हणाला—

'वहिनी, आता कामाचा मूड आहे तिकिटं जाऊ देत फुकट !'

'नाही, पण मी म्हणते आहेत तिकिटं तर कशाला फुकट घालवता ? जाऊ आपण.'

'मी असं करतो, तिकिटं तुम्हाला देतो. चाळीतल्या कुणी तरी

बायकाना घेऊन जा पिक्चरला. नाही तर विकून टाका तिकिटं. आज मी तेच काम करून टाकतो. ' गोळे जसेजसे आढेवेढे घेत होता तसतशी कल्पना कासावीस होत होती.

' नको पण आपणच जाऊ नं सगळे. नीलूलाही घेऊ बरोबर. मघाशी तर तुम्ही यायला तयार होता. आत्ताच एवढं काय त्या कामाचं?' कल्पना नापसतीनं, नाराजीनं, तोंडावर खोटी खुशी आणून गोळेला असहायपणे विनवत होती. शेवटी गोळे म्हणाला, ' बरं चला, तुम्ही एवढं म्हणतातच आहात तर निघू आपण. काम महत्त्वाचं होतं; पण तुमच्यासाठी सोडून देऊ ते !'

रमीच्या डावात ह्या सिक्वेन्समधला पत्ता त्या सिक्वेन्समध्ये टाकावा तसे शब्द वापरण्याची कला गोळेला चांगलीच अवगत होती. त्याने रमी मारली होती.

' वहिनी, तुम्ही झटपट आवरून तयार व्हा आणि मी आणलेली ती साडी नेसा. तोवर मी नाक्यावर टॅक्सी बघतो.'

कल्पनाला त्याचं ते हक्कानं साडी नेसायला सागणं आवडलं नाही; पण आज गोळे आल्यापासून तिला आवडणारं असं तिनं काय केलं होतं ?

¤

झाल्या प्रकारानं गोळे वैतागून गेला होता. जेव्हा जेव्हा त्याची आठवण त्याला होत होती तेव्हा तेव्हा अंतर्बाह्य तो जळत होता. त्याची कानशिलं गरम होत होती. मेंदूला वाळवी लागल्यासारखं वाटतं होतं. गोळे जास्त जास्त दारू पीत होता. डोक्याचा तराजू समतोल ठेवायचा प्रयत्न करीत होता. त्या झाल्या प्रकारापासून त्याला तहान, भूक, झोप, चैन, मौज, मजा कशा-कशाची शुद्ध नव्हती. ऑफिसला त्यानं रजा वाढविण्यासबंधी अर्ज केला होता. तो नामजूर झाला म्हणून तो आणखी अस्वस्थ झाला. एका भयंकर भट्टीत पडून चटके खात खात जगाव तस गोळेला वाटत होतं.

गोळेचा फार मोठा अपमान झाला होता. फार मोठी मानसिक जखम त्याला झाली होती. त्यातून भळभळा रक्त वाहात होतं. ती जखम त्याला भरून आणायची होती; पण वेळी-अवेळी त्याच्याच हातून त्या जखमेची खपली निघायची; मग पुन्हा रक्त वाहू लागायचं. ते थावावं म्हणून मग तो बाटलीत बुडून जायचा आणि फुगलेल्या मनानं घरंगळत राहायचा.

त्या अपमानाला कारणीभूत झाली होती कल्पना. तिने मारलेला बाण गोळेच्या वर्मात घुसून त्याचा चेदामेंदा करून गेला होता. ते सहन करण्याइतकी ताकद त्याच्यात तर नव्हतीच; पण त्याच्या बाटलीतसुद्धा नव्हती ! गोळेमधला अहंकार बेशुद्ध झाला होता आणि त्याची बेशुद्ध सूडबुद्धी सहा महिन्यांनंतर उठलेल्या कुंभकर्णासारखी अक्राळविक्राळ गर्जना करीत होती. आधळ्या सिंहासारखी मिळेल त्या गोष्टीवर तुटून पडत होती.

गोळेला कल्पनावर सूड उगवायचा होता. तो खात असलेले असह्य चटके त्याला तिचे तिला परत करायचे होते. त्यासाठीच तो तळमळत होता. आपल्या देहाचा सत्यानाश त्याने त्यासाठीच आरंभला होता. तोच तो सिनेमाला जाण्याचा प्रसंग ! त्यानंच गोळेच्या मनाची शकलं शकलं केली होती. चिंधड्या चिंधड्या उडवल्या होत्या. त्या सांधणं गोळेला जमत नव्हत.

त्या दिवशी टॅक्सी एंगेज करून नाक्यावर गोळे कल्पनाची वाट पहात होता. टॅक्सी त्याने चाळीकडे मुद्दाम फिरविली नाही. कारण चाळीमध्ये अनावश्यक चर्चा त्याला नको होती. चाळीकडे टॅक्सी नेणं शहाणपणाचं नव्हतं. गोळेनं घड्याळाकडे नजर टाकली. अकरापस्तीस झाले होते. ऊन कडक झालं होतं. एका बाजूला टॅक्सी उभी करून कल्पनासाठी टॅक्सीवाला ताटकळत बसला होता. गोळेही तिकडेच डोळे लावून बसला होता.

बराच वेळ गेला; गोळे समजला–कल्पना आता काही येत नाही. मनातल्या मनात तो दात-ओठ खाऊ लागला. वेळ जातोय म्हणून टॅक्सीवाला कुरकुर करू लागला. गोळे टॅक्सी सोडून देण्याच्या तयारीत होता; पण तेवढ्यात समोरून कल्पना येताना दिसली. गोळेनं दिलेली ती गुलाबी जॉर्जेट साडी कल्पना नेसली होती. त्यावर छानसा ब्लाऊज घातला होता. सुबक वेणी घातली होती. त्या स्मगल्ड साडीमध्ये भर दुपारी एकोणतीस वर्षांची गोरीपान कल्पना दृष्ट लागेल इतकी सुदर दिसत होती. तिच्या चालण्याचा डौल, तिचं बसणं, हसणं–जिवाची घालमेल होत होती. गोळे तर बधीरच होऊन गेला ! त्याला वाटत होतं–राजहंसाचं सौदर्य हे सौंदर्याचं शेवटचं टोक असतं; पण त्या दिवशी तो शरीराने स्तब्ध असताना मनात म्हणाला, राजहंसाचं गर्वहरण करण्यासाठी खास तयार केलेली ही अप्सरा आहे. शामकाताकडे येऊन ही बिचारी त्याच्या पोस्टातल्या शाईसारखीच काळवडून जाईल !

मूकपणे हसत कल्पना पुढे आली. गोळेनं टॅक्सीचा दरवाजा उघडून तिला आत बसवलं. बरोबर नीलूही होती. तशीच सुदर. कल्पनाकडे वेडयाभिऱ्या नजरेनं पहात टॅक्सीवाल्याला जरासं थाबवून पलीकडच्या फूटपाथवरून गोळे अबोलीची एक वेणी घेऊन आला. हात मागे करून ती ताजी अबोली वेणी घालणाऱ्या कल्पनाला पहात गोळे जग विसरून गेला. तिचं सौंदर्य मनात साठवीत तो अतृप्तपणे, चेहरा नेहमीसारखा रहावा म्हणून त्यावर रुमाल फिरवत राहिला. टॅक्सीत नीलूला मांडीवर घेऊन कल्पनाला खेटून बसण हे त्याला अमृताचा अर्थ कळावा तसं वाटलं; पण कल्पना सारखी सावरून बसत होती.

मात्र टॉकीजमध्ये घडलेला तो प्रसग गोळेचा जीव तीळ तीळ तोडत होता. तिघेही बॉक्समध्ये येऊन बसले. पिक्चर सुरू झाला. गोळेचं लक्ष पडद्यावर नव्हतंच. तो टक लावून पाहत होता कल्पनाकडे ! गोळे भुकेला होता. अतृप्त होता. त्याला तृप्त व्हायचं होतं.

टॉकीजमध्ये चित्रपटातले एक एक प्रसग मागे पडू लागले. गोळेनं खुर्चीच्या पाठीमागून कल्पनाच्या खांद्यावर हात ठेवला, कल्पनानं आपला खांदा सोडवून घेतला. गोळे पुन्हा पुन्हा तेच करत राहिला. तिनं एकदा दिलेला इशारा त्याला ऐकूसुद्धा आला नाही. तो बहिराठार बहिरा झाला होता ! पुढच्याच क्षणी कल्पना ताडकन उठली

**गोळेला कल्पनावर सूड उगवायचा होता आणि म्हणूनच....**

आणि गोळेच्या अंगावर खेकसत म्हणाली—

'मला काय तुम्ही एक भाड्याची टॅक्सी समजलात की बाजार-बसवी समजलात, तुमच्या पैशावर झुलणारी ? शरम वाटायला हवी होती तुम्हाला बॉक्सचं तिकिट काढून माझ्याकडे यायला !'

'अरे पण—' गोळेचा चेहरा साफ पडला होता.

'काही ऐकायचं नाहीय्ये मला आणि तुमचं तोंड पहायचीही इच्छा नाहीय्ये. मी एक संसारी स्त्री आहे, हेसुद्धा विसरला तुम्ही ? लाज वाटायला हवी होती तुम्हाला ! चल ग नीलू. इथे क्षणभरसुद्धा थांबायचं नाहीय्ये आपल्याला !' तिचा अवतार बघून गोळे गारठल्यासारखा झाला. ती तरातरा निघाली तसा एकदम चिडून गोळे म्हणाला,

'लक्षात ठेव, माझे हजार रुपये मला आत्ताच द्यावे लागतील !' एकदम उसळून कल्पना म्हणाली...

'हजार रुपये ? कसले हजार रुपये ? तुमच्याकडून कसलेही पैसे मी घेतलेले नाहीय्येत. ताबडा पैसासुद्धा नाही तुमचा माझ्याकडे !'

एवढं बोलून कल्पना वाऱ्यासारखी निघून गेली. गोळे थिजून गेला !

एका भयंकर वादळात दोन फासे उंच आभाळात उडाले होते. ते खाली आल्यावर कोणतं दान पडेल हे कोण सांगू शकणार होतं ?

¤

त्या दिवशीच्या त्या प्रसंगापासून कल्पनाही मनाने स्थिर नव्हती. कोणताही मोकळा वेळ तिला अलगद उचलायचा आणि त्या टॉकीजच्या बॉक्समध्ये घेऊन जायचा. तिकडे गेल्यानंतर तिला गोळे त्या सीटवर बसलेला दिसायचा. तो पुन्हा पुन्हा तिच्या खांद्यावर हात टाकायचा. मग कल्पना पुन्हा तेच तेच ओरडत राहायची, अद्वातद्वा बोलत राहायची. मग गोळे मध्येच 'अरे पण —' असं बोलताना तिला दिसायचा. बराच वेळ ही तालीम होत राहिली म्हणजे नंतर तो मोकळा वेळ तिला पुन्हा अलगद उचलायचा आणि घरी आणून ठेवायचा. मग ती भानावर यायची. ह्या ने–आणीमध्ये कल्पना मनस्वी दमून जायची. खाटेवर आडवी झाली की, तिचे डोळे झोपेसाठी लुकलुक करू लागायचे; पण झोप लागायची नाही. पुन्हा तीच तीच दृश्यं उलटी फिरू लागायची. पुन्हा तेच तेच प्रसंग ओरडू लागायचे. न बोलता, न फिरता कल्पनाचं डोकं दुखत राहायचं.

त्याच दिवशीचा तोच वेळ. गोळे नाक्यावर टॅक्सीसाठी गेलेला. कल्पनाच्या डोक्यात भोवरे जमलेले. पुन्हा वेड्यासारखी ती शेजाऱ्यापाजाऱ्याकडे गेलेली. पुन्हा पुन्हा तोच तोच पदर पसरलेला. शेजाऱ्यापाजाऱ्यांनी पुन्हा पुन्हा तीच तीच मूठ उघडून दाखविलेली. कल्पना शिकाऱ्याच्या भीतीने पळणाऱ्या हरिणीसारखी शेवटी न नात्याच्या; न गोताच्या चाळीजवळच्या वाण्याकडे गेलेली. असाहाय्यपणे दोनशे रुपयासाठी वाणी दोन मिनिटं तिच्याकडे पहात राहिलेला. बुबुळं केविलवाणी करून मग धाडदिशी पैशाचा ड्रावर आत लोटून म्हणालेला, 'बाई, आमी पैसा नाय विकते, अनाज विकते. पैसा बी उधार मागायला येते लोक. हये काय पैशाचा दुकान नाई !' मान वळवून, खालचा ओठ चावून, पदर डोळ्याला लावून कल्पना पुन्हा वर आलेली आणि शांतपणे ती अमेरिकन जॉर्जेट साडी अस्ताव्यस्त वसाबसा उलगडलेली. साडी नेसताना भीती एकच. साडेचार–पावणे पाचाला शामकांत घरी येतो पोस्टातून. त्याच्या आत आपण घरी आलं पाहिजे. साडी पुन्हा पहिल्यासारखी गुंडाळून ठेवून दिली पाहिजे. घरी राहून राहून कंटाळल्याचं सोंग घेतलं पाहिजे. शामकांताच्या मनाची घडी मोडता कामा नये, त्या गुलाबी अमेरिकन जॉर्जेटसारखी.

घरातून निघताना कल्पना धास्तावलेली. अगदी पहिल्या दिवसापासून तिला गोळेचे घारे डोळे न आवडलेले. जेव्हा जेव्हा तो आला, तेव्हा तेव्हा बायकांना न्याहाळण्याची त्याची सवय न रुचलेली. त्याचं गोड बोलणं तिला भीतिदायक वाटलेलं आणि म्हणूनच गोळेभावजीकडून उसने पैसे घेत जाऊ नका, असा सल्ला तिनं शामकांताला दिलेला. शामकातानं तसं वचन दिलेलं. कल्पना मनातून सावध होऊनच गुलाबी साडी नेसली होती. गोळेनं दिलेली अबोली वेणी तेवढ्याच सावधपणे तिनं माळलेली.

नीलूकडून तो प्रकार शामकाताला कळू नये म्हणून कमालीची काळजी कल्पनानं घेतली होती. अगदी चुकून जरी नीलू म्हणाली असती, 'बाबा, आम्ही आज सिनेमाला गेलो होतो.' तर त्या निष्पाप बोलण्यानं सारं घर ढवळून निघालं असतं. महापुरात वाहूनसुद्धा गेलं असतं !

नशीब उच्चीचं. नीलू काहीच बोलली नाही. खेळण्यातल्या सिनेमात ती रंगून गेली.

¤

दिवस आणि पैसे कसे, कधी आणि किती उडतात, हे कळत नाही. बॉक्समध्ये घडलेला तो प्रसंग कल्पनाच्या मनावर शिलालेखासारखा कोरला गेला तरी त्याचं ठळकपण कल्पना विसरून गेली. नेहमीसारखा तो प्रसंग सतावेनासा झाला. कधी तरी त्याची आठवण आली म्हणजे तो प्रसंग कसा विसरायचा, ह्याचं तंत्र कल्पनाला अवगत झालं होतं. मात्र त्या प्रसंगानंतर कल्पनाला हलकं हलकं वाटत होतं. आपल्या डोक्यावर हजार रुपयांचं कर्ज आहे, ह्याची कसलीही धास्ती तिला नव्हती. भीतीमधला भयरस जाऊन फक्त चिपाड शिल्लक राहिलं होतं.

दिवसाबरोबरच विश्वासाच्या डब्यातल्या नोटा कमी कमी होत होत्या. देसाई कुटुंबाच्या प्रपंचाला एक एक ठिगळ बिनबोभाट लागत होतं; पण दिवसाना काय, ते कोडग्यासारखे येत राहतात. विश्वासाच्या डब्यात आता काहीच शिल्लक नव्हतं. कधी तरीचा जुना पिठाळलेला तुरीच्या डाळीचा एक दाणा डब्याच्या बुडाच्या कडेशी रेंगाळत होता, भित्र्या साक्षीदारासारखा.

अकराशे रुपये हजार म्हणून घरात आले. पाहुण्यासारखे थोडे दिवस राहिले. मग कापरासारखे उडून गेले ! शामकांताला ह्या गोष्टीची कसलीच कल्पना नव्हती. कल्पनानं काहीच सांगितलेलं नव्हतं. घटनाच अशा विचित्र आणि वेड्यावाकड्या घडल्या होत्या की, शामकांतापर्यंत काही पोचणं आणि पोचवणं हे कुणालाही अवघड वाटलं असतं.

संध्याकाळची पाच–साडेपाचची वेळ होती. कल्पना काही तरी घेऊन खाटेवर वाचत बसली होती. नीलू जवळच झोपली होती. काही तरी कारण काढून, कशाचा तरी हट्ट धरून रडत रडत वेळीअवेळी नीलू गाढ झोपून गेली होती. तिचे सोनेरी केस तिच्या कानशी

तोंड लपवून शांत होते. डोक्यात घातलेलं गुलाबी फूल मात्र डोक्या-खाली चिरडून त्याच्या पाकळ्या पडल्या होत्या. कल्पनाचं तिकडे लक्षच नव्हतं.

दरवाज्यात पाय वाजले. कल्पनाच्या छातीत का कुणास ठाऊक, पण एकदम धस्स झालं. दचकून तिनं हातातलं मासिक खाली टाकलं आणि पदर सारखा करून ती चटकन उभी राहिली. शामकांत पोस्टातून आला होता. कल्पनाला पुन्हा हायसं वाटलं.

आल्यासरशी झोपलेल्या नीलूला पाहून त्याने तिची चौकशी केली. मग तो कपडे उतरवून हात-पाय धुवायला गेला. कल्पना स्टोव्ह पेटवून चहा ठेवायला गेली. सारं काही ठरल्यासारखं चाललं होतं.

चहा पिता पिता शामकांत म्हणाला, 'येत्या रविवारी पोस्टा-तला एक मित्र जेवायला येणार आहे आपल्याकडे. मीच बोलावलंय त्याला. त्याची सगळी फॅमिली गेलीय गावाला. रजा नाही म्हणून एकटाच घरी आहे. म्हटलं-ये रविवारी जेवायला !'

'मग काही गोड करायचं त्या दिवशी ?' कल्पनानं विचारलं.

'हं, कर नं काही तरी, शिरा वगैरे.' शामकांत म्हणाला.

'मला वाटतं, त्यापेक्षा आपण श्रीखंडच करावं चक्का आणून.'

'बरं, तसं करू. आहेत किती माणसं ? आपल्या घरातली तिघं. नीलूचं म्हणा सोडूनच देऊ. तू, मी, तो-सामंत आणि फार तर गोळेला बोलवू.' शामकांत सहजपणे हिशेब करता करता बोलला; पण कल्पनाचं अंग शहारलं.

'नको, त्यांना नको !' कल्पना कशीबशी बोलली.

'का गं, एक गोळे आला तर आणखी काय फरक पडणार आहे तो आल्यामुळं ? उलट गप्पा मारायला मजा येईल.'

'तसं नाही; पण...तुमचा तो मित्र आणि ते...सगळे नको एक-दम. गोळेभावजींना आपण पुन्हा बोलवू कधी तरी.'

'अग, पण मी म्हणतो, समजा तो आला, तर काय एवढी अड-चण होणार आहे आपली ? दोन पुऱ्या आणि वाटीभर श्रीखंड जास्त लागेल एवढंच न ?' चालेल, गोळेला बोलवायचंच त्या दिवशी. गोळे-शिवाय मजा नाही !' शामकांत ठामपणे बोलला. तशी कल्पना निरु-त्तर झाली किंवा निःप्रश्न झाली. तिच्या डोक्यात विचार घोळू लागले. त्याच्या भरात 'बरं', एवढाच एक शब्द ती बोलू शकली.

गोळे येणार म्हणून कल्पना धास्तावली होती तर शामकांत हलक्या-फुलक्या मनाने गोळेला बोलवायला जाणार होता. संसा-राचा रथ. त्याची दोन चाकं. दोन्ही चाकाचे रंग वेगळे !

¤

शामकांत सुंदरलालशेठच्या वाड्यात शिरला. वाड्यात सर्वत्र शांतता होती. वारा पडला होता. मोठी मोठी झाडंसुद्धा कोंबिरीच्या जुडीसारखी मलूल झाली होती. गाळलेल्या पाला-पाचोळ्याचे कपटे उगाचच उसनं अवसान आणून सरपटायला बघत होते. शामकांताच्या पावलांचा वारा त्यांना सरपटायला पुरेसा होता. आज समोरच्या गॅलरीत सुंदरलालशेठ त्याचं भलं थोरलं पोट सावरत उभा असलेला दिसत नव्हता. शेठजीचा आवाजही बाहेर येत नव्हता. शामकांत हळूहळू चालत गोळेच्या खोलीशी आला. त्याच्या घराचा दरवाजा लोटून घेतलेला होता. दरवाज्याच्या फटीतून सिगरेटचा कोंडलेला धूर झिरपत नव्हता. शामकांताने हळूच दरवाजा ठोठावला; पण आतून कुठलीच हालचाल ऐकू येईना. त्याने दरवाजा लोटला. आतून कडी नव्हती. दरवाजा उघडला गेला. आत ब्रीफकेसची उशी करून गोळे गाढ झोपला होता. अधून-मधून घोरत होता; पण त्याच्या ह्या घोरण्याचा आवाज बाहेर ऐकायला येत नव्हता.

श्यामकांतला एकदा वाटलं, गोळेला उठवू नये; तसच झोपू द्यावं. पुन्हा वाटलं, बराच वेळ झोपलेला दिसतोय, उठवावं, नाही तर पुन्हा भेटायचा नाही. गोळेला शामकांतनं हलवलं, पुन्हा पुन्हा हलवलं, तसे गोळेनं पडल्या पडल्याच डोळे किलकिले केले आणि डोळे विस्फारून दचकून 'कोण ? कोण ??' म्हणत गोळे एकदम वेड्यासारखा उठून बसला. गुडघा वर करून त्याच्यावर कपाळ ठेवून तो थापा टाकू लागला.

'काय रे काय झालं ?' श्यामकांतानं विचारलं.

'अं. अं., न नाही. कुठे काय ?' गोळे कसबसा बोलला.

'बेट्या, काही तरी खास घडलंय आणि लपवतोयस माझ्यापासून. खरं की नाही, बोल.'

आता मात्र गोळेनं आपल्या पोतडीतलं नेहमीचं हुकमी हास्य ओठावर आणलं आणि तो दिलखुलास हसला. म्हणाला, 'जगात असं काही आहे का की, गोळेनं तुझ्यापासून लपवलंय ?' ह्या दिशाभूल शब्दांनी श्यामकांताच समाधान झालं. शकेचं सावट दूर झालं. गोळेनं चटकन उठून तोंड धुतलं. झोपून झोपून चेहऱ्याला खग्रास ग्रहण लागावं तसं काही तरी वाटत होतं त्याला बघून.

'कधी झोपला होतास ?' श्यामकांतनं विचारलं.

'झाले दोन-तीन तास.' गोळे मंद आवाजात बोलला. नेहमीचा मोकळेपणा त्या आवाजात नव्हता.

'का रे असा काय दिसतोयस ? तब्येत तर ठीक आहे ना ?'

'नाही, कुठे काय ?' पुन्हा मध्येच हसत गोळे म्हणाला.' छे, छे, मी ठीक आहे. अगदी ठणठणीत आहे. परवापासून ऑफिससुद्धा सुरू झालंय.'

'तेव्हाच.' काहीतरी बोलणं जोडायचं म्हणून शामकांत बोलला. पुन्हा थोडा वेळ शांतता टिकली. गोळे, आज अबोल का झालाय, हे शामकांतला कळेना.

'गोळे ह्या रविवारी जेवायला यायचं माझ्याकडे.'

'आँ ?' गोळे अवाक झाला.

'नाही, म्हटलं जेवायला यायचं ह्या रविवारी.'

'अरे पण-'

'पण-बिण काही ऐकणार नाही. देवाधर्माचं काही नाहीये. मध्येच आपली एक पार्टी समज.'

'पार्टी ? कशाबद्दल ?'

'ते तर तुला माहीतच आहे.'

'काय ?' गोळे पुन्हा चकला.

**गोळे येणार म्हणून कल्पना धास्तावली होती तर श्यामकांत खुशीत होता.**

'अरे, प्रत्येक वेळेला पार्टीसाठी काही कारणच पाहिजे का, असं तूच म्हणतोस ना नेहमी ? आज तेच वाक्य म्हणायची पाळी आलीय माझ्यावर. लेका, काही तरी बिघडलंय तुझं '

'नाही नाही. काही नाही. ठीक आहे सगळं ', गोळे बोलताना सारखा गडबडत होता.

'बरं, मग येणार नं रविवारी ?'

'हो, हो. हो अगदी जरुर ', गोळे शून्यात बघत बोलला. आपण काय बोललो हे लक्षात आल्यावर तो पुन्हा चमकला. गोळेचा मूड नाही, म्हणून शामकातने पाय काढता घेतला आणि ' ये रे रविवारी दुपारी. विसरु नको ', म्हणत तो दिसेनासाही झाला.

ब्रीफकेसच्या उशीवर डोळे उघडे ठेवून गोळे पुन्हा आडवा झाला. त्याची छाती धडधडत होती.

¤

शुक्रवारचा दिवस होता. रविवारला दोनच दिवस उरले होते. कल्पनाचं मन थाऱ्यावर नव्हतं. गोळे घरी आल्यानंतर आपली काय परिस्थिती होईल, ह्याचं चित्र तिला डोळ्यासमोर आणता येत नव्हतं. गोळे घरी आल्यानंर त्याच्याशी काय बोलायचं, त्याला काय विचारायचं, चेहरा कसा ठेवायचा ही सगळी तिला अवघड प्रश्न-चिन्हं वाटत होती.

काही तरी विचित्रासारखं वाटत होतं. खाटेवर बसून उशांवर कूस टाकून ती चिंताक्रांत होती. तेवढ्यात बढेआजीचा आवाज आला. आवाजापाठोपाठ त्या घरात आल्या.

कल्पना उठली. पातळ आणि चेहरा दोन्ही सारखं करीत ती पुढे झाली.

'काय चाललंय ?' म्हणत ती जहांबाज म्हातारी अगदी आतपर्यंत आली. 'झाली का जेवणं ?' म्हणत तिनं स्वयंपाकखोलीतसुद्धा नजर टाकली. मुक्या चेहेऱ्याने कल्पना म्हणाली, ' बसा ना.'

मुरलेल्या म्हातारीनं कल्पनाच्या आवाजातली कसर ओळखली.

' तब्येत बरी आहे ना, तुमची ?' बढेआजीनी विचारलं.

' अधूनमधून डोकं दुखतं थोडं थोडं. ' कल्पना म्हणाली

'बरं का ', मान हलवीत म्हातारी म्हणाली ' चिंता नका करत जाऊ कसली. आपण प्रयत्न करायचे. बाकी करता-करविता तो आहे. त्याच्यावर ठेवायचा विश्वास. सगळं ठीक होतं.'

'पण बढेआजी,...' कल्पना बोलता बोलता मध्येच थाबली. तिच्या पोटात एकदम गलबला उठला. मन पाघळू लागलं. ते कुठे तरी मोकळं करावं, स्वच्छ करावं, असा मोह अनावर व्हायला लागला. जगाच्या ऊन-पावसात पिकलेली, शिकलेली, सुकलेली बढेआजी— कल्पनाला वाटलं, हिचा आधार घ्यावा. हलकं होऊन जावं.

कल्पना बोलताना थांबलेली पाहून बढेआजी म्हणाल्या, 'अहो, बोला ना, बोला. माझ्याकडे बोलताना कसलाही संकोच करू नका.' कल्पना म्हणाली, ' समजा. एखाद्या माणसाच्या मागे एखादी चिंता हात धुऊन लागली. असेल तर काय करावं ?'

'का ? तुम्हाला काही झालय तसं ?'

" मला ? छे, छे मला काही नाही, पण आपलं सहज विचारल.' सारवासारव करीत कल्पना म्हणाली.

'मागे त्या कणिकबाईलासुद्धा असच झालं होतं. सारखी चिंता करत बसायची दिवस-रात्र.उगाच. अशी होत चालली होती.' अंगठ्या-जवळचं बोट हालवत म्हातारी पुढे म्हणाली, 'मी म्हटलं, तुम्ही पाच शनिवार करा. सगळं ठीक होईल आणि सांगते, त्या कणिक-बाईची चिंता पळाली. तुम्हीसुद्धा शनिवार करा. आपण कुटुंबवत्सल माणसं असतो. कुणा ब्रह्मचाऱ्याची दृष्ट लागली म्हणजे माणूस असं झुरत बसतं.' बढेआजीचं बोलणं ऐकून कल्पना चमकली. ब्रह्म-चाऱ्याची दृष्ट ? हो, हो तसंच, अगदी तसचं. ब्रह्मचाऱ्याचीच दृष्ट. गोळे ब्रह्मचारीच होता. कल्पनाच्या मनात लांब लाबूनचे तरंग जमा झाले. ती गुलाबी अमेरिकन जॉर्जेट साडी... ती थरारली. तिला त्या रिकाम्या झालेल्या विश्वासाच्या डब्याची आठवण आली. ती एवढंच म्हणाली, ' बढेआजी मी करीन शनिवार.'

'आज सध्याकाळी तुम्हाला वेळ आहे का ?'बढेआजीनी विचारलं.

'हो आहे, ह्यांना आल्यावर चहा करून दिला की तास-दोन तास मी अगदी मोकळी असते. आज जेवण लौकर करुन ठेवीन. का कुठे जायचंय ?' कल्पनानं विचारलं.

'हो, त्या सातोस्कराच्याकडे जाणार आहे मी. तुम्ही पण चला बरोबर. आज शुक्रवार आहे. त्याच्या पाया पडून प्रसाद घेऊन येऊ. सातोस्कराच्याकडे आज देवी येते.'

. बढेआजी काही तरी कोड्यात बोलल्यासारखं बोलत होत्या. कल्प-नाने अजागळासारखी मान डुलवली.

¤

त्या शुक्रवारचा सूर्य संध्याकाळपर्यंत अस्ताला गेला. संध्याकाळी बढेआजी कल्पनाला देवीचं दर्शन घडविणार होत्या. सातोस्कराकडे येणारी देवी कल्पना पहाणार होती. कल्पनाला त्याबद्दल कुतूहल होतं. त्याबाबत ती अज्ञानीही होती. मात्र बढेआजीना सातोस्कर वाड्याची वाट म्हणजे फक्त नजरेचा खेळ होता.

श्यामकात त्या दिवशी अगदी वेळेवर आला नाही; पण फार उशीरही त्यानं केला नाही. नेहमीचा चहा, हाश्शहुश्श पार पाडून, कल्पना तयार झाली. नीलूचीही पावडर-तिटी झाली. बढेआजी वाकलेली पाठ उभी करत गॅलरीत आल्या. तीन पिढ्यांचं ते त्रिकूट जिना उतरू लागलं. सातोस्कर वाडा त्याची वाट पहात होता.

आपला डावा हात उंचावून बढेआजीनी सातोस्कर वाड्यातलं मुक्तेश्वरीदेवीचं देऊळ लाबूनच दाखवलं. पताक्याएवढा तारवटलेला झेंडा दाखवला. शेजारचा सातोस्कर-वाडा कौलारू होता. जुनी साक्ष देणारा होता. सातोस्कराची मालकी पोसायला पाच-सात भाडेकरू बाळगून होता. पाच-सात झुडपवजा बेवारशी झाडं अनाहुतासारखी उभी होती, तर भितीच्या कडेला मुद्दाम रोज पूजेचं पाणी घालूनही कुजू लागलेली सदाफुली शेवटची चार फुलं माळून गप्प दिवस मोजीत होती.

तिघेही वाड्यात शिरले. वाड्याबाहेर चार बुजरी मंडळी ताट-कळली होती. तिघी-चौघी नऊ वारीतल्या बाया मुक्तेश्वरीदेवीच्या बारक्या देवळातली केविलवाणी वाजणारी घंटा वाजवून आणि गहू-सुपाऱ्या ठेवून काही तरी भरघोस मागण्यात गर्क होत्या. त्यांच्याच दिशेने बढेआजी पुढे निघाल्या. मागून देसाई कुटुंबातल्या मायलेकी चालू लागल्या. त्या नऊवारीवाल्या बायाशी बढेआजी काहीबाही बोलल्या. त्या काय बोलल्या आणि बढेआजीची आणि

त्यांची पूर्वीची ओळख होती का नव्हती, याचा पत्ता लागणं कठीण होतं. कल्पनालाही ते कळलं नाही. नीलू बाप्पाचं इवलंसं देऊळ बघून थक्क झाली आणि काही तरी गंमतीशीर बोलली. दोघींचं त्यामुळे चांगलंच मनोरंजन झालं.

मुक्तेश्वरीदेवीचं देऊळ सातोस्करांच्या वाड्यात पिढ्यान्-पिढ्याचं होतं, अशातला भाग नाही. उलट गाभाऱ्यातल्या भिंतीच्या चुन्याच्या रेषा अजूनही चागल्या पांढऱ्या शुभ्र आणि नव्या वाटत होत्या. नुकतीच त्या देवळाला तीन वर्षं पूर्ण झाली होती. देवळाच्या मानाने मजबूत गाभाऱ्याच्या पायऱ्याशी असलेली दानपेटी भलतीच मजबूत होती. गोदरेज कंपनीचं उत्कृष्ट बनावटीचं, ठणठणीत टाळं त्या पेटीचं रक्षण करण्यास समर्थ होतं.

तसं पाहू जाता मुक्तेश्वरीदेवीचं नाव तीन वर्षांपूर्वी कुणीही ऐकलेलं नव्हतं. त्याचा पहिला उच्चार झाला तो नवनाथांच्या मठात. ती हकीगतही मोठी मनोरंजक आहे. कोणे एके सुप्रभाती एका सद्‌गृहस्थांच्या मनात काही तरी आलं आणि कुठलंसं धार्मिक-आध्यात्मिक मंडळ स्थापन झालं. कर्तव्यबुद्धीनं काहीजण मेंबर झाले, तर काहीजण भीड-भिकेमुळे 'न' म्हणता येईना म्हणून झाले. एकूण मंडळाकडे बऱ्यापैकी द्रव्यनिधी जमा झाला. इतका की, त्याचं नक्की काय, कसंकसं, केव्हा आणि कुठे करायचं ह्यावर मीटिंगमध्ये हमरीतुमरीपर्यंत पाळी येऊ लागली. नवरात्राचा उत्सव जवळ येत होता. 'शारदोत्सव कार्यक्रम' मंडळाने निश्चित केला. वर्गण्यांच्या पावत्या छापल्या, जो काही कार्यक्रम, भजनं-बिजनं होती त्याची पत्रिकाही छापून टाकली. नेमेप्रमाणे पुन्हा काही तरी पैसा गोळा झाला आणि नवरात्र येऊन ठेपलं. आरत्या, धुपारत्या, जप, भजनं, पूजा, महापूजा यामध्ये मंडळ रमून गेलं. अष्टमीच्या दिवशी कार्यक्रमपत्रिकेत असल्याप्रमाणे महालक्ष्मीचाही कार्यक्रम निश्चितच होता. सकाळी बऱ्याच संख्येने नवविवाहित सुवासिनींनी दुर्वांच्या तातूची पूजा मनोभावे केलेली होती. मधल्या वेळात एका कुशल कारागिराने आंबेमोहोर तांदळाची जात्यात दळलेली वस्त्रगाळ पिठी घेऊन महालक्ष्मीचा सुंदर आणि तेजस्वी मुखवटा तयार केला होता. कानात कुड्या, नाकात नथ, रुपयाएवढा मळवट, प्रसन्न डोळे, काळाभोर केशसंभार, भारीपैकी शालू. महालक्ष्मी नजरेत भरावी अशी भव्य आणि प्रसन्न मुद्रेची झाली. संध्याकाळी दर्शनाला हळूहळू गर्दी जमू लागली. हौसेखातर धुपानं भारलेल्या घागरी फुकण्याचा कार्यक्रम महिलांमध्ये जीव धरू लागला. कोणी रीत म्हणून, कोणी गंमत म्हणून, कोणी पुण्य म्हणून घागरी फुंकल्या. होता होता सातोस्करकाकूंच्या हातात धुपानं भारलेली घागर आली आणि ध्यानीमनी नसतानाही त्या घागर नाचवीत नाचवीत एकदम बेभान झाल्या. सातोस्करकाकूंच्या अंगात आलं, अंगात देवी संचारली, ही बातमी कोणत्याही यंत्रमाध्यमाशिवाय एका क्षणात त्या परिसरभर पसरली. नवनाथांच्या मठाकडे लोंढेच्या लोंढे जमू लागले. अंगात येणं म्हणजे काय, हे पहाण्यासाठी प्रत्येकजण घाईघाईने नवनाथांकडे जाऊ लागला. त्याच दिवशी आश्चर्य म्हणजे, सातोस्करकाकूंच्या पाठोपाठ आणखी चार सुवासिनींच्या अंगात आलं आणि त्या चारी महिलांना सांभाळताना मंडळाच्या पदाधिकाऱ्यांची कंबर ढिली झाली.

त्या दिवसापासूनच एका रात्रीत सातोस्करकाकूंचा लौकिक बराच लांबवर पसरला. दुर्दैवी ललाटानं दमले-भागलेले, दैवाच्या फेऱ्यानं गोंधळलेले, अडचणीत आलेले, निराश-चिंतित मनानं गांजून गेलेले, नवसा-सायासांनी थकून गेलेले अनेकजण सातोस्करकाकूंच्या पाया पडू लागले. आपली प्रश्न-समस्या सांगू लागले, त्यांनी सुचविलेले उपचार अत्यंत निर्मळ मनाने करू लागले. त्यांनी दिलेला कोणताही प्रसाद, कोणताही अंगारा मोठ्या भक्तिभावानं आपल्या कुटुंबातील लहान-थोरांना देऊ लागले. देवी मुक्तेश्वरीचा प्रसाद, म्हणून त्याला प्रतिष्ठा मिळू लागली. दुःखी जीवनातून मुक्त करणारी देवी मुक्तेश्वरी म्हणून पसरलेला लौकिक, सातोस्करकाकूकडे शेकड्यानं भक्तगण पाठवू लागला. अंगात आल्यानंतर सातोस्करकाकूंच्या तोंडूनच भाविकांना देवी मुक्तेश्वरीची महती कळू लागली. प्रथम प्रथम दर अष्टमीला आणि त्यानंतर दर शुक्रवारी सातोस्करकाकूंच्या अंगात मुक्तेश्वरीचा संचार होऊ लागला आणि सातोस्करांचा वाडा म्हणजे एक मोठंच संस्थान बनून गेलं.

¤

मुक्तेश्वरीदेवीवर भाविकांचं एवढं मन बसावं, त्यालाही अर्थातच कारणं होती. अनेकांना तिच्या प्रसादानं अपत्य-प्राप्ती किंवा पुत्र-प्राप्ती झाली होती. अनेकजण कोर्ट-कचेऱ्या जिंकले होते. अनेकाना तिच्या आशीर्वादानं नोकऱ्या मिळाल्या होत्या, तर कित्येकांचा प्रदीर्घ आजार तिच्या नुसत्या अंगाऱ्यानं पळाला होता. खेरीज, सातोस्करकाकूंनी एकदा घागरीतून कुंकू काढल्याचं वृत्त प्रभावीपणे त्या परिसरात पसरलं होतं. एकंदर लोकवस्ती सातोस्करकाकूना मानू लागली होती.

अनेकजण असेही होते की, अनेकवार अंगारे, धुपारे, तीर्थप्रसाद घेऊनही मुक्तेश्वरीमातेनं त्याना अजूनही चिंतेतच ठेवलेलं होतं. सातोस्करकाकूनी दिलेल्या तांदळाचा भात अळणी खाऊनही कित्येक गृहिणींची कूस अद्याप उजवलेली नव्हती, तर त्यांनीच दिलेला अंगारा लावल्यानंतरही एका पॅरालिसिस झालेल्या म्हातारीनं प्राण सोडलेला होता. अशाही घटना अनेक होत्या; पण ह्या अपयशी ठरलेल्या भाविकांनीही कधी मुक्तेश्वरीमातेला किंवा सातोस्करकाकूना उद्देशून असा एकही अपशब्द काढलेला नव्हता, ही गोष्ट मोठीच आश्चर्यकारक होती. त्यानंतरच्या तीन नवरात्रीनंतर सातोस्करकाकूचं स्थान अतिशय उंचावलं होतं. दरम्यान त्यांच्या वाड्यात उभारल्या गेलेल्या मुक्तेश्वरीमंदिराकडे दूरदूरचे पाहुणे येऊ लागले होते.

बढेआजी, कल्पना आणि नीलू देवळाकडून सातोस्करांकडे जाऊ लागल्या. वाड्याला अर्धा वळसा दिल्यानंतर चौथी कोपऱ्यातली जागा सातोस्करांची होती. दाराशी बऱ्याच चपला पडलेल्या होत्या. कल्पना काहीशी दबकतच दारातून आत शिरली. बढेआजी माहितगार वाटाड्यासारख्या पुढे गेल्या. आत काही मंडळी भारल्यासारखी बसलेली होती. कल्पना त्यांच्यातच सामील झाली.

आतल्या बाजूला देवघर होतं. कल्पना बाहेरच थांबली. नीलूचा हात तिनं घट्ट धरून ठेवलेला होता. बढेआजी देवघरात गेल्या. थोड्या वेळानं बाहेर येऊन त्यानी कल्पनाला खुणेनेच बोलावलं. पदर नीट करून नीलूला घेऊन कल्पना बढेआजीच्या मागोमाग गेली.

देवघर छान सजवलं होतं मोठा शिसवी देव्हारा होता. आत बऱ्याच चांदीच्या मूर्ती होत्या. देव्हाऱ्याच्या शेजारी काहीबाही सामान अजागळासारखं ठेवलेलं होतं. देव्हाऱ्याच्या पार्श्वभागाला एक मिणमिण इलेक्ट्रिक दिवाही होता. खेरीज, दोन समया एकूण दहा ज्योती प्रज्वलित ठेवून तेवत होत्या. उदबत्त्याच्या धुरानं खोलीतलं वातावरण एखाद्या आश्रमाप्रमाणे झालं होतं. कोपऱ्यात लांबवर एक जुना टेबलफॅनही चालू होता. त्याचं अस्तित्व कुणाच्याच लक्षात येत नव्हतं. देव्हाऱ्याच्यासमोर चाळिशीच्या दिसणाऱ्या सातोस्करकाकू डोळे मिटून स्तब्ध घुमत होत्या. त्यांचा जास्तीत जास्त श्वासोच्छ्वास हा तोंडानंच होत असावा, असं भासत होतं त्यांच्या कपाळावरील शेंदरी कुंकू त्यांच्या चेहऱ्यावरील सात्त्विक गांभीर्य कितीतरी पटीनं वाढवत होतं. नाकात नथ होती. त्यावर कपाळावरील भरगच्च कुंकवाचे बरेच शितोडे उडाले होते. गळ्यात सोन्यात गाठवलेलं मंगळसूत्र होतं आणि हिरवट कोऱ्या नऊवारी पातळातल्या आणि निमगोऱ्या रंगाच्या सातोस्करकाकू निश्चितच दैवी व्यक्तिमत्त्वाच्या दिसत होत्या.

बढेआजीनी खूण करताच कल्पना वाकून सातोस्करकाकूंच्या पाया पडली. त्यापाठोपाठ कल्पनाच्या हुकुमाप्रमाणे नीलूलाही कसंबसं नमन करावं लागलं. सातोस्करकाकूंनी घुमत आशीर्वाद दिला. त्या सगळ्या प्रकारानं कल्पना इतकी गोंधळून गेली की, आपली एखादी अडचण सातोस्करकाकूंना विचारायची आहे, याचं तिला भानही उरलं नाही. नमस्कार करून ती एका बाजूला भिरभिरत्या नजरेनं उभी राहिली.

कल्पनाच्यापाठोपाठ इतर भाविक पुढं येऊ लागले. कुणी सातोस्करकाकूंच्या ओटीत पातळ आणि खण टाकला, तर कुणी पाच नारळानी ओटी भरली. पोर झालं म्हणून, आनंदानं अकरा रुपये पेटीत टाकले तर कुणी मुक्तेश्वरीमंदिरासाठी पाचशे रुपयांची देणगी दिली. ह्या सगळ्या गोष्टी कल्पनाला नव्या होत्या. ती ते सारं पहात होती. तिथंच चाललेल्या गप्पांतून अशा नवनव्या गोष्टी तिला कळत होत्या.

सातोस्करकाकूंकडून घरी परत जाताना तिचं डोकं भणभणून गेलं होतं. बढेआजी काहीबाही सांगत होत्या तिथे तिचं लक्षच नव्हतं. नीलूही पेंगळून गेली होती. मध्येच बढेआजीनी कल्पनाला विचारलं 'का हो, तुम्ही गप्प गप्पशा ?'

कल्पना गडबडली. चटकन काय उत्तर द्यावं, तिच्या लक्षात येईना. तिनं उत्तर दिलं, 'काही नाही, असंच. तुम्ही बोला की.' नंतर मात्र मग बढेआजीही फारसं काही बोलल्या नाहीत. घर जवळ आलं तशी नीलू घराकडे पळत गेली. वर गॅलरीत श्यामकांत त्यांचीच वाट पहात उभा होता. त्रिकुटाला येताना पाहून त्याला हायसं वाटलं असावं.

चाळीत पाय टाकताना कल्पना ध्यानीमनी नसताना एकदमच बढेआजीना म्हणाली, 'सातोस्करकाकू किती पुण्यवान, नाही का हो ?'

¤

त्या दिवशी 'हो' म्हणूनसुद्धा गोळे जेवायला आलाच नाही. श्यामकांत म्हणाला, 'गोळे तसा शब्द पाळणारा माणूस आहे. वास्तविक यायला हवा वेळेवर !' गोळेसाठी सगळेजण जेवायचे ताटकळले. गोळे आला तर काय घडेल, या भीतीने कल्पनाचा थरकाप होत होता. तो न आला तर फार बरं होईल, असही तिला वाटत होतं; पण तसल्या घाईगर्दीतदेखील गोळेला बोलावून आणण्यासाठी श्यामकांतानं कपडे चढवले आणि वेळ जायला नको म्हणून तो चक्क टॅक्सी पकडून सुंदरलालशेटच्या वाड्यापर्यंत गेला.

वाड्यात शुकशुकाट होता. कदाचित शेट आणि शेटाणी जेवत असावेत किंवा जेऊन झोपले तरी असावेत, असा श्यामकातानं अंदाज केला. टॅक्सी थांबवून तो लगबगीनं वाड्यात शिरला. त्याच टॅक्सीत बसवून गोळेला जेवायला घेऊन जायचा त्याचा विचार होता आणि म्हणूनच त्यानं टॅक्सी थांबवून ठेवली होती. गोळेच्या दाराजवळ जाताच मात्र त्याला आश्चर्य वाटलं. गोळेच्या दाराला चक्क कुलूप होतं ! श्यामकांताला वाटलं, गोळे तर नाहीच भेटला, पण टॅक्सीचा फेराही फुकटच गेला. शांतपणे पावलं टाकीत तो पुन्हा टॅक्सीकडे आला आणि त्यानं टॅक्सीचं बिल देऊन टाकलं. टॅक्सी जागेवर थरथरली आणि रणरणत्या उन्हात आल्या पावली निघून गेली ! तिच्या पाठोपाठ मंद पावलांनी रणरणत्या उन्हात श्यामकांत पायी पायी पुन्हा घराकडे जाऊ लागला. आपले मित्र आपल्या घरी आपल्या निमंत्रणावरून जेवायला आले आहेत आणि ते ताटकळत बसले आहेत याची त्याला कल्पना होती नक्कीच !

¤

त्या दिवशी बढेआजींनी सातोस्कराचा वाडा दाखवला. काकूंची गाठ घालून दिली आणि त्यानंतर दोनच दिवसानी आणखी एक घटना घडली. दुपारची वेळ होती. नीलू घरात शांतपणे झोपली होती. कल्पना नुसतीच विचार करीत बसली होती. तेवढ्यात बढेआजी हातात एक कोरं पातळ घेऊन आत आल्या.

'हे बघा प्रसादाचं पातळ !' आत आल्याबरोबर म्हणाल्या,

'प्रसादाचं ?' ते पातळ हातात घेत डोळ्याची प्रश्नार्थक हालचाल करीत कल्पना म्हणाली.

'अहो, ह्या नाही का, त्या आपण परवा गेलो होतो त्या सातोस्करकाकू ?' बढेआजी बोलू लागल्या.

'हो, त्यांचं काय ?'

'त्यांच्याकडूनच आणलं हे पातळ.'

म्हणजे ? त्या पातळं पण विकतात ?' कल्पनाने पुन्हा प्रश्न केला.

'विकतात कसलं हो, त्यांचा थोडाच धंदा आहे ?' देवीच्या ओटीतलं हो हे पातळ. नुसती चढाओढ लागते ही प्रसादाची पातळं घ्यायला !'

'केवढ्याचं हो हे ?'

'एकशेएक्कावन्न द्यायचे !'

'पण वाटत नाही हो हे पातळ दीडशेचं ? कल्पनानं शंका व्यक्त केली.

'अहो, हे प्रसादाचं पातळ ना ? म्हणून त्याचे दीडशे रुपये हो ! अशी पातळं सातोस्करकाकूंना भक्तांकडून खूप येतात ओटीत. लोक म्हणतात, बाई, ह्या प्रसादाच्या पातळाना बरकत असते आणि बरीक ही पातळं आल्या आल्या खपून जातात हो ! सातोस्करकाकूंना खूप पैसा मिळतो त्यातून. गावी म्हणे आता चाळसुद्धा बांधायला घेतली. देव भरभरून देतोय. काही कमी पडत नाहीये त्यांना !'

कल्पना बराच वेळ ते पातळ पहात राहिली. अगदी साधा पोत बारीक किनार, नेहमीच्या डबल चौकटी. कल्पनाला खरं तर ते पातळ मुळीच आवडलं नाही. मनातल्या मनात तिनं त्या पातळाची किमत चाळीस रुपये करून टाकली.

म्हणजे प्रसादाची किमत एकशेदहा भरली. त्या वेळी तिला श्यामकांताला नीलूच्या आजाराच्या वेळी पोस्टाच्या हिशेबात कमी आलेल्या एकशेदहा रुपयांची उगाचच आठवण झाली. त्याच वेळी गहाण पडलेल्या अंगठी आणि घड्याळाची आठवण झाली. मग काहीही कारण नसताना ती विचाराच्या भोवऱ्यात फरफटत गेली.

¤

संध्याकाळी श्यामकातानं मुद्दाम जाऊन गोळेला घरीच गाठला. जेवायला न आल्याबद्दल गोळे 'सॉरी' म्हणाला; पण त्या दिवशी का आलो नाही, ह्याचं नीटसं कोणतंच कारण त्यानं सांगितलं नाही. मग श्यामकातनेही तो विषय घोळवत बसला नाही. गोळेला तर तो विषय नकोच होता; पण एकंदर गोळेचं कुठे तरी काही तरी बिघडलंय, हे श्यामकांताच्या लक्षात आलं होतं. गोळे काही तरी महत्त्वाची गोष्ट लपवतोय, असाही संशय श्यामकांताला येऊ लागलेला होता. कारण गोळे पूर्वीसारखा मनमोकळा, दिलदार स्वभावाचा किंवा विनोदी, मिस्किल वृत्तीचा राहिलेला नव्हता. एखादी अनिष्ट, गंभीर तार त्याच्या शरिरात अधून मधून शिरते आणि मग तो मनानं भंग पावतो, ही गोष्ट अलीकडे अलीकडे गोळेच्या चेहऱ्यावरसुद्धा दिसायची.

गोळे त्या दिवशीच्या भेटीत श्यामकाताला एकदम बोलून गेला, 'यार, जागा सोडून द्यायचा विचार करतोय. कुठे तरी दुसरीकडे घेईन, नाही तर कायमचाच लॉजवरसुद्धा राहीन. क्षनममध्ये गेली दुनिया!' वास्तविक गोळेनं जागेच्या बाबतीत असा त्रागा का करावा हेही श्यामकांताला कळत नव्हतं. तसा सुदरलालशेठला तो पुरून उरला होता. भाडं फार नव्हतं. बरीच वर्षं तो त्या जागेत आनंदान, वेहोशीनं राहिला होता. सार काही ठीक होतं. मग गोळे असं का बडबडतो? पूर्वीसारखं तो फार बोलत नाही. तत्त्वज्ञान तर नाहीच नाही. जायला निघालो तर 'बस यार, जाशील, बस,' असा आग्रह करीत नाही.

गोळेसारखा माणूस मनातल्या मनात का कुढत रहावा हे श्यामकांताच्या डोक्यात येत नव्हतं. तरी पण गोळेनं लग्न करावं म्हणजे त्याच्या अर्ध्या-अधिक अडचणी दूर होऊन सुखं दुपटीनं वाढतील असा श्यामकांताचा ठाम निष्कर्ष होता आणि लग्न नाही म्हणजे नाही हा गोळेचा अढळ निश्चय होता! ह्या दोन विचारांमधील गलिच्छ दलदलीत गोळेचं मन भरकटत होतं.

¤

श्यामकात आणि कल्पनाचा बऱ्याच दिवसानी, पण कडाक्याचा खटका उडाला होता. कल्पनानं घरात वाढवलेला देवदेव, उपासतापास, व्रतवैकल्य, भक्तिमार्ग, शिवाय दर शुक्रवारी सातोस्कराकडे जाण्याची काय गरज आहे, असे श्यामकाताचे सवाल होते; तर कल्पना म्हणत होती की, 'फुकटच तर जाते ना? तिकिटासाठी कुठे चार चव्वल नाही ना खर्च करीत? मला आवडतं. मी जाते. तुम्ही उगाच अडवू नका!'

'अग, पण मी म्हणतो आपण फिरायला जात जाऊ संध्याकाळचे. तुला तिथे कशाला जायला पाहिजे?'

'हे बघा, रोज जातोच आपण फिरायला. आठवड्यातून एकदा फक्त शुक्रवारी मी तिथं जाते. माझ्या मनाला ते वातावरण बरं वाटतं.'

ह्यावर श्यामकांत चरफडून निरुत्तर होई. इतके दिवस त्याचा समज होता की, बढेआजी आग्रह करतात म्हणून नाइलाजानं कल्पनाला जावं लागतं. तशी समजूत करून तो ह्या प्रकाराकडे दुर्लक्ष करीत होता; परंतु जेव्हा बढेआजी महिनाभर कोकणात गेल्या होत्या तेव्हाही कल्पना एकटीच नीलूला घेऊन तिकडे जाताना पाहून त्याला संताप आला होता. वास्तविक देवादिकाच्या किंवा धार्मिक पवित्र कार्याच्या बाबतीत श्यामकांताला गोळेसारखा तिटकारा होता, अशातला भाग नाही; पण आपल्या बायकोनं कुठला तरी छादिष्टपणा करू नये, असं त्याचं ठाम मत होतं आणि ह्यामुळंच दोघाचं कडाक्याचं भांडण झालं होतं. नेहमीप्रमाणे शेवटी कल्पना रडली होती आणि श्यामकांत त्रस्तपणे खाटेवर पडून राहिला होता.

¤

ती भयानक संध्याकाळ आपल्या आयुष्यात कधी उगवेल अशी पुसटशी कल्पनासुद्धा श्यामकांताला कधी शिवली नव्हती. तो दिवसच अगदी विचित्रासारखा गेला होता. एक तर ऑफिसातल्या नार्वेकरची आई अचानक वारली म्हणून तो कामावर नव्हता. शामकांताला दोन-दोन विडोंची कामं होती. मनीऑर्डरीचा, सेव्हिंग बँकेचा आणि स्टॅम्प्स-पोस्टकार्डाचा वगैरे सगळा हिशेब जमवताना त्याचं डोकं पोखरलं जात होतं. तशात नाथाकाकांकडे नवरात्रातली आरती रोज असायची. तिथंही एखादा दिवस जाव लागायचं.

नवरात्रातले गेले सहा दिवस तर कल्पना सातोस्कराकडेच असायची. त्यामुळं ती चीडही त्याच्या मनात होती. तशात मध्यंतरी हप्त्यानं मोठं कपाट घेतलं होतं. त्याचेही हप्ते द्यावे लागायचे. ह्या सगळ्यांमुळं शामकात अगदी गाजून गेला होता.

त्या दिवशी त्यानं पोस्टातला सगळा हिशेब व्यवस्थित जुळवला. रजिस्टरं घबाघबा आपटून कपाटात टाकली आणि मास्तरांकडे चावी देऊन तो सरळ घराकडे चालू पडला. त्याला नाथाकाकांकडं जावं, असही वाटत नव्हतं. गोळेला जाऊन भेटावं, हा विचारही त्याला प्रफुल्लित करत नव्हता. घरी जाऊन शातपणे पडून रहायचं त्यानं ठरवलं होतं.

मात्र घरी येताच त्याच्या डोक्याचा पारा आणखी गरम झाला. दाराला कुलूप होतं. बढयाच्या घरून चावी घेऊन दार उघडताना श्यामकांताला मनस्ताप झाला. त्यानं दार धाडदिशी लोटून दिलं. हात–पाय धुतले आणि स्वत.साठी कपभर चहा करून घेतला. दिवसभर कामाच्या रगाड्यात आबून गेलेलं त्याचं शरीर मग

**म्हणजे प्रसादाची किमत एकशेदहा रुपये भरली.**

खाटेवर पहुडलं आणि समोरच्या खिडकीतून झुळझुळ वाहात येणाऱ्या वाऱ्यावर शांत निजून गेलं. शामकांत दबक्या आवाजात घोरू लागला !

त्याच्या घोरण्याच्या तालावर घड्याळाची टिकटिक होत राहिली आणि शामकांताला जाग आली तेव्हा दारावर कुणी तरी जोरजोरानं थापा मारतंय, ह्याची जाणीव त्याला झाली. दरवाज्याबाहेर बराच गोंधळ चाललेला असावा आणि निदान आठ–दहा माणसं तरी गोळा झालेली असावीत, असा समिश्र आवाज त्याच्या कानात घुमत होता. तो ताडकन उठला. एव्हाना बाहेर बराच काळोख पडला होता. श्यामकांतनं प्रथम दिवा लावला. अद्यापही कल्पना घरी परतलेली नव्हती. त्यानं घड्याळाकडे नजर टाकली. नऊला पाच–सात मिनिटं होती. चांगलीच दोन तास झोप झाली होती !

शामकांतानं घाईघाईनं दरवाजा उघडला. बाहेर गॅलरीत कुणी तरी अपरिचित गृहस्थ उभे होते. त्यांच्यामध्ये दोनएक तरुण पोरं आणि मागच्या बाजूला बरेच चाळकरी होते. हा प्रकार पाहून शाम-कांत गांगरून गेला.

'काय झालं ?' त्याच्या तोंडून कसेबसे शब्द उमटले. 'आपण मिस्टर देसाई ?' त्या अपरिचितानं प्रश्न केला.

'हो, आपण ?' श्यामकांत गोंधळला. चांगलाच गोंधळला. तो माणूस काय म्हणतोय ह्याकडे कान टवकारून तयार राहिला. त्या माणसानं भुईकडे पहात उत्तर दिलं,

'मी...मी. सातोस्कर...अं. उं...' तो माणूस चाचरला. मग पुन्हा म्हणाला, 'तुमची मुलगी नवनाथाच्या मठात रडतेय. तिला घ्यायला चला !'

'काय ?' नीलूचा उल्लेख ऐकून श्यामकांताला कापरं भरल्यागत झालं.

'होय, ती तिकडेच आहे. सुखरूप आहे. काळजी करू नका !'

'अरे पण तिची आई कुठंय ? काय झालं तिला ?' शामकांत भांडल्याच्या सुरात रागानं तडकून आणि सातोस्करांच्या अंगावर वसकन ओरडून म्हणाला. सातोस्कर पुन्हा घाबरल्यागत झाला. चाचरला. चाचरत चाचरत म्हणाला–

'साहेब, साहेब, बाईंच्या अंगात आलंय. चला तुम्ही !'

'काय ?' श्यामकांतानं डोळे विस्फारले. 'कल्पनाच्या अंगात आलंय ? कुठे ?'

'तिथेच. नवनाथाच्या मठात.' सातोस्करांच्या मागचा पोरगा म्हणाला. शामकांत गर्भगळित झाला. गोंधळून गेला. क्षणभर त्याला वाटलं की, आपलं डोकं साफ निर्जीव होऊन गेलंय !

'साहेब, चलताय नं ?' सातोस्कर म्हणाला.

'कुठे ?'

'तिथेच नवनाथाच्या मठात !' सातोस्कर काकुळतीला आला.

'हो, चला.' श्यामकांतानं सुस्कारा सोडला. हताशपणे कपडे चढविले. नवनाथांचा मठ त्याच्या आयुष्यात तो पहिल्यांदाच आतून पहाणार होता.

¤

भिंतीवरच्या कॅलेंडरची तारखेची पानं झडत गेली. महिन्याला महिने चिकटू लागले. आपल्या आयुष्यात, कल्पनाच्या आयुष्यात त्या सातोस्करकाकूंसारखा जबरदस्त बदल होईल, असं श्यामकांताला अजिबात वाटलं नव्हतं; पण तसं झालं खरं ! गेल्या नवरात्राच्या अष्टमीला कल्पना सहज म्हणून घागर फुंकते काय आणि तिच्या अंगात संचारतं काय, कशाचाच मेळ लागत नव्हता. विशेष म्हणजे त्या दिवशी कल्पनाच्या अंगात आल्यानंतर मठातल्या उपस्थित लोकांमध्ये चांगलीच खळबळ उडाली होती. कारण तिच्या रूपानं तिथं साक्षात कोल्हापूरची अंबाबाई नाचत होती !

नवरात्राच्या अष्टमीच्या दिवशी अंगात आलं; पण नतर ते दर शुक्रवारी येऊं लागलं. बढेआजींना जवळच्याजवळ आणि हवकाचं आवडतं काम मिळालं. अंगात आल्यानतर कल्पना कमालीची गंभीर दिसे. डोळे शांतपणे मिटून घेतलेले असत आणि गळ्याजवळ अतिशय मंद आणि किंचित घोगरा श्वासोच्छ्वास चालत असे.

कल्पनेच्याही शुक्रवारी अंगात येतं हे कळल्यावर सातोस्करकाकूंना एक पर्याय तयार झाला. त्यांच्याकडे जाऊन जाऊन दमलेले आणि इच्छापूर्ती न झालेले भाविक कल्पनाकडे येऊ लागले. तिच्याकडून आशीर्वाद, प्रसाद, अंगारा घेऊन जाऊ लागले. कल्पनाची ख्यातीही हळूहळू परिसरात पसरू लागली. सगळ्यात वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट म्हणजे लहानमोठे धंदेवाले, व्यापारी हा वर्ग कल्पनाकडे ओढला जात होता. कारण कल्पना ही कल्पना देसाई नावाची केवळ एक बाई नव्हती तर अंगात आल्यानंतर ती साक्षात लक्ष्मीचं रूप होती !

¤

संतोष आगरवाल हा मारवाडी होता. तिशी–पस्तिशीचा, कर-पल्या अंगाचा आणि गुळगुळीत भरपूर कातडीचा आगरवाल नेहमी गळ्याजवळचं बटण सोनेरी असलेला झब्बा आणि शुभ्र लेंगा घालायचा. त्याचा टायरचा बिझिनेस तसा खानदानी होता. चांगला रुळलेला होता. आसमंतात भरपूर मोटारगाड्या होत्या आणि टायरचं दुकान त्याचं एकट्याचंच होतं. बेटा सुखसमृद्धीनं जगत होता.

हाच संतोष आगरवाल कल्पनाचा निस्सीम भक्त होता. एखाद्या महिन्यात जर पाचवा शुक्रवार आला तर त्या दिवशी तो खण, नारळ, लुगडं आणि एक ग्राम सोन्यानं कल्पनाची ओटी भरायचा. त्याचं कारणही मोठं जबरदस्त होतं पाच हा आकडा आगरवालचा प्यारा होता. आगरवाल पाचावर फिदा होता !

गंमत अशी होती की, आगरवालचं दुकान शहरात ऐन मोक्यावर भर बाजारपेठेत लंब्या–चौड्या जागेत आणि टायरच्या धंद्याला अतिशय सोयिस्कर असं होतं. त्याच्या ह्या धंद्यावर अनेकांची दृष्ट होती; पण त्यानं आगरवालच्या टायरमधली फुंकरभर हवाही सटकत नसे. वास्तविक त्याच्या दुकानाला स्पर्धा करणारं दुकान जर कोणी या विभागात उघडलं असतं तर त्यानंही आगरवालसारखाच खोऱ्यानं पैसा ओढला असता. अनेकांना ही गोष्ट माहीत होती; पण कुणीही हातपाय हलवू शकत नव्हतं. कारण त्या परिसरात दुकान खाली करणारा कुणीच नव्हता. साध्या कॅरमबोर्डइतकीही जागा येथे जवळपास कुठेही शिल्लक नव्हती. त्यामुळं आगरवालनं जरी मातीचे टायर विकले असते तरी गरजूंना ते घ्यावेच लागले असते अशी परिस्थिती होती. आगरवाल आपल्या नशिबाच्या फडकत्या झेंड्याकडे अभिमानानं पहात असायचा.

एक दिवस मात्र अचानक धक्कादायक घटना घडली. आगरवालच्या

न्यू मॉडर्न टायर हाउसच्या समोर जी झवेरी मंझील ही बिल्डिंग होती ती अचानक कोसळली. तसे तिचे टेकूही बरेच थकलेले होते आणि बिल्डिंगच्या भेगांकडे पाहिलं की, त्या घावरून उभ्या आहेत असंही वाटायचं. झवेरी मंझील फार जुनी इमारत होती. ह्या बिल्डिंगचं हे धूड बसलेल्या घोड्यासारखं ढिगारा होऊन समोर पडलेलं पाहून संतोष आगरवालला समोरच्या दुकानवाल्याची काळजी वाटली. त्या दिवशीची खतावणी बाजूला ठेवून दिवसभर तो फायर ब्रिगेडवाल्यांना पाहिजे ती मदत देत होता; पण जेव्हा ढिगाऱ्यातून दोन प्रेतं बाहेर आली आणि त्यांचे नातेवाईक धाय मोकलून रडू लागले तेव्हा संतोषला राहवलं नाही. त्यानं घाईघाईनं दुकान बंद केलं आणि तो घरी जाऊन तूप-रोट्या न खाता पाच मिनिटं गंभीर विचार करून ढाराढूर झोपून गेला !

संतोष आगरवालची मनःस्थिती स्थिर व्हायला वेळ लागला नाही. त्यानं आपलं दुकान पुन्हा पहिल्यासारखंच सुरू केलं. पडल्या बिल्डिंगचा ढिगारा हळूहळू कुठे तरी हलवला गेला आणि तिथे भकास उघडी जमीन दिसू लागली. थोड्याच दिवसात तिथे कोणा बिल्डर कॉन्ट्रॅक्टरची कन्स्ट्रक्शन कंपनीची आडवी पाटी लागली आणि एक दिवस पाया खणायलाही सुरुवात झाली. संतोषला डोळ्यानं हे फरक दिसत होते; पण त्याचं मन खतावणीच्या उभ्या रकान्यामध्ये बिलवसुलीचा हिशोब मांडत होतं. हा हा म्हणता पावसाळा उलटून गेला आणि नंतरच्या चार महिन्यांतच तिथे एक बिल्डिंग दिमाखानं उभी राहिली आगरवाल जेव्हा सहज कुतूहल म्हणून त्या बिल्डिंगजवळ गेला तेव्हा त्याला कळलं की एका तिप्पट मोठ्या गाळ्यात टायरचं एक नवं दुकान उघडणार आहे. हे ऐकून तो एकदम सर्द झाला. वाडवडिलांनी लोटीत पैसे साठवून नावारूपाला आणलेल्या दुकानाला स्पर्धक उभा राहण्याची चिन्हं त्याला अभद्र वाटू लागली. तो दिन ब दिन चिंतेत ओढला जाऊ लागला. कुढू लागला. त्या अनोळखी नव्या बिल्डिंगकडे डोळे मोठे करून विचित्र नजरेनं पाहू लागला. नेहमीसारखे त्याचे खतावणीचे हिशोब जुळेनात.

आगरवालला काय, कसं आणि कुठं कळलं हे सांगणं अवघड आहे, पण तो कल्पनाकडे एका शुक्रवारी आला. चिंतातूर मनानं तो तिच्या पाया पडला आणि आपल्या दुकानाची करुण कहाणी त्यानं तिला सुनवली. कल्पना शांतपणे धागर फुंकत राहिली. मग उजव्या हाताचा पंजा दोन-तीनदा नाचवत घुमत घुमत म्हणाली, 'पाच ... शुक्रवार ...करा, मी तुमच्यामागे आहे !'

आगरवालनं अत्यंत निष्ठेनं पाच शुक्रवार केले. शेजारच्या अलीभाई क्लॉथवाल्यानं तीन नंबर चहा मागवला तर तो सुद्धा त्यानं उपवासाला चालत नाही म्हणून सांगितलं. महिन्या-सव्वा महिन्यात पाच शुक्रवार पार पडले आणि एक दिवस त्या तिप्पट मोठ्या आणि आडव्या गाळ्याच्या दुकानावर 'चित्रमहल' ही पाच अक्षरी उडपी हॉटेलाची पाटी झळकलेली आगरवालनं पाहिली. तेव्हापासून पाच ह्या आकड्याला तो मानू लागला. पाचव्या शुक्रवारला तर फारच मानू लागला. पाचव्या शुक्रवारी तो आपला खिसा हलका करून कल्पनाची ओटी भरू लागला आणि तिच्या पायांची धूळ खुशाल आपल्या कपाळी लावून घेऊ लागला !

असे डझनभर तऱ्हेतऱ्हेचे आगरवाल कल्पनाच्या चाळीच्या पायऱ्या झिजवू लागले. कल्पनाकडे पातळांचा ढीग जमू लागला. श्यामकांत हे सगळं पाहून हादरून गेला. पोष्टाचा नेहमीचा शिक्का मारतानासुद्धा त्याच्या डोक्यात कल्पना घुमताना दिसायची. मग तो शिक्का, त्यावरची तारीख कागदावर स्पष्ट उमटायचीच नाही !

गोळे बरेच दिवसात श्यामकांतच्या घरी गेलेला नव्हता. श्यामकांताला भेटणंही त्यानं मुद्दामच टाळलं होतं. कारण त्याला कल्पनाचा विषय नको होता. तिचा चेहरा पाहण्याचं धैर्य त्याला होणं शक्यच नव्हतं. त्या दिवशी ध्यानी-मनी नसताना श्यामकांत गोळेला स्टेशनवरच भेटला. बरं, एवढ्या जोरात हाक मारून श्यामकांतानं गोळेला बोलावलं होतं की, त्याला मान वळवून पहाणं भागच होतं. गोळेनं पुन्हा चेहऱ्यावर हुकमी हसू आणण्याचा प्रयत्न केला. श्यामकांतानं विचारलं, 'बेट्या, आहेस कुठे तू ? घरी नाही, ऑफिसमध्ये फोन केला तिकडे नाही !'

गोळे म्हणाला, 'तसं काही नाही. मी इकडेच आहे. आपली चुकामूक झाली असणार. बरं, ते जाऊ दे. काय विशेष म्हणतोयस ?'

श्यामकांत गोळेच्या ह्या प्रश्नावर थबकला. दोन क्षण थांबला. मग तुटकपणे म्हणाला, 'म्हणजे, तुला समजलं नाही ?'

गोळे एकदम चरकला. उगाचचं, मग सावरल्यासारखा बोलला, 'समजलं ?' नाही बुवा. काय रे ?'

'होतं ते पुरे नव्हतं की काय कुणास ठाऊक, नवं लोढणं अडकवलंय गळ्यात. कल्पनाच्या अंगात यायला लागलंय. दर शुक्रवारी नुसती बेशुद्धीत बसून असते. घरात जावसं वाटत नाही !'

गोळेचं कुतूहल चाळवलं. आश्चर्यकारक स्मिताची एक रेषा त्याच्या ओठावर थरथरली. 'वहिनींच्या अंगात आलंय. काय सांगतोयस काय ?' गोळेनं शब्द खर्चून, फक्त आश्चर्य सांगितलं.

श्यामकांत म्हणाला, 'कुठून ही ब्याद आमच्या संसारात शिरली काही कळत नाही. देवादिकांबद्दल असं बोलू नये; पण अतिशय त्रास झाला म्हणजे तोंडातून आपोआप बाहेर पडतं. बायको आपली असून आपली नाही असं होऊन गेलंय !'

गोळेला श्यामकांताच्या बोलण्यातलं शेवटचं वाक्य गंमतीचं वाटलं. गोळे म्हणाला, 'ह्या शुक्रवारी मी येतो वहिनींना बघायला. आमच्या गावाला पण यायचं एक दोघांच्या अंगात; पण मी कधी पाहिलं नव्हतं. मी येतो ह्या शुक्रवारी संध्याकाळी !'

श्यामकांत गोळेचं बोलणं ऐकून त्याला येण्याबद्दल 'हो' ही म्हणाला नाही आणि 'नाही' ही म्हणाला नाही. आपल्या त्याच मनःस्थितीत तो आला तसाच निघून गेला.

¤

त्या शुक्रवारी संध्याकाळी गोळे खरोखरीच ऑफिसातून तडक श्यामकांताच्या घरी आला. बऱ्याच लोकांची वर्दळ तेथे दिसत होती.

**असे डझनभर आगरवाल कल्पनेच्या चाळीच्या पायऱ्या झिजवू लागले.**

श्यामकांत निमूट चेहेऱ्याने गॅलरीत उभा होता. गोळेला पाहाताच तो ये असं म्हणाला; पण घरात घुसायला गोळेला दोन-तीन वेळा आपलं स्थूल अंग सावरून घ्यावं लागलं. कारण माणसाची एक अव्यवस्थित रीघ तेथे लागली होती. आतल्या बाजूला पुढे गेल्या-बरोबर त्याच्या नाकात प्रथम धुपाचा वास शिरला आणि दबक्या आवाजातली गडबड जाणवली.

लहानशा देव्हाऱ्यासमोर बसलेली कल्पना पाहताच गोळेला एक-दम त्या टॉकीजमधल्या प्रसंगाची आठवण झाली; पण त्यानं ते चेहऱ्यावर दाखवलं नाही. कल्पना डोळे मिटून शांतपणे घुमत होती देव्हाऱ्यात ताजी फुलं बऱ्याच मोठ्या संख्येनं रचल्यासारखी दिसत होती. गोळेला ते वातावरण एकदम वेगळं वाटलं. तेवढ्यात कुणी तरी एक बाई पुढं येऊन गोळेला म्हणाली, 'तुम्हाला पाया पडायचंय का ? इथून पुढं आलात तरी चालेल!' गोळे एकदम बिचकला. नेमकं काय करावं हे त्याच्या लक्षात येईना. गोंधळून तो म्हणाला, 'नो थँक्स.' आणि चटकन पुन्हा बाहेरच्या बाजूला आला. श्यामकांत समोरच उभा होता. तो गोळेला म्हणाला, 'पाहिलंस ? हे, हे असं आहे. काहीही प्रायव्हसी राहिलेली नाही.' गोळे ह्यावर एकदम गप्पच राहिला.

तेवढ्यात गॅलरीत गडबड उडाली. मोटारीचा आवाज आला. गोळेलाही त्या गडबडीत तिथं थांबण्याची इच्छा नव्हती. तो जायला निघणार तेवढ्यात श्यामकांत म्हणाला, 'थांब जरा, एका मोठ्या माणसाची ओळख करून देतो. तोच येतोय.' आपल्या समोर उभं राहून आता जिन्यातून कोण वर येतोय याचा अंदाज श्यामकांतने बांधलेला पाहून पहिल्यांदा गोळेला आश्चर्यच वाटलं. गोळे मनातल्या मनात म्हणाला, 'सगळं चित्र बदलून गेलंय !' '

गॅलरीतून पुढे येणाऱ्या दोघाना पाहून गोळे उडाला. त्यातला एक जण त्याच्याबरोबर क्लबमध्ये खेळणारा सहानी होता. सहा-नीला त्याने किती तरी वेळा मायनसमध्ये ढकलून घरी परतवला होता. ते दोघेजण वेगाने श्यामकांतच्या खोलीजवळ आले. श्यामकांत जागचा हालला नाही. दोघांनीही खोलीत प्रवेश केला. समोर श्याम-कांतला पाहून सहानीबरोबरचा दुसरा हळुवारपणे म्हणाला, 'हॅलो, देसाई, बरेच दिवसानी भेटला आपण. कसा काय चाललाय ?' श्यामकांताने मान हालविली. मग सहानीशी बोलणाऱ्या गोळेला खेचून त्याची ओळख करून देत तो म्हणाला, 'हे मिस्टर संतोष आगरवाल, अॅडमिट माय फ्रेंड, गोळे, 'गोळेनं आपली पहिली छाप वापरून संतोष आगरवालशी घट्ट हातानं हस्तांदोलन केलं. आगरवाल गंभीरपणे म्हणाला, 'पहिल्यादा माझ्या कर्तव्य पार पाडतो. मग आपण बोलू.' त्याच्या हातात काही तरी जडसं होतं. तो तसाच आत गेला. गोळेला थांबायला सांगून सहानी पण संतोषच्याबरोबर आत गेला. गोळे भलताच अवाक झाला होता. सहानीसाठी तो मुद्दाम थांबून राहिला. श्यामकात म्हणाला, 'ह्या अशा लोकांशी कधी माझा संबंध येईल असं स्वप्नातही वाटलं नव्हत !' यावर गोळे फक्त हसला.

पाच–दहा मिनिटांनी प्रथम सहानी बाहेर आला. नतर संतोष आगरवाल आला. त्याच्या हातात आता कोणतंही पुडकं नव्हतं. बरेच महिन्यांनी महिन्यातला पाचवा शुक्रवार आला होता. कर्तव्य-बुद्धीनं त्यानं आपला दानधर्म केला होता. त्या सर्वांना कोपऱ्यापर्यंत पोचवायला जावं किंवा निदान त्याच्या कारपर्यंत तरी जावं असं श्यामकांतला बिलकुल वाटलं नाही. ते निघतो म्हणाले तेव्हा श्याम-कांत म्हणाला, 'ओके, सी यू !' गोळे पण त्यांच्याचबरोबर जायला निघाला. श्यामकांतनं त्यालाही अडवलं नाही.

जाताना संतोष आगरवालने दोघांनाही सपना क्लबपर्यंत लिफ्ट दिली.

¤

दर शुक्रवारी सकाळी सहाच्या सुमारास कल्पनाच्या अंगात येई ते दोन-तीन तासपर्यंत चाले. तेवढा वेळ ती तटस्थ देवाजवळ बसून राही. बढेआजी अधूनमधून ये–जा करीत. मात्र सकाळचा वेळ तेवढा गडबड–घाईचा नसे. कोणाची फारशी वर्दळही नसे. सकाळी साडेनऊ–दहाच्या सुमारास कल्पना हळूहळू डोळे उघडू–मिटू लागे आणि धाडकन जमिनीवर कोसळून गाढ झोपेतून जागी झाल्यासारखी भानावर येई. त्या वेळी तिला मनस्वी थकवा जाणवत असे. हळूहळू चालत ती खाटेवर मऊ बिछान्यात पडून राही. मग अकराच्या सुमारास ती आपली वेणीफणी, नीलूचा अभ्यास, इतर फुटकळ कामं याकडे पहात असे. झाडलोट, साफसफाई, देवाची उपकरणी धुऊन–पुसून ठेवणं अशीही कामं ती करीत राही. हे करीत असताना अंगात येणारी ती कल्पना हीच हे खरे वाटत नसे. संध्याकाळी पुन्हा सकाळचीच पुनरावृत्ती होई. संध्याकाळी साधारण पाचच्या सुमाराला ती पुन्हा घुमू लागे आणि बढेआजींच्या म्हणण्यानुसार सूर्यास्तापर्यंत तिचा श्वास जास्तीत जास्त घोगरा होत जाई. सूर्यास्तानंतर ती केवळ प्राणायाम केल्याप्रमाणे श्वासाची हालचाल करीत राही. संध्याकाळी वर्दळ मात्र बरीच असे. प्रश्न विचारायला येणारे, अंगारा-प्रसाद घ्यायला येणारे, नुसता दानधर्म करायला येणारे आशीर्वाद घ्यायला येणारे असे भाविक भक्तगण खूप असत. रात्री साडेआठ-पावणे नवाच्या सुमारास ती पुन्हा सकाळसारखीच भानावर येई आणि बिछान्यात पंधरा मिनिटं पडून राही. त्यानंतर मात्र चटपट उठून ती सर्व आवरा-आवर करे आणि स्वैंपाकाची तयारी करून श्यामकांतला साडेनवाला जेवायलाही वाढत असे. हे सर्व माहीत असल्यामुळे श्यामकांत दर शुक्रवारी संध्याकाळी मुद्दामच उशीरापर्यंत पोस्टात बसून रहात असे.


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही.
–डॉ. य. दि फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर
प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये

राजहंस प्रकाशन, पुणे ३०,

आणि नवाच्या सुमारास घरी परतत असे. क्वचितच तो शुक्रवारी संध्याकाळी घरी थांबत असे.

¤

देसाई कुटुंबात हा नवा बदल होऊन अनेक महिने लोटले होते. श्यामकांतालाही आता त्याची थोडीशी सवय होऊन गेलेली होती. नीलूही एकीकडे शाळेत पहिलीच्या वर्गात बसू लागली होती. श्यामकांताला समाधान एकाच गोष्टीचं होतं आणि ते म्हणजे कल्पनाच्या तोंडावर आता पूर्वीचं मधुर हास्य उमटू लागलेलं होतं. तिच्या गोऱ्यापान गालावर पडणाऱ्या सुन्दर खळ्या आता पुन्हा दिसू लागल्या होत्या. तिचं ते पूर्वीचं तेज त्याला आता दिसू लागलं होत. त्यामुळं श्यामकात आता स्वतःची समजूत करीत होता की, एका शुक्रवारची किंमत देऊन आपण आठवड्यातले बाकी दिवस आनंदी करून घेतलेत !

अंगात येऊ लागल्यानंतर सातोस्करकाकूपुढं जी समस्या उभी राहिली होती तीच समस्या कल्पनापुढही उभी राहिली. भाविक भक्तगण ओटी भरण्यासाठी जे नारळ, कापड, सुपाऱ्या वगैरे सामान आणत असत त्याचा प्रचंड ढीग दर शुक्रवारी आतल्या खोलीत पडलेला असायचा. दर आठवड्याला अर्धा–पाऊण पोतं नारळ तर अगदी सहजपणं जमा होत !

आणि तेच नारळ समोरचा वाणी स्वतः माणूस पाठवून घेऊन जाई आणि चार आठवड्यांच्या नारळात देसाई कुटुंबाचा ३ माणसाचा किराणा पाठवून देई कल्पनाला कधी तरी आठवण झाली म्हणजे वाटे की, ह्याच वाण्याकडे आपण एकदा पैसे मागायला गेलो होतो. तेव्हा त्याचे शब्द तिच्या डोक्यात लाह्यासारखे टपटप उडत राहत. 'बाई, आमी अनाज विकते, पैसे नाही विकते!' तरीपण ह्या शब्दांचा पूर्वीचा बोथरेपणा आता अजिबात शिल्लक उरलेला नव्हता.

दान म्हणून येणारी चिल्लर जमा करून दुसरे दिवशी कल्पना ती नीलूच्या नावे पोस्टात ठेवत असे. येणारी पातळं सातोस्करकाकूंसारखीच प्रसादाची म्हणून १०१ रुपयाला एक ह्याप्रमाणे विकून टाकी, नाही तर गरिबाला देऊन टाकी. म्हणजे एकदरीत देसाई कुटुंबामध्ये घडलेला हा बदल त्याच्या आर्थिक बाबतीत काहीसा पथ्यावर पडलेला होता. श्यामकांताची आता त्यामुळं पूर्वीइतकी ओढाताण होत नव्हती

ह्या सर्वांचा एकत्रित परिणाम म्हणून श्यामकांत कल्पनाच्या अंगात येण्यावर आता पूर्वीइतका नाखूषही नव्हता. कारण आठवड्यातले उरलेले सहा दिवस कल्पना आपल्या संसारात मन:पूर्वक रमून गेलेली असे.

¤

(क्रमशः)


## अभ्यासकास उपयुक्त शेतकऱ्यास प्रेरक

"श्री. विजय परुळकर यांनी शतकरी आंदोलनाचे, शरद जोशी यांच्या नेतृत्वाचे व शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष संघर्षाचे चित्र अतिशय जिव्हाळ्याने व जवळिकीने शब्दबद्ध केले आहे. त्यांच्या निवेदनाच्या सहजशैलीमुळे 'योद्धा शेतकरी' हे पुस्तक वाचनीय झाले आहे. शेतकऱ्यांच्या चळवळीतील एका नव्या पर्वाचे हे शब्दचित्र शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करण्यास प्रेरणा देईल व शेतकरी आंदोलनाच्या अभ्यासकास अतिशय उपयुक्त ठरेल. वार्ताहराच्या तडफेने, अभ्यासकाच्या तिडिकीने व शेतकऱ्यांबद्दलच्या तळमळीने लिहिलेले हे पुस्तक शेतकरी चळवळीच्या वाङ्मयात भर टाकणारे आहे."

—प्रा. एम्. डी. देशपांडे
रविवार सकाळ (कोल्हापूर)
दि. २४ जानेवारी १९८२

# योद्धा शेतकरी

**ले. : विजय परुळकर**

राजहंस प्रकाशन, पुणे ३०

किंमत : रुपये छत्तीस

नेत्यांची व आंदोलनाची छायाचित्रे
पंचरंगी मुखपृष्ठ

MANOOS ( Marathi Weekly ) 1.50 Paise Regd. No. PNC–W 28
( Licensed to post without prepayment of postage–No. 11 )

## गोमंतक वार्ता

पृष्ठ ५ वरून

झालेला संपूर्ण भ्रमनिरास विचारात घेतल्यास, गोव्यात काँग्रेस (आय)ची विघटन प्रक्रिया नुसतीच सुरू झालेली नाही तर ती बरीच पुढे पोहोचलेली आहे. हे सरकार लवकरात लवकर खाली यावे यासाठी म. गो. ने योजनाबद्ध कार्यक्रम आखून, त्या दिशेने कार्याला लागण्याची वेळ अगदी जवळ आलेली आहे, असे म. गो. तर्फे आवाहन करण्यात आले आहे. म. गो. पक्षाने ही टीका केली असली तरी त्यांचा राग काँग्रेस–आय मध्ये असलेल्या काही ख्रिश्चन बांधवांविरुद्ध असावा, असे जरासा कानोसा घेतल्यावर दिसून आले. या लोकांनी काँग्रेस (आय)च्या काही लोकांना अनधिकृत निमंत्रण दिल्याचेही कळते. पक्ष खलास करण्यास निघालेल्या सौ. काकोडकरांना परत पक्षात घेणे हे कसले राजकारण चालले आहे असा प्रश्न सर्वांना पडतो.

म. गो. चा गेल्या निवडणुकीत पाडाव झाल्यावर फक्त दोनच आमदार त्या पक्षाच्या बाजूने विधानसभेत बसत. त्यांचा आवाज इतका दबला होता की, ते कोणत्याही क्षणी काँग्रेस पक्षात प्रवेश करतील अशी परिस्थिती निर्माण झाली होती अन आता तेच दोन आमदार स्वतःच्या कर्तृत्वाची मिजास मिरवू लागले आहेत. सौ. काकोडकरांना पक्षात घेतले तर इंदिरा काँग्रेसच्या अधिकारशाही व भ्रष्टाचाराबद्दल ओरड करण्याचा नैतिक अधिकार म. गो. ला नाही. सौ. काकोडकर सत्तेवर असताना म. गो. ची स्थिती या भ्रष्टाचाराबद्दल आणखी काय वेगळी होती? सर्वच आमदार अशिक्षित व सौ. काकोडकरांचे ऐकून घेणारे होते, म्हणून त्या वेळी गट झाले नाहीत आणि भ्रष्टाचाराची अधिक प्रकरणे उजेडात आली नाहीत, इतकेच.

म. गो. पक्ष सत्तेवर असताना सौ. काकोडकर यांच्यावरही त्या वेळच्या विरोधकांनी बरीच चिखलफेक केली होती. त्यांच्यावर गंभीर आरोप केले होते. आम्ही सत्तेवर आल्यावर ते आरोप शाबीत करून दाखवू असे आश्वासन दिले होते; पण काँग्रेस (आय) पक्ष सत्तेवर येऊन दोन वर्षे लोटली. त्या दृष्टीने काहीही हालचाल करण्यात आलेली नाही. किंबहुना याच नेत्यांनी त्या काँग्रेसमध्ये आल्यावर आपल्या गटात यावे म्हणून त्यांची मनधरणी चालविली होती. आता हेच लोक म. गो. मध्ये यावे म्हणून त्यांना प्रलोभने दाखवत आहेत. या पक्षाच्या बळावर अजून सौ. काकोडकरांना विश्वास वाटत नसल्यामुळे त्या आता काँग्रेसमध्येच रहाणे जरी पसंत करीत असल्यातरी पुढे केव्हा तरी त्या पक्षात आल्याखेरीज रहाणार नाहीत अशी खात्री वाटते.


गोव्याचा विकास गेल्या १७ वर्षांत म. गो. ने केला नाही तो आम्ही दोन वर्षांत केला असा डंका काँग्रेस (आय) पक्ष पिटीत आहे, तेही काही अंशी खोटे नाही; पण भ्रष्टाचाराची प्रकरणे म. गो. पेक्षा किती पटींनी काँग्रेसने जास्त केली आहेत.

सध्याच्या आर्थिक व राजकीय चौकटीत पिळल्या गेलेल्या वर्गाला काही दिलासा नाही व तो आपण देऊ असे म. गो. पक्ष म्हणतो; पण ही घोषणाच झाली. काँग्रेस (आय) पक्षही तीच घोषणा देत आलेला आहे. बहुजन समाजाचा पक्ष, बहुजनसमाजाचे नेतृत्व म्हणून काँग्रेसने केव्हापासून आपले तुणतुणे वाजवले आहे; पण प्रत्यक्षात कुणीच बहुजनसमाजाला वाली नाही आणि नव्हते, हे गेल्या कित्येक वर्षांत लोकांना दिसून आले आहे. म. गो. पक्ष आता परत त्याच बळावर पुढे येऊ पहात आहे. बहुजनसमाजात चळवळ घडवून लोकजागृती करण्याचे कार्य तो करील तरच त्या पक्षाला पुढे आशा आहे !

–राजू नायक


**तिसरी आवृत्ती**

संपत आली



**सांगत्ये ऐका**

रसिकांची, समीक्षकांची,
सर्वसामान्य वाचकांची
मान्यता लाभलेले
हंसा वाडकर यांचे
अनोखे आत्मचरित्र

किमत : बारा रुपये

**राजहंस प्रकाशन, पुणे ३०**